

॥ रथ जगन्नाथाचा ॥

डॉ.श.रा. राणे



॥ रथ जगन्नाथाचा ॥

डॉ.श.रा. राणे

realpatidar.com

रथ जगन्नाथाचा

डॉ. श. रा. राणे

श्री सत्‌पंथ साहित्य प्रकाशन
श्री सत्‌पंथी मंदीर, फैजपूर

Rath Jagannathacha

(Marathi Biography)

Dr. S. R. Rane

पहिली आवृत्ती : २८ जुलै १९९९

प्रकाशक :
श्री सत्पंथ साहित्य प्रकाशन,
श्री सत्पंथी मंदीर,
मु. पो. फैजपूर ४२५५०३
ता. यावल, जि. जळगाव
फोन नं. (०२५८५) ४५४१७

मुद्रक :
श्रीराम सुकलालसिंह परदेशी
श्री ऑफसेट, फैजपूर
ता. यावल, जि. जळगाव
फोन नं. (०२५८५) ४५३५१

मूल्य ८० रुपये

आचार्य श्री जगन्नाथ महाराज
यांना
आदरपूर्वक समर्पित.

\- लेखक

realpatidar.com

ऋणनिर्देश

या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी पुढील व्यक्तींनी आर्थिक मदत केली, म्हणून 'सत्‌पंथ साहित्य प्रकाशन संस्था, फैजपूर' त्यांची ऋणी आहे.

१. कै. युवराज किसन महाजन यांचे स्मरणार्थ	
श्री. संजीव किसन महाजन, चिनावल	५००१/-
२. श्री. रामदास जयराम महाजन, चिनावल	५००१/-
३. श्री. भास्कर डिगंबर महाजन, चिनावल	५००१/-
४. कै. वामन देवचंद महाजन यांचे स्मरणार्थ	
श्री. राजेश वामन महाजन, चिनावल	५००१/-
५. श्री. धर्मा काशिराम महाजन, चिनावल	५००१/-
६. श्री. देवराम मुरहर ठोंबरे, चिनावल	५००१/-
७. श्री. मुरलीधर रामचंद्र ठोंबरे, चिनावल	५००१/-
८. श्री. सीताराम लहानू महाजन, चिनावल	५००१/-
९. श्री. उखर्डू आसाराम नारखेडे, चिनावल	५००१/-
१०. श्री. अरुण गिरधर महाजन, चिनावल	५००१/-
११. श्री. गणपत पुरूषोत्तम महाजन, चिनावल	५००१/-
१२. कै. हेमचंद्र नारायण महाजन यांचे स्मरणार्थ	
श्री. श्रीकांत जगन्नाथ महाजन, चिनावल	५००१/-
१३. कै. शंकर ओंकार नारखेडे यांचे स्मरणार्थ	
श्रीमती शकुंतलाबाई शंकर नारखेडे, चिनावल	५००१/-
१४. स्वामी जनार्दन महाराज, सत्‌पंथी महिला भजनी मंडळ, चिनावल	५००१/-
१५. श्री. जगन्नाथ शंकर ठोंबरे चिनावल	५००१/-

अनुक्रमणिका

रथारंभ

१९८८ साली फैजपुराहून पुण्यास मी दिवसाच्या एस्. टी.बसनं जात होतो. माझ्याशेजारीच श्री जगन्नाथ महाराज बसले होते. बराच वेळ कुणी कुणाशीच बोललं नाही. नंतर संवाद सुरू झाला. कोण? कुठले? काय करता? कशाकरता पुण्यास जात आहात? वगैरे प्रश्नोत्तरं झाली. मी विद्यापीठात काही कामानिमित्त जात होतो. महाराज 'श्री सत्पंथ नवनीत' या पुस्तकाच्या छपाईच्या संदर्भात जात होते. पुस्तकाचं बरंचसं काम पूर्ण झालं होतं. काही किरकोळ काम शिल्लक राहिलं होतं. त्यांनी सूटकेसमधून पुस्तकाची छापील पानं काढून माझ्याजवळ दिली. मी ती वाचून पाहिली. मी म्हणालो, "पुस्तक उत्तम आहे. तुम्ही या पुस्तकासाठी खूपच परिश्रम घेतलेले दिसतात."

महाराज म्हणाले, "परिश्रम कसले? पंथाचंच काम आहे हे."

अशा रीतीनं गप्पागोष्टींमधून एकमेकांना आमचा परिचय होत गेला. पुण्याला पोचल्यावर दोन मार्गांना आम्ही लागलो आणि ती भेट तिथंच संपली.

त्यानंतर पुस्तक प्रसिध्द झाल्यावर मला ते भेट देण्यासाठी महाराज स्वतः त्या पुस्तकाची एक प्रत माझ्या घरी घेऊन आले. सत्पंथी मंदिराला मी एकदा भेट द्यावी, असं सांगून ते गेले. कामांच्या व्यापामुळे मात्र मी मंदिराला लवकर भेट देऊ शकलो नाही.

काही दिवसानंतर श्री. गोपाळ भिरूड यांच्याबरोबर मी मंदिरात गेलो. मंदिरात महाराजांनी भिंतींवर स्वत: चित्रं काढली आहेत, ती पाहून मी थक्क झालो. त्यानंतर महाराजांनी 'सत्पंथ साहित्य प्रकाशन' ची सर्व पुस्तकं मला भेट म्हणून दिली. त्यामुळे त्यांच्यातील आणि माझ्यातील ओळखीचा आणखी एक दुवा गुंफला गेला.

काही दिवस महाराजांनी दिलेली पुस्तकं कपाटात पडून राहिली. त्यानंतर वेळ मिळाल्यावर मी ती सर्व वाचली. माझ्याकडे पीएच्.डी. करणाऱ्या एखाद्या विद्यार्थ्याला संशोधनासाठी 'सत्पंथी साहित्याचा चिकित्सक अभ्यास' हा विषय द्यावा, असं मी ठरविलं. काहींना मी हा विषय सुचविला. त्यांना पुस्तकंही वाचायला दिली. परंतु सद्गुरू इमामशाहांचं संपूर्ण साहित्य गुजराथी भाषेत असल्यामुळे मराठी साहित्यात पीएच्. डी. करणाऱ्यांना तो विषय योग्य वाटला नाही. सत्पंथी साहित्यावर कुणीतरी लिहावं, असं सारखं वाटत होतं; परंतु तो योग येत नव्हता.

१९९२ साली माझ्या मार्गदर्शनाखाली पुणे विद्यापीठात एम्. फिल्. करणाऱ्या सौ. ज्योती पाटील ह्या विद्यार्थिनीला मी एम्. फिल्. च्या कृतिप्रकल्पासाठी 'श्री सत्पंथ संप्रदाय : स्वरूप व कार्य' हा विषय दिला. तिनं या विषयावर कृतिप्रकल्प तयार केला. विशेष म्हणजे, हा कृतिप्रकल्प सत्पंथी मंडळानं पुस्तकरूपानं प्रसिध्दही केला.

१९९७ साली महाराजांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला. मुंबईस 'सर हरकिसनदास हॉस्पिटल' मध्ये डॉ. राजेन्द्र पाटील यांनी त्यांच्यावर यशस्वी बायपास शस्त्रक्रिया केली. तरीपण त्या दिवसापासून त्यांची प्रकृती ठीक नसते. मधुमेहामुळे रोज इन्शुलिन टोचून घ्यावं लागतं. अशक्तताही खूप आलेली

आहे. असं असतानाही त्यांचं पंथविषयक विविध प्रकारचं कार्य सुरूच असतं.

काही दिवसांपूर्वी सत्पंथी मंदिरात 'बालबालिका संस्कार केन्द्रा' चं उद्घाटन व्हायचं होतं. त्या निमित्तानं मी तेथे गेलो होतो. महाराजांची क्षीण झालेली प्रकृती पाहून खूप वाईट वाटलं. त्यांनी उभारलेला संतकृपा आश्रम, त्यांनी मंदिराचा केलेला जीर्णोध्दार, त्यांनी मंदिराच्या भिंतींवर काढलेली चित्रं, त्यांचं साहित्य, सत्पंथविषयक त्यांनी घेतलेले अविरत परिश्रम, त्यांची पुरोगामी दृष्टी, त्यांचं निरागस हास्य, पुण्याच्या मार्गावरील नव्हे, पुण्याच्या मार्गावरील त्यांची बसमधील पहिली भेट, वगैरेंची एक फिल्म डोळ्यांसमोर तरळू लागली. मनात विचार आला: फैजपुरात आपण पस्तीस-छत्तीस वर्षांपासून राहत आहोत, तरीपण सतपंथी मंदिरातील श्री जगन्नाथ महाराजांना आपण पूर्णपणे जाणून घेतलं नाही. प्रसिध्दिपराङ्मुख अशा यांच्यावर कुणीच लिहिणार नाही, म्हणून आपणच का लिहू नये? आणि त्याच दिवशी महाराजांचं चरित्र लिहिण्याचा संकल्प मी सोडला.

संकल्प सोडला; परंतु चरित्रलेखनासाठी सामग्री मिळविणं कठीण होतं. प्रथमत: महाराजांची मुलाखत घेतली. प्रकृती ठीक नसल्यामुळे त्यांना नीट बोलताही येईना. शेवटी त्यांना सांगितलं, की तुम्हीच तुमच्या आठवणी लिहून काढा. कारण मला माहीत होतं, की महाराज लिहिण्यात रमतात. त्यांनी एका मोठ्या रजिस्टरमध्ये ५८ पृष्ठांपर्यंत त्यांच्या आयुष्यातील काही आठवणी लिहून ठेवल्या. त्या आठवणींचा या चरित्रलेखनासाठी मला फार उपयोग झाला.

महाराजांच्या राजोरे गांवी मी स्वतः महाराजांबरोबर जाऊन आलो. त्यांचं जन्मस्थळ पाहिलं. तेथील सतपंथी मंदीर पाहिलं. त्यांच्या जन्मगावातून हिंडलो. तेथील अनेकांना त्यांच्या आठवणी विचारल्या.

जळगावी महाराजांचे मनोहर पाटील नावाचे बंधू राहतात. त्यांच्याकडे महाराजांसमवेत जाऊन आलो. त्यांनी व त्यांच्या पत्नी सौ. छाया पाटील यांनी महाराजांसंबंधी बरीच माहिती सांगितली. विशेष म्हणजे, महाराजांच्या ८७ वर्षांच्या मातोश्री चमेलीबाई ह्यादेखील तेथे होत्या. त्यांनी स्वतः मातृमुखी अशा महाराजांसंबंधी अतिशय महत्त्वांची माहिती सांगितली. दि. ५/४/९९ रोजी चमेलीबाईंना देवाज्ञा झाली, ही बातमी जेव्हा मला कळली, तेव्हा त्यांचा हसतमुख चेहरा व त्यांची स्वतःच्या पुत्रावरील, म्हणजे महाराजांवरील श्रध्दा ह्या गोष्टींची आठवण होऊन मला खूप वाईट वाटलं.

महाराजांचे एक बंधू डॉ. मुरलीधर पाटील पुण्याला असतात. ते स्वतः माझ्याकडे येऊन गेले. त्यांच्याही बोलण्यातून महाराजांसंबंधी बरीच माहिती मिळाली.

महाराजांचे वर्गमित्र, त्यांचे अनुयायी, त्यांचे शिष्य, त्यांचे नातेवाईक वगैरे अनेकांना भेटून चरित्रलेखनासाठी मी सामग्री गोळा केली. बेबीताईंचा तर सतुपंथी मंदिराचा व महाराजांच्या जीवनचरित्राचा इतिहास तोंडपाठ आहे. त्यांनी वेळोवेळी बरीच माहिती दिली. तिचा या चरित्रलेखनासाठी खूप उपयोग झाला.

मी आजपर्यंत अनेक प्रकारचं लेखन केलं आहे; परंतु हे चरित्र लिहीत असताना डोक्यावर बरंच ओझं आहे, असं वाटत होतं. ते ओझं अर्थात महाराजांनी केलेल्या प्रचंड कार्याचं व ते कार्य शब्दारूपातून कसं व्यक्तं करायचं यासंबंधीचं

होतं. माझ्या परीनं मी ते ओझं कमी करण्याचा प्रयत्न केला आहे.

हे चरित्र कुणालाही वाचावंसं वाटेल असंच लिहिण्याचा प्रयत्न केला आहे; कारण श्री जगन्नाथ महाराज व त्यांचं कार्य केवळ पंथातील लोकांनाच माहीत व्हावं हा हेतू त्याच्या लेखनामागे नाही, तर कुणाही मराठी वाचकाला ते वाचावंसं वाटावं, हा हेतू आहे.

या पुस्तकाच्या लेखनिकेचं काम माझी पत्नी सौ. वत्सला हिनं केलं. मुद्रणप्रत तयार करण्यासाठी प्रा. नंदकुमार भंगाळे यांनी मदत केली. पुस्तक सर्वांगसुंदर होण्यासाठी श्री ऑफसेटचे मालक श्री.श्रीराम परदेशी व अक्षर जुळणीकार श्री.संजय कुळकर्णी यांनी मन लावून प्रयत्न केले. या सर्वांचा मी आभारी आहे.

पुस्तकाच्या प्रकाशनासाठी आर्थिक साह्य करणाऱ्यांचा स्वतंत्र उल्लेख या पुस्तकात प्रकाशकांनी केलेलाच आहे. तरीपण लेखक या नात्यानं मी त्यांचाही आभारी आहे; कारण त्यांच्या अर्थसाह्याशिवाय हे पुस्तक प्रसिध्दच होऊ शकलं नसतं.

या जगन्नाथाच्या रथाला मी हातभार लावू शकलो ते केवळ महाराजांच्या आशीर्वादामुळेच. तो आशीर्वाद असाच रहावा, ही या रथारंभी प्रार्थना.

डॉ. श. रा. राणे

'अक्षर', उपासना कॉलनी,

फैजपूर ४२५५०३ जि. जळगाव

१. जन्म, बालपण व शिक्षण

पावागडाहून आपल्या भाग्यवेलीची बीजं रुजवण्यासाठी लेवा पाटीदारांचा एक जथा खानदेशात आला. ठिकठिकाणी स्थिर झाला. काळ्या आईची, म्हणजे मातीची सेवा मनोभावे करणारा हा समाज तिच्या अंगाखांद्यांवर वाढला. त्याच्या घामाचं मोल त्याला मिळालं. त्याची भाग्यवेल बहरली. तिच्यावर शिक्षणाचं फूल उमललं, तसंच सत्पंथाचं फूलही उमललं. सत्पंथाचं फूल उमललं ते राजोरे या गावी.

राजोरे हे गाव तसं सुदैवी. आचार्य श्री जगन्नाथ महाराजांचं हे जन्मगाव. त्यांच्या चरणकमलांचे ठसे येथील मातीवर उमटले आणि येथील माती धन्य झाली. येथील पाण्यावर त्यांचा पिंड पोसला गेला; आणि त्या पाण्यानं माणसांना जीवनाचा अर्थ समजावून सांगितला.

ज्यांच्या घरी सत्पंथाचं फूल उमललं ते श्री. तुकाराम मंगू पाटील. श्री. तुकाराम पाटील हाडाचे शेतकरी होते. सातवी फायनल झालेले होते. धुळ्याच्या शेतकी शाळेत त्यांना नोकरी होती. गावी शेतीवाडी होती. शेतीत मिरची आणि कपाशी अमाप पिकायची. शिवाय वयबागायत होतीच. उत्पन्न बऱ्यापैकी होतं, तरीपण मोठं कुटुंब असल्यामुळे उत्पन्न आणि खर्च यांचा मेळ बसत नव्हता. श्री. तुकाराम पाटलांनी नोकरी सोडली आणि त्यांनी पूर्णपणे शेतीला वाहून घेतलं. त्यांचे भाऊ त्यांच्या मदतीला होतेच. त्यांचं एकत्र कुटुंब होतं, तरीपण त्यात सलोखा होता.



कै. तुकाराम पाटील
श्री. जगन्नाथ महाराजांचे वडील



कै. चमेलीबाई पाटील
श्री. जगन्नाथ महाराजांच्या आई



कै. तुकाराम पाटील यांचा परिवार, १९९९



डॉ. श.रा.राणे, श्री जगन्नाथ महाराजांची मुलाखत घेत असताना



बेबीताईंचे रक्षाबंधन

दोनअडीच हजार लोकवस्तीचं राजोरे हे गाव आहे. भुसावळहून यावलकडे एस्. टी. बस जाते. ही बस अंजाळे, राजोरे, मायसांगवी, अट्रावल व चितोडे या गावांना भेट देऊन जाते. भुसावळहून यावलकडे दुसऱ्या मार्गानंही बस जाते. ही बस अंजाळे, निमगाव व टेंभी या गावांहून जाते. अंजाळे आणि निमगावच्या मध्यभागी उत्तरेकडे एस्. टी. मार्गापासून एक किलोमिटर अंतरावर राजोरे हे गाव आहे.

राजोऱ्याच्या उत्तरेकडे पूर्वेकडून दक्षिणेस वाहत जाणारा ओढा आहे. त्याच्या दोन्ही बाजूंना झाडंझुडपं आहेत. सातपुड्यात उगम पावलेला हा ओढा हंबर्डी, बामणोद, म्हैसवाडी, चिखली, राजोरे, निमगाव व बोरावल या गावांहून थेट इंजाळ नदीला मिळतो. चाळीसपन्नास वर्षांपूर्वी या ओढ्याची झुळझुळ वाणी या गावांना ऐकण्याचं भाग्य लाभलं, हे आज कुणाला खरंही वाटणार नाही.

राजोऱ्याला ग्रामपंचायत होती. ग्रामपंचायतीनं चालवलेली मराठी शाळा गावात होती. त्यावेळी पाटीलपुरीच्या दरवाज्यावर पहिलीचा व दुसरीचा असे दोन वर्ग चालायचे. शेजारच्या घरात तिसरीचा व चौथीचा असे दोन वर्ग चालायचे. १९५२ साली राजोऱ्याच्या ग्रामस्थांनी इयत्ता पाचवीचा वर्ग सुरू केला. त्यापुढील शिक्षण ज्यांना घ्यायचं असे ते चिखलीला किंवा भालोदला जायचे.

राजोऱ्याची काळीभोर जमीन. त्यावेळी प्रत्येक शेतात विहीर होती. विहिरींना पन्नाससाठ फुटांवर पाणी असायचं. त्यावेळी मोट हे एकमेव विहिरीतून पाणी काढण्याचं साधन होतं. प्रत्येक शेतकरी सकाळी तीनचार वाजता आपल्या बैलांना घेऊन मोट धरण्यासाठी शेतात जायचा. सर्वत्र जीवन ओसंडून वाहायचं. वांगी व भोंगी मिरची यांनी सर्व शेती बहरून गेलेली असायची.

त्या काळी राजोरे गावात चक्की वगैरे नव्हती. घरोघर सकाळी घरोटांची घरघर ऐकू यायची. विविध प्रकारची जात्यावरची गाणी स्त्रिया सकाळी म्हणायच्या. त्यांत रामकृष्णांच्या भूपाळ्या, द्रौपदीचा धावा, श्रीकृष्णाच्या जेवणाचे वर्णन वगैरे असायचे. छोट्या जयरामला ही गाणी फार आवडायची. काही दिवसांनंतर शेजारच्या गावी दळायच्या चक्क्या आल्या, त्यामुळे सकाळची जात्यावरची गाणी कानावर येईनाशी झाली. जयरामकडे रविवारी शेजारच्या गावी जाऊन दळण दळून आणण्याची कामगिरी पुष्कळदा असायची. रस्त्यानं जातायेताना सागरगोट्या गोळा करणारा जयराम मोठेपणी सत्पंथी साहित्यसागरात अवगाहन करील याची कुणाला त्यावेळी कल्पनाही नसेल.

लेवा समाजात १९२२ च्या सुमारास सत्पंथी व सत्पंथी नसलेले यांच्यांत संघर्ष सुरू होता. सत्पंथी लोक हे गोमांसभक्षक आहेत. पूजेच्या वेळी ते कणकेची गाय व गोऱ्हा करून, ते बाहुले कापतात व गुळाच्या पाण्यात शिजवून खातात, असा सत्पंथीयांविषयी फार मोठा गैरसमज त्यावेळी जनमानसात पसरवून दिलेला होता. सत्पंथीयांशी रोटीबेटीव्यवहारही बंद झाला होता. या गोष्टीचा परिणाम असा झाला, की सत्पंथीयांच्या मुलींशी जोडलेल्या सोयरिकी मोडल्या. ज्यांची लग्नं ठरली होती ती मोडली. ज्यांची लग्नं झाली होती त्यांनी आपल्या बायकांना घटस्फोट दिले. एवढंच काय, परंतु ज्या सत्पंथी घरात मुली दिलेल्या होत्या, त्या मेल्या असं समजून त्यांच्याशी कोणत्याच प्रकारचे संबंध ठेवले नाहीत. इतर कारूनारूंनीदेखील सतपंथीयांशी असलेले संबंध तोडले होते.

सीताबाई ह्या जयरामच्या आईच्या आई, म्हणजे त्याच्या आजी. सीताबाई करारी होत्या. त्या काळात त्या चौथीपर्यंत शिकल्या होत्या. पाच भावांची एकुलती एक बहीण असलेल्या सीताबाई वडिलांच्या अतिशय लाडक्या होत्या. सीताबाईंचे

गीतेचे पाच अध्याय मुखोद्गत होते. 'ज्ञानेश्वरी' व 'एकनाथी भागवत' यांचं वाचनही त्यांनी केलं होतं. पाडळसे हे सीताबाईंचं माहेर होतं. विशेष म्हणजे, लेवा समाजाच्या पंचमंडळातील एकाच्या त्या कन्या होत्या. सीताबाईंचा विवाह चिखली येथील श्री. डोंगर पाटील यांच्याशी झालेला होता. सीताबाईंना चमेलीबाई नावाची एक मुलगी होती. तिचा विवाह राजोऱ्याचे श्री. तुकाराम पाटील यांच्याशी व्हायचा होता. श्री. तुकाराम पाटील यांचं घराणं सत्पंथी होतं. त्या घराण्यात मुलगी देऊ नये, असं काहींचं मत होतं; कारण सत्पंथी आणि सत्पंथी नसलेले यांच्यांतील दुराव्याचा तो काळ होता. सीताबाईंनी वाळीत टाकण्याच्या भीतीला भीक न घालता पाडळसे येथे जाऊन आपल्या वडिलांना आणि भावांना निक्षून सांगितलं, "मी माझी मुलगी चमेली हिचा विवाह राजोरे येथील सत्पंथी श्री. तुकाराम पाटील यांच्याशीच करणार आहे. तुम्हाला माझा हा निर्णय मान्य नसेल तर मी आजपासून येथे पाय ठेवणार नाही."

सीताबाईंच्या करारीपणापुढे त्यांच्या वडिलांनादेखील माघार घ्यावी लागली. त्यांनी मूक संमती दिली. शेवटी श्री. तुकाराम पाटील आणि चमेलीबाई यांचा विवाह झाला. लग्नाला फारशी मंडळी आली नाही. चमेलीबाईंना दोन अपत्ये झाली तरी समाजाच्या रोषामुळे त्यांना आपल्या माहेरी चिखलीला जाता आलं नाही. त्यांना त्याबद्दल फारसं वाईट वाटलं नाही; कारण श्री. तुकाराम पाटील यांच्या सत्पंथाच्या आचारधर्मी प्रवाहात त्या एकरूप झाल्या होत्या. अनसूयाबाई, बळीराम व शिवराम या अपत्यांच्यानंतर चमेलीबाईंना दिवस गेले. चमेलीबाई अतिशय श्रध्दाळू होत्या. श्री जगन्नाथ महाराज गर्भावस्थेत असताना त्यांना फुलांचाच सर्वत्र सुगंध यायचा. त्यांच्या स्वप्नात कधी

पांढरा घोडा यायचा, तर कधी सुवासिनी यायची. राजोरे येथे दि. ४-७-१९४२ रोजी म्हणजे गुरुपौर्णिमेच्या दिवशी चमेलीबाईंनी सुन्या देवघरात एका तेजस्वी बाळाला जन्म दिला. त्याच्या पाचवीच्या दिवशी लाल पातळ नेसून सटवाई आली. तिनं बाळाच्या अंगावरून हात फिरविला व ती ज्योतीच्या रूपात निघून गेली, असा भास चमेलीबाईंना झाला. त्यासंबंधी त्या आपल्या सासूबाईंजवळ बोलल्या. त्या म्हणाल्या, "तू भाग्यवान आहेस म्हणून तुझ्या पोटी असं सुलक्षणी बाळ जन्माला आलं." नामकरणाच्या दिवशी बाळाचं नाव 'जयराम' असं ठेवलं. जयरामनंतर चमेलीबाईंच्या पोटी मनोहर, मुरलीधर व पंडीत ही मुलं जन्माला आली.

१९४८ साली जयरामचं इयत्ता पहिलीत नाव दाखल केलं. जयरामच्या वडिलांची आई गोपाबाई जयरामला व इतर मुलांना पुराणातील गोष्टी सांगायच्या. त्यांत प्रामुख्यानं ध्रुव, प्रल्हाद व पांडव यांच्या गोष्टींचा समावेश असायचा. जयरामचे वडील फारसे बोलके नव्हते. सतत उद्योग करीत राहणं हेच त्यांना आवडायचं. सत्त्वशील, उद्यमशील, सहनशील आणि कनवाळू अशा वडिलांच्या व्यक्तिमत्त्वाचा परिणाम जयरामवर अप्रत्यक्षपणे होत होता. सीताबाईंकडून करारीपणाची व गोपाबाईंकडून जीवनमूल्यांची शिकवण जयरामला मिळत होती. आई चमेलीबाई निरक्षर होती; परंतु श्रध्दाळू होती. अनेक भजनं तिची पाठ होती. ती भजनं जयराम आपल्या मनाच्या कोशात साठवून ठेवत होता.

राजोरे येथे एक मांग एकतारी व चिपळ्या घेऊन यायचा. श्री. तुकाराम पाटलांच्या घरासमोर मोकळं पटांगण होतं. तेथे तो उभा राहून एकतारीवर काही पदं म्हणायचा. ती पदं जयरामला खूप आवडायची. विशेष म्हणजे, हा एकतारीवाला

फक्त दिवाळीच्या सुमारासच्च यायचा. या लोककलाकाराला भाकरी मिळायची, तशीच ज्वारीही मिळायची. उपदेशपर पदं म्हणणाऱ्या या लोककलाकाराच्या कलेबद्दल जयरामला खूप आदर वाटायचा.

मायसांगवीला जत्रा भरायची. त्यावेळी तेथे तमाशापार्टीत नाटकं व्हायची. त्यांत हरिश्चंद्राख्यान, चिलियाबाळाचं आख्यान वगैरेंचा समावेश व्हायचा. या नाटकांतही पदं असायची. वडीलधाऱ्यांच्या गुपचूप जयराम या संगीत नाटकांना जायचा. आख्यानांतील आशयांनी व कर्णमधुर पदांनी तो भारावून जायचा.

राजोरे गावाजवळील डरफोळचा ओढा बारा महिने वाहायचा. या ओढ्याच्या आजुबाजूला निरगुडी, बाभूळ, झाऊ वगैरेंची वाढ झाल्यामुळे ओढ्यावर सावली असायची. ओढ्याच्या दोन्ही बाजूंना हिरवी वनराई असल्यामुळे ओढ्याच्या काठावर कुणालाही बसावंसं वाटायचं. जयराम आणि त्याचे मित्र या ओढ्याच्या काठी कधी लपंडाव खेळायचे, तर कधी डोहात पोहायचे. या ओढ्यात लवंग्या नावाचा एक डोह होता. तो डोह जयरामला खूप आवडायचा. त्यात छातीबरोबर पाणी होतं.

जयराम आणि विजय हे दोघे मित्र होते. त्यांच्यात केवळ मैत्रीचे धागेच एकरूप झाले नव्हते, तर नावातही देणंघेणं झालं होतं. विजय जयरामपेक्षा वयानं मोठा होता, म्हणून जयराम त्याला विजयदादा म्हणायचा. जयरामला विजयदादासारखं पोहणं जमत नव्हतं. काठावरच उड्या मारून पोहण्याचा आनंद तो लुटायचा. सकाळ-संध्याकाळ वेळ मिळेल तेव्हा जयराम ओढ्यावर असायचा. दगड, विटा व रेती यांचा बांध घालून खाली वाहणारं पाणी जयराम आणि त्याचे मित्र बंद करायचे. हा प्रवाह कधी दुसऱ्या बाजूनंही वाहू लागायचा. परंपरेनं

वाहणाऱ्या प्रवाहाला दुसऱ्या बाजूनं वाहायला लावण्याची ही वृत्ती जयरामच्या ठिकाणी लहानपणापासूनच होती. प्रवाहाची पूर्वीची दिशा बंद पडल्यामुळे पाणी भरणं, कपडे धुणं वगैरेसाठी पाणी अपुरं पडायचं. जयरामच्या या उपद्व्यापाबद्दल पुष्कळदा त्याला बोलणी खावी लागायची. काही दिवस तो उपद्व्याप बंद पडायचा. नंतर पुन्हा सुरू व्हायचा. परंतु जेव्हा बिळांत पाणी गेल्यामुळे त्यांतून सर्प, इंगळ्या, विंचू, खेकडे वगैरे बाहेर आले तेव्हापासून त्यानं तो उपद्व्याप सोडला. त्याऐवजी प्रवाहात जो पालापाचोळा, घाण वगैरे साचलेली असायची ती काढण्याचा प्रयत्न त्यानं सुरू केला. त्याच्या या प्रयत्नामुळे लोक त्याला धन्यवाद देऊ लागले. जयरामच्या भावी आयुष्याची पृष्ठभूमी अशाप्रकारे तयार होत होती.

जयरामला पुढे रागदारीतून पदं म्हणण्याची आवड निर्माण झाली. त्यासंबंधीची बीजं त्याच्या लहानपणीच त्याच्या ठिकाणी रुजवली जात होती. लहानपणी डोहात पोहणारा जयराम मोठेपणी सत्पंथी साहित्याच्या सागराचा तळ गाठण्याचा प्रयत्न करील, हे तरी त्यावेळी कुणाला माहीत होतं ?

जयराम इयत्ता चौथीत असताना त्याच्या शाळेची सहल अशीरगडाला गेली होती. अशीरगड येथे मोठमोठे खडक पाहून जयरामला भीती वाटायची. बांधकामाच्या वेळी लोकांनी खालून दगड, विटा, चुना, वगैरे साहित्य वर कसं नेलं असेल, असा प्रश्न त्याच्या मनात निर्माण व्हायचा. मोठमोठे खंदक व त्यांत असलेलं अथांग पाणी कोणी व कशाकरिता निर्माण केलं असेल, असाही प्रश्न त्याच्या मनात निर्माण व्हायचा. अशीरगडाच्या वरती जिवंत पाण्याचा हौद व त्यातील थंडगार निर्मळ पाणी पाहून देवाच्या अगाध करणीच्या कल्पनेनं तो भारावून जायचा.

जयरामनं लहानपणी अनेक सहलीत सहभाग घेतला, ते केवळ मौजमजा करण्यासाठी नाही, तर काहीतरी पाहण्यासाठी, त्यावर चिंतन करण्यासाठी. विशेष म्हणजे, सहलीवरून परत आल्यावर जयराम आपल्या आजीला कायकाय पाहिलं ते इत्थंभूत सांगायचा. कारण त्यानं सर्वकाही डोळे आणि मन यांत साठवून ठेवलेलं असायचं.

पाचवीत असताना जयराम फर्दापूरच्या लेण्या पाहयला गेला. तिथं गेल्यावर गौतमबुध्दाचं चरित्र त्याच्या डोळ्यांसमोर उभं राहिलं. जीवनाच्या अनित्यतेचा विचार त्याच्या बालमनाला चाटून गेला. गौतमबुध्दाचं निर्विकार व शांत रूप पाहिल्यावर जयराम नतमस्तक झाला. स्तंभित झाला. गौतमबुध्दाच्या इतिहासाचा धांडोळा घेण्याची प्रेरणा जयरामला त्या प्रसंगानं दिली. गौतमबुध्दाला अश्वत्थवृक्षाखाली साक्षात्कार झाला, तसा साक्षात्कार आपल्याला का होऊ नये, असा बालसुलभ विचार जयरामच्या मनात घरासमोरच्या अश्वत्थवृक्षाखालून जाताना पुष्कळदा यायचा.

१९५१ ते १९५३ या दोन वर्षांत भीषण दुष्काळ पडला होता. मुगाची अर्धी भाकरी, ठेचा व कांदा हेच पदार्थ चिखलीला शिकत असताना जयरामच्या शिदोरीत असायचे. काहींजवळ तर अर्धी भाकरीसुध्दा नसायची. दहाबारा विद्यार्थी एकत्र बसून घासघास खायचे. सर्व मिळून सर्वांसाठी ही वृत्ती जयरामच्या ठिकाणी लहानपणापासूनच वाढीला लागत होती.

जयराम त्यावेळी सहावीत होता. विजयदादा, भागवत, देविदास, वगैरे मित्रांबरोबर तो वडिलोपार्जित चिचे नावाचं शेत होतं, तेथे चिंचा पाडण्यासाठी गेला होता. जयरामची मुळात शोधक दृष्टी होती. मुळापर्यंत शोध घेणारी त्याची विलक्षण दृष्टी त्या दिवशी उफाळून वर आली. आपल्या

मित्रांना तो म्हणाला, "मित्रांनो, या शेताजवळून हा जो नाला जातो तो कसकसा व कुठपर्यंत जातो ते आपण पाहू." मित्रांनी जयरामच्या या कल्पनेला लगेच दुजोरा दिला. सारे मित्र नाल्याच्या काठाकाठाने निघाले. अधूनमधून कंटाळा आला की ते पाण्यातूनही खेळतखेळत जायचे. नाल्याच्या दोन्ही बाजूंना हिरवेगार उंच कडे होते. पिवळ्या धम्मक फुलांनी बाभळी डवरून गेल्या होत्या. कुठे हिवर दिसायचा, तर कुठे शमीचं दर्शन व्हायचं. त्या झाडांखाली तरवटाची पिवळी फुलं फारच सुरेख दिसायची.

नाल्याचा शोध घेणारी जयराम आणि मंडळी जलप्रवाहातून आपला प्रवास करत होती. नाला कुठं रुंद व्हायचा, तर कुठे अरुंद व्हायचा. मध्येच त्यांना एखादा ससा दिसायचा, तर कुठे एखादा मोर दिसायचा. त्यांना त्यांच्या मार्गात लहानसहान सर्पही दिसले. निसर्गाचं बहुरंगी आणि बहुढंगी असं रूप न्याहाळत जाणाऱ्या त्यांना काही गुराखी भेटले. ते म्हणाले, "मुलांनो पुढे जाऊ नका. तिकडे बिबळ्या आहे. तरस आहे."

जयराम म्हणाला, "बिबळ्याचं दर्शन व्हायचं असेल, तर मग पुढे गेलंच पाहिजे. परमेश्वराचंच एक रूप ते! ते आम्ही का पाहू नये?"

गुराखी पुढे काहीच बोलले नाहीत. ते त्यांच्या मार्गाला लागले आणि जयराम आणि मंडळी आपल्या मार्गाला लागली. पुढे मार्गात त्यांना बिबळ्या दिसला नाही; परंतु गोजिरवाणी चपळ अशी हरणं मात्र दिसली. असा प्रवास करत करत शेवटी ती मंडळी माणकेश्वरापर्यंत पोचली. त्यांना खूप आनंद झाला. सीतान्हाणीचं त्यांनी दर्शन घेतलं. माणकेश्वराला नमस्कार करून मंडळी घरी परत आली. घरच्या लोकांनी दिवसभर

कुठं होतात, म्हणून विचारलं. "माणकेश्वराच्या दर्शनाला गेलो होतो," असं त्यांनी सांगितल्यावर त्यांचा माणकेश्वराच्या कृपेनं मार चुकला.

माणकेश्वराचं दर्शन घेतल्यावर जयरामच्या मनात काही दिवस भगवंताच्या अगाध लीलांचा विचार यायचा. अप्रतिम लावण्यमयी अशी सृष्टी निर्माण करणाऱ्या त्या प्रभूचं मनात कौतुक करीत तो लीन व्हायचा.

श्रावण महिन्यात राजोरे येथील श्री. दीपचंद महाजन यांच्या घरी संध्याकाळी पोथी वाचनाचा कार्यक्रम व्हायचा. श्री. देवराम पाटील हे पोथी वाचायचे व अर्थ सांगायचे. पोथी ऐकायला बरेच स्त्रीपुरुष यायचे. त्यांत फक्त जयराम आणि वासुदेव नेहेते ही दोन मुलंच असायची. एकदा पोथी संपल्यावर जयरामनं आपल्या मित्राला विचारलं, "सर्व देवांत श्रेष्ठ देव कोणता?" तो सांगू शकला नाही. शेवटी त्यांनी देवराम पाटील यांना विचारलं, "सर्व देवात श्रेष्ठ देव कोणता?" त्यावर तेही निश्चित कोणता देव श्रेष्ठ त्यासंबंधी सांगू शकले नाहीत. इतर उपस्थित मंडळी होती त्यांपैकी कोणी शंकर सांगायचा, तर कोणी विष्णु सांगायचा. कोणी देवी सांगायचा, तर कोणी आणखी काही सांगायचा. शेवटी दोन्ही मित्रांत बरीच चर्चा झाली. त्या चर्चेतून त्यांनी निष्कर्ष काढला, की देवांत श्रेष्ठ शेषशाही नारायण आहे; कारण त्यानंच अनेक अवतार धारण करून, दैत्यांना ठार करून, भक्तांचा उध्दार केला.

१९५४ साली श्री. तुकाराम पाटील बुधवारच्या बाजाराच्या निमित्तानं फैजपूरच्या सत्पंथी मंदिरात गेले होते. तेथे श्री पुरुषोत्तम महाराज होते. श्री. तुकाराम पाटील आणि श्री पुरुषोत्तम महाराज यांच्यांत काहीतरी बोलणं झालं. घरी आल्यावर श्री. तुकाराम पाटलांनी बळीराम, जयराम, मनोहर, मुरलीधर

व पंडीत या आपल्या पाचही मुलांना जवळ बोलावलं. त्यांना ते म्हणाले, "फैजपूरच्या सत्पंथी मंदिरात तुमच्यापैकी कुणाला तरी एकाला मी अर्पण करणार आहे. तुमच्यापैकी कोण तयार आहे?"

बळीरामनं स्पष्ट नकार दिला. मनोहर, मुरलीधर व पंडीत यांना 'बोवा' किंवा 'महाराज' ही काय भानगड असते, त्यासंबंधी काहीच कल्पना नव्हती, म्हणून ते काहीच बोलले नाहीत. जयराम मात्र उत्स्फूर्तपणे म्हणाला, "मी तयार आहे फैजपूरच्या सत्पंथी मंदिरात जायला."

विजयदादा आणि जयराम या दोघांनाही भजनं म्हणण्याचा छंद होता. जयरामच्या काकांच्या घरात दर गुरुवारी पंचपदी व्हायची. रात्री बारा वाजेपर्यंत मोठी माणसं भजनं म्हणायची. त्या भजनांना विजयदादा आणि जयराम अवश्य उपस्थित राह्यचे. शेवटी आरती, पुष्पांजली झाल्यावरच ते दोघे मित्र घरी जायचे. लोकांना त्या दोघांचं खूप कौतुक वाटायचं. पूजेलाही शेवटपर्यंत जयराम हजर राह्यचा. जयरामला कोरा प्रसाद खूप आवडायचा. त्यात भात, गूळ, दूध व काही फळं यांचं मिश्रण असायचं. एकदा जयरामच्या घरी पिढी उटासनाची पूजा होती. त्यावेळी तेथे फैजपूर येथील सत्पंथी मंदिरातील श्री पुरुषोत्तम महाराज पूजेला आले होते. गुरू महाराजांचं दर्शन झाल्यावर जयरामला खूप आनंद झाला. मोठ्या मनोभावानं त्यानं त्यांना नमस्कार केला. श्री पुरुषोत्तम महाराजांचं ते पहिलं दर्शन जयरामच्या मनावर खूप परिणाम करून गेलं. त्या परिणामामुळे व इतर धार्मिक संस्कारांमुळे कदाचित फैजपूरच्या मंदिरात जायला जयरामनं होकार दिला असेल.

श्री. तुकाराम पाटील जयरामला म्हणाले, "फैजपूरच्या सत्पंथी मंदिरात जाण्याची तुझी तयारी पाहून मला खूप आनंद झाला. तू फैजपुरास जाऊन मंदिराचा व तेथील महाराजांचा जवळून परिचय करून घे. त्या ठिकाणी कसं वागायचं, कोणकोणती कामं करायची वगैरेंची माहिती करून घे. तुला तेथे रहावंसं वाटलं तरच तेथील मंदिराला तुला अर्पण करू."

जयराम म्हणाला, "बाबा, तुम्ही काळजी करू नका. मला मंदिरात राहणं आवडेल. गुरू पुरुषोत्तम महाराजांच्या सोबत राहण्याचं भाग्य मला लाभेल."

आपल्या मुलांवर आईची माया खूप असते. तिला सर्वच मुलं अतिशय प्रिय असतात. बालपणात तर त्यांनी आपल्याजवळच रहावं, असं तिला वाटत असतं. जयरामच्या आईनं शेजारपाजारच्या स्त्रियांना जयरामला मंदिरात पाठवण्यासंबंधी विचारलं. सर्वसामान्य त्या स्त्रिया तिला काय सांगणार? त्या म्हणाल्या, "तुला काय मुलं जास्ती झाली? कशाला पाठवते मुलाला मंदिरात? जो तो आपापल्या कुवतीप्रमाणे मोठेपणी कामधंदा करून पोट भरतोच."

काय करावं हे जयरामच्या आईला, म्हणजे चमेलीबाईला काही सुचेना. तिनं तिची आई सीताबाई हिचा सल्ला घेतला. सीताबाई म्हणाल्या, "बेटा चमेली, तुझा मुलगा मंदिरात जायला तयार झाला, ही फार मोठी भाग्याची गोष्ट आहे. कुणाच्या नशिबी जे नसतं, ते तुझ्या नशिबी दिसत आहे. तुमच्या घराण्याचं पुण्य उदयाला आलं आहे. ही वेळ वाया जाऊ देऊ नको. माझा नातू जयराम फार मोठा महाराज होईल. तुमच्या घराण्याचा उध्दार त्यामुळे होईल. तू कुणाचं काहीही ऐकू नको. ताबडतोब जयरामला फैजपूरच्या सत्पंथी मंदिरात पाठव."

चमेलीबाई घरी परत आल्यावर त्यांनी श्री. तुकाराम पाटलांना सीताबाईंचं म्हणणं सांगितलं. श्री. तुकाराम पाटील म्हणाले, "या सत्कार्यासाठी माझी तयारी होतीच. तुझ्या मनाच्या तयारीचा प्रश्न होता. तोही आता सुटला."

जयरामला मंदिरात पाठविण्याचा दिवस नक्की झाला. सर्वजण एकत्र आले. जयरामची पूजा वगैरे केली. श्री. तुकाराम पाटील म्हणाले, "गुरू महाराजांची कृपा व जयरामचा होकार यांमुळे आजचा दिवस उगवला. गुरू महाराजांनी जयरामला त्यांच्या सेवेसाठी बोलावलं आहे. त्यांची ठेव त्यांना अर्पण करण्यासाठी मी फैजपुरास जात आहे. मी केवळ निमित्त आहे."

जयराम घर सोडून जाणार म्हणून सर्वांना वाईट वाटत होतं. तरीपण गुरू महाराजांच्या सान्निध्यात तो जात आहे म्हणून त्यांना आनंदही होत होता. आनंदाश्रूंनी सर्वांचे डोळे भरून आले होते. वडीलधाऱ्यांचा आशीर्वाद घेऊन जयराम बैलगाडीत बसला. बैलगाडीचा प्रवास राजोऱ्याहून फैजपूरच्या सत्पंथी मंदिराकडे सुरू झाला होता.

बारा वर्षांचा जयराम मंदिरात राहू लागला. सुरवातीला एकदोन दिवस त्याला घरची आठवण यायची. आई, वडील, भाऊ, मित्र वगैरेंच्या आठवणी त्याला यायच्या. डोहात पोहायची आठवण त्याला यायची. परंतु लवकरच ह्या गोष्टींचं विस्मरण त्याला होत गेलं. जयरामचे गुरू श्री पुरुषोत्तम महाराज यांना त्यावेळी यावल व जळगाव येथे कोर्टाच्या तारखांसाठी जावं लागत असे. श्री पुरुषोत्तम महाराज सकाळी लवकर उठून स्वत: स्वयंपाक करायचे व जेवण करून निघून जायचे. ते गेल्यावर त्यांचे चुलते श्री. चिमण बापू भारंबे हे जयरामजवळ

थांबायचे. मंदिरासंबंधी व तेथील कार्यक्रमासंबंधी ते जयरामला सांगायचे. मंदिरात राहण्याचा जयरामचा पक्का निर्धार असल्यामुळे जयराम हळूहळू मंदिरात रमत गेला.

जयरामनं मंदिरात प्रवेश केला त्यावेळी मंदिराला कुणीतरी सावकारानं कर्जापोटी कुलूप लावलं होतं. मंदिराचा पुढचा व्हरांडा व वरील सर्व भाग बंद केला होता. मंदीर, स्वयंपाक घर व चौक एवढाच भाग उघडा होता. श्री. पुरुषोत्तम महाराजांना या कारणामुळेच तर कोर्टात नेहमी जावं लागायचं.

स्वत: श्री पुरुषोत्तम महाराज शेणानं मंदिरातील जागा सारवायचे. स्वयंपाक करायचे. प्रसाद करायचे. भांडी घासायचे. कपडे धुवायचे. सकाळ-संध्याकाळ आरतीची तयारी करायचे. झाडलोट करायचे. आल्यागेल्याची जेवणाची व राहण्याची व्यवस्था करायचे. त्यांची ही कामं पाहून जयरामला त्यांच्याबद्दल आदर वाटू लागला. ही कामं हळूहळू तो स्वत: करू लागला. एवढंच काय, परंतु स्वयंपाक कसा करावा, हेही तो श्री पुरुषोत्तम महाराजांकडून शिकला.

मंदिरातील कामांबरोबर जयरामनं शाळेत शिकावं अशी श्री पुरुषोत्तम महाराजांची इच्छा होती. त्यांनी फैजपूरच्या मराठी शाळा नंबर दोनमध्ये जयरामचं इयत्ता सातवीत नाव दाखल केलं. त्याचे वर्गशिक्षक आमोदे येथील श्री. पुं. ध. चौधरी हे होते. ते स्वभावानं फार कडक होते. जयरामला सूतकताई जमत नसे; त्यामुळे त्याला छड्याही खाव्या लागत. पुष्कळदा त्याच्याजवळ वह्या व पुस्तकं यांसाठी पैसे नसायचे. किराणा दुकानातून जयराम पाठकोरे कागद आणायचा व त्याच्या वह्या करायचा. त्यावेळी लिहिण्यासाठी दौत आणि टाक हीच साधनं होती. जयरामनं एकदा आपल्या टाकाला पेनची निफ बसवली. गुरुजींच्या हे लक्षात आल्यावर त्यांनी जयरामला वर्गात शाळा सुटेपर्यंत केवळ उभं केलं नाही, तर दोन छड्यांचा प्रसादही दिला.

सत्पंथी मंदिरात राहत असताना अशा पध्दतीनं जयरामचा शाळेतील अभ्यास सुरू झाला. त्याला दिवसभरच्या श्रमानं रात्री लवकर झोप लागायची. सकाळी श्री पुरुषोत्तम महाराजांच्या आधी उठून त्याला पाणी तापवावं लागे. महाराजांचं स्नान झाल्यावर जयराम स्नान करायचा. त्यानंतर कपडे धुवायचा. मंदिरात आड होता. पाणी भरण्याचं काम जयरामकडेच होतं. तो आधी पाय धुण्याच्या हौदात पाणी टाकायचा. नंतर पिण्याचं पाणी भरायचा. त्यानंतर स्वयंपाक करून झाकून ठेवायचा. श्री पुरुषोत्तम महाराज सकाळी आठ वाजता जेवायचे; कारण त्यांना रोज बाहेर जावं लागायचं. जेवण केल्याशिवाय ते बाहेर जात नसत. सडा-सारवण, दळण दळून आणणं, धान्य निवडणं, रात्री पूजेसाठी प्रसाद तयार करणं वैगरे कितीतरी कामांत जयराम तरबेज झाला.

जयराम त्यावेळी आठवीत होता. त्याला श्री. जे. टी. महाजन इंग्रजी शिकवायचे. इतर मुलांप्रमाणे त्यांनी जयरामला प्रश्न विचारला, " व्हॉट् इज युवर ग्रँडमदर्स नेम ?"

जयराम उठला आणि म्हणाला, " माय ग्रँडमदर्स नेम इज ....."

प्रश्नाचं पूर्ण उत्तर न देताच जयराम खाली बसला. सर्व वर्ग हसायला लागला. श्री. महाजनांनी त्याला पुन्हा उभं केलं व तोच प्रश्न विचारला. दुसऱ्या वेळीही आजीचं नाव न सांगताच तो खाली बसला. वर्गातील मुलं पुन्हा हसायला लागली. श्री. महाजनांनी त्याला पुन्हा उभं केलं आणि ते त्याला म्हणाले, " तुझ्या आजीला नाव नाही का ?"

जयराम " हो " म्हणाला. मग मृदु आवाजात श्री. महाजन म्हणाले, " जयराम, तुझ्या आजीचं नाव काय आहे ?"

जयराम म्हणाला, " गोपाबय !"

जयरामच्या या उत्तरानं सर्व मुलं पुन्हा पोट धरून हसू लागली. श्री. महाजनांनाही हसू आलं. ते म्हणाले, "अरे, नाव तर चांगलं आहे. मग का नाही सांगितलं?"

"मुलं हसतील म्हणून सांगितलं नाही." जयराम म्हणाला.

वर्गातील मुलं पुन्हा हसू लागली.

श्री. महाजनांनी मुलांना शांत केलं. ते म्हणाले, "अरे जयराम, 'गोपाबय' असं न सांगता 'गोपिकाबाई' असं सांगावं."

तेवढ्यात तास संपल्याची घंटा झाली आणि जयरामची सुटका झाली; परंतु चारचौघांत कसं बोलावं याची खूणगाठ मात्र त्यानं बांधली.

जयराम जेव्हा आठवीत होता तेव्हाची एक आठवण मोठी मजेशीर आहे. श्री. डी. सी. इंगळे हे जयरामचे वर्गशिक्षक होते. वर्गात फी भरण्याबद्दल नोटीस आली. जयरामनं श्री पुरुषोत्तम महाराजांना फीबद्दल सांगितलं. त्यांच्याजवळ पैसे नव्हते. ते म्हणाले, "एकदोन दिवसांत फी भरू."

त्यावेळी सहा रुपये महिन्याची फी होती. जयरामला निम्मे फी माफ होती त्यामुळे त्याला तीन रुपये भरणं आवश्यक होतं. श्री पुरुषोत्तम महाराजांनी दोन दिवसानंतर जयरामला फीसाठी तीन रुपये दिले ते चिल्लरच्या स्वरूपात. म्हणजे त्यावेळचे १९२ अधेले दिले.

वर्गात जयराम टेबलावर चिल्लरच्या चारचार आण्यांच्या गड्ड्या लावत होता. श्री. इंगळे सरांनी त्याच्याकडे पाहिलं. ते म्हणाले, "फी भरायची ही काय पध्दती आहे? हे पैसे उचल व नोट घेऊन ये. नोट नसेल तर बंदे पैसे आण."

जयरामचा चेहरा एकदम उतरला. काय करावं हे त्याला काहीच सुचेना. चिल्लर त्यानं खिशात टाकली व रडवेला

चेहरा करून तो आपल्या जागेवर बसला. इंगळे सरांनी जयरामकडे पाहिलं. त्याची अवस्था पाहून त्यांनाही वाईट वाटलं. ते त्याच्याजवळ गेले व त्याच्या पाठीवरून हात फिरवीत म्हणाले. "सुटे पैसे कां आणले?"

जयराम म्हणाला, "गुरू महाराजांजवळ सुटे पैसेच होते, ते त्यांनी दिले."

इंगळे सरांच्या सर्वकाही लक्षात आलं. ते म्हणाले, "अरे राजोऱ्याच्या श्री. तुकाराम पाटलांचा मुलगा ना तू?"

जयराम "हो" म्हणाला.

"इंगळे सर म्हणाले, "तुला माझं घर माहीत आहे का?"

जयराम "हो" म्हणाला.

श्री. इंगळे सर पुढे म्हणाले, "मधल्या सुटीत तू हे पैसे माझ्या घरी माझ्या पत्नीजवळ दे. मी तुझी फी जमा करतो."

अशाप्रकारे वर्षभर जयरामच्या फीचा भरणा होत होता.

नववीत गेल्यावर पूर्वानुभवामुळे जयराम त्याचे वर्गशिक्षक श्री. टी. एस्. भंगाळे यांना आधीच भेटला व त्यांना म्हणाला, "सर, फी भरताना माझ्याजवळ सुटे पैसेच असतील; कारण गुरू महाराज सुटे पैसेच देतात. तुम्हाला ते चालतील ना?"

श्री. भंगाळे सर म्हणाले, "जयराम, काळजी करू नको. सुटे पैसे चालतील. बुधवारच्या बाजारासाठी उपयोगी पडतील. सुटे पैसे मी माझ्याजवळ ठेवीन व तीन रूपये माझ्याजवळील फीच्या भरण्यात टाकत जाईन."

अशा रीतीनं जयरामचं नववीचं वर्ष पार पडलं.

जयराम दहावीत गेला. त्याचे वर्गशिक्षक त्यावेळी श्री. आसाराम सर होते. ते फारच कडक स्वभावाचे होते, हे जयरामला माहीत होतं. फीसाठी मिळालेली चिल्लर तो दुकानदाराला देत असे व त्याच्याकडून बंदे पैसे घेऊन तो फी भरत असे.

जयराम सत्पंथी मंदिरात केवळ राहण्यासाठी वा शिक्षणासाठी आला नसून कायमचा राहण्यासाठी आला आहे, हे जेव्हा मुख्याध्यापक श्री. आर्. पी. चौधरी यांना समजलं, तेव्हा त्यांनी प्रयत्न करून जयरामची फी माफ करायला लावली. तेव्हापासून चिल्लरच्या त्रासातून त्याची सुटका झाली.

हायस्कूलमध्ये शिकत असताना खाकी हाफ् पॅन्ट, पांढरा सयनचा शर्ट व डोक्यावर पांढरी टोपी असा जयरामचा पोषाख असायचा. त्याच्या कपाळावर नेहमी गंध लावलेला असायचा. बुजरा स्वभाव व आश्रमपध्दतीनं जयरामचं राहणं असल्यामुळे त्याची वागणूक अगदी साधी असायची. त्याचे कपडे स्वच्छ असायचे; परंतु त्यांना इस्तरी कधीच नसायची. त्याच्या वर्गातील विद्यार्थी त्याच्याजवळ जाऊन त्याला 'महाराज!' असं म्हणायचे. त्यांच्या अशा वागणुकीनं तो कधीच चिडला नाही. उलट त्यांनी 'महाराज!' अशी हाक मारल्यानंतर तो मनापासून हसायचा. त्याचं मनापासून हसणं पाहून मुलं स्वत:च शांत होऊन जायचे. जयरामचे त्यावेळचे वर्गबंधू श्री. पी. एन्. वाघुळदे ही हकीगत आजही हसतहसत सांगतात. त्यांच्या हसण्यात जेव्हा श्री जगन्नाथ महाराज सामील होतात, तेव्हा चाळीस वर्षांपूर्वीचा जयराम आपल्या डोळ्यांसमोर उभा राहतो.

१९५९ साली जयराम मॅट्रिक झाला. त्याची कॉलेजमध्ये जाण्याची इच्छा होती; परंतु त्यावेळी फैजपुरास कॉलेज नव्हतं व जळगावला वगैरे जाणं तर शक्यच नव्हतं; कारण प्रश्न पैशाचा होता. जयरामला संस्कृत शिकण्यासाठी काशीला जाण्याची इच्छा होती, तिला मुरड घालावी लागली. ज्योतिषशास्त्र शिकण्यासाठी त्याला पुण्याला जायचं होतं; परंतु त्यासाठीही त्याचे ग्रह अनुकूल नव्हते. श्री पुरुषोत्तम महाराजांनी त्याला सांगितलं, "जयराम तुझी शिकण्याची इच्छा आहे; परंतु माझ्याजवळ पैसे नाहीत. आपल्या मंदिरात जी पुस्तकं आहेत त्यांचाच तू अभ्यास कर."

तेव्हापासून जयरामनं ठरवलं, की मंदिरात राहूनच शक्य होईल तेवढा अभ्यास करायचा. शिकण्याची दुर्दम्य इच्छा व गुरूवरील श्रध्दा यांच्या बळावर जयरामचा चार भिंतींच्या पलीकडील अध्ययनाचा अध्याय सुरू झाला.

★ ★ ★



प. पू. आचार्य श्री जगन्नाथ महाराज यांचा दीक्षादान समारंभ दि. २७ जुलै १९६१

realpatidar.com

२. दिशा कर्तृत्वाच्या

जयरामनं मंदिरातच अभ्यासाला सुरुवात केली. प्रथमत: त्यानं दुर्मिळ ग्रंथांच्या नकलनवीसाचं काम केलं. जवळजवळ पाचसहा वर्षे त्यानं हे काम केलं. त्याचं अक्षर वळणदार असल्यामुळे मंदिरात येणारे लोक म्हणायचे, "जयराम महाराजांचं खिळे जोडण्याचं काम नेहमी सुरूच असतं." या कामामुळे जयरामला लिहिण्याची सवय लागली. संपूर्ण पूजेचे मंत्र,भजनावली, सत्पंथज्ञानसाहित्य, श्रीमद्दशावतार या ग्रंथांच्या नकला जयरामनं केल्यामुळे त्या ग्रंथांचं अनायासे वाचन होत गेलं.

वरील कामाव्यतिरिक्त मंदिरात प्रश्नांची उत्तरं शोधण्यासाठी जे कोणी येत, त्यांची उत्तरं शोधण्याचं काम जयरामकडेच होतं. बाहेरगावाहून काही लोक पूजा करून घेण्याकरिता येत. ते कामही जयरामकडेच होतं. दिवसातून ३० ते ३५ लोक शकुनावली पाहण्यासाठी येत. आठवड्यातून जयरामला कमीतकमी एकातरी पूजेसाठी बाहेरगावी जावं लागायचं.

जयरामच्याजवळ कल्पकता होती. शकुनावली आणि पूजा यांबाबत त्यानं कल्पकतेचा उपयोग करून घेतला. लोकांच्या श्रध्दा वाढीला लावण्यासाठी जयरामनं मंत्रांचा अर्थ मराठीतून समजावून सांगायला सुरुवात केली. मनातल्यामनात मंत्र म्हणण्याची पध्दती जयरामनं बंद केली. काही ठिकाणी तर लाऊडस्पीकरवरून पूजा झाल्या. पुण्यतिथी, कसणी, ग्रहशांती, दसवंत, सुक्रित, मानित, वास्तुशांती, उटासन, पिढी उटासन वगैरेंची पूजा करण्याचे उद्देश व त्यांची फलश्रुती लोकांना

समजल्यामुळे दानधर्माचं प्रमाण वाढलं. लोकांचं मंदिरात येणंजाणंही वाढलं. त्यामुळे जनसंपर्क वाढला. मंत्र जुनेच, परंतु तंत्र नवीन वापरल्यामुळे जयरामची प्रसिध्दी लोकमानसात हळूहळू वाढू लागली. रमलविद्येतील एक जाणकार व्यक्ती म्हणून लोक जयरामकडे पाहू लागले.

फैजपुरास १९६१ साली 'धनाजी नाना महाविद्यालय' सुरू झालं. जयरामची पुढे शिकण्याची इच्छा होती. श्री पुरुषोत्तम महाराजांजवळ तो त्यासंबंधी बोलला. ते म्हणाले, ''कॉलेजात जाऊन तू विशेष ते काय शिकणार? मंदिरात राहूनच सत्पंथी साहित्याचा अभ्यास कर. दुसरं असं, की धोतर नेसूनच तुला कॉलेजात जावं लागेल. जयरामला श्री पुरुषोत्तम महाराजांचं म्हणणं पटलं आणि तेव्हापासून कॉलेजात जाण्याचा विचार त्यानं मनातून झटकून टाकला. सत्पंथी साहित्याचा अभ्यास, सत्पंथी वैदिक तत्त्वज्ञानाचा प्रसार, सत्पंथी आचारधर्माचा प्रचार, सत्पंथी मंदिराचा जीर्णोध्दार व एकूणच सत्पंथीयांना नवीन दिशा देण्यासंबंधीचं चिंतन यांसाठीच सर्व आयुष्य वेचण्याचं त्यानं ठरवलं.

फैजपूरच्या सत्पंथी मंदिरात एकदा गावोगावचे लोक आले होते. मंदिरात त्यांची एक बैठक झाली. त्या बैठकीत त्यांनी जयरामला भगवी वस्त्रं देण्याचा विचार नक्की केला. २७ जुलै १९६२ हा दिवस गुरुपौर्णिमेचा असल्यामुळे त्या दिवशी जयरामला भगवी वस्त्रं प्रदान करावी असं ठरलं. त्या दिवशी मोठा उत्सव झाला. मंदिराचे पुरोहित श्री. विष्णु दीक्षित यांच्या हस्ते मंदिरात विष्णुयाग झाला. त्या दिवसापासून जयरामचं नाव बदलवून आचार्य श्री जगन्नाथ गुरू पुरुषोत्तम महाराज असं ठेवण्यात आलं.

काही दिवसांनंतर पीराणा येथील श्री रामजीकाका वारले. त्यांचे वारस म्हणून गादीवर श्री सवजीकाका आले. त्यावेळी कच्छमध्ये नानाअंगिया येथे चैत्र महिन्यात मंदिराचं उद्‌घाटन

व्हायचं होतं. श्री पुरुषोत्तम महाराज, श्री जगन्नाथ महाराज आणि इतर काही जण उद्‌घाटनासाठी गेले होते. श्री जगन्नाथ महाराजांनी जाप, कलशपूजा वगैरेंच्या बाबतीत अभ्यास करून बरोबर काही टिपणं घेतली होती. दुपारच्या वेळी श्री सवजीकाकांच्या हस्ते उद्‌घाटनाचा कार्यक्रम झाला. रात्री बाहेरून आलेल्या लोकांची भाषणं व्हायची होती. कोणकोण बोलणार यासंबंधी चर्चा सुरू झाली. श्री जगन्नाथ महाराज म्हणाले, ''मीसुध्दा बोलणार.'' जमलेले लोक हसू लागले. काही जण म्हणाले, ''त्यांची इच्छा आहे, तर बोलू द्या त्यांना. त्यांच्या वयावरून त्यांच्या ठिकाणच्या गुणांचा विचार करणं चूक आहे.''

संयोजक म्हणाले, ''ठीक आहे. यांना बोलण्यासाठी दोन मिनिटं वेळ द्या.''

श्री जगन्नाथ महाराज म्हणाले, ''दोन मिनिटं वेळ फार कमी होईल. निदान पाच मिनिटं तरी वेळ द्या.''

संयोजक म्हणाले, ''ठीक आहे. पाच मिनिटं तुम्हाला वेळ देऊ.''

रात्री आठ वाजता कार्यक्रमाला सुरुवात झाली. श्री जगन्नाथ महाराजांना स्टेजवर बोलावलं. स्टेजवर खूर्च्या ठेवलेल्या होत्या. श्री जगन्नाथ महाराज म्हणाले, ''माझे गुरू श्री पुरुषोत्तम महाराज खाली बसलेले असताना मी स्टेजवर खूर्चीवर बसणार नाही.'' त्यानंतर स्टेजवर आणखी एक खूर्ची आणली व त्या खूर्चीवर श्री पुरुषोत्तम महाराजांनाही बसावयास सांगितलं. दोन्ही गुरुशिष्य जवळजवळ बसल्यानंतर श्री. नाथूभाईंनी सत्कारपर भाषण केलं. वक्त्यांच्या परिचयात त्यांनी श्री जगन्नाथ महाराजांचाही परिचय करून दिला.

दोनतीन जण गुजराथीतून बोलल्यानंतर श्री. जगन्नाथ महाराजांची पाळी आली. श्री जगन्नाथ महाराज हिंदीतून बोलले.

त्यांनी कलशघटपाटपूजा, ज्योती स्वरूपातून श्री भगवंताचं ध्यान, अक्षरब्रह्म, युगधर्मानुसार श्री दशावताराचं विश्लेषण, जाप करण्याचं कारण, इमामशाहांच्या वाङ्मयातील पुनर्जन्माची कल्पना वगैरेसंबंधी अथर्ववेदाच्या आधारे भाषण केलं. ४५ मिनिटं केव्हा निघून गेली, हे कुणाच्या लक्षातही आलं नाही. सर्व लोक आश्चर्यचकित झाले. त्यांनी श्री जगन्नाथ महाराजांच्या भाषणाची स्तुती केली. भगवी वस्त्रं धारणं केल्यानंतर श्री जगन्नाथ महाराजांनी प्रचंड जनसमुदायासमोर केलेल्या आपल्या पहिल्याच भाषणानं लोकांची मनं जिंकून घेतली.

श्री जगन्नाथ महाराजांनी लोकांची मनं जिंकली; परंतु श्री सवजीकाकांचं मन मात्र दुखावलं गेलं. श्री जगन्नाथ महाराजांना इतरांनी चांगलं म्हटलेलं त्यांना आवडलं नाही. श्री जगन्नाथ महाराजांना लोकांनी चांगलं म्हटल्यामुळे जणू आपली किंमत कमी झाली, असा अशोभनीय कोता विचार त्यांच्या मनात निर्माण झाला. या कारणामुळे शेवटपर्यंत त्यांनी श्री जगन्नाथ महाराजांचा द्वेष केला.

पूर्वापार जी रूढी चालत आलेली आहे, तीच रूढी पुढे चालवावी असं सवजीकाकांचं मत होतं. श्री जगन्नाथ महाराजांची विचारसरणी पुरोगामी असल्यामुळे त्यांचे विचार श्री सवजीकाकांना रुचले नाहीत. या प्रसंगामुळे वडोद्याचे श्री. नाथूभाई साकरलाल जादव यांचा व श्री जगन्नाथ महाराजांचा परिचय झाला. या भल्या माणसाच्या संगतीत तेथील वास्तव्यात श्री जगन्नाथ महाराजांना आणि इतरांना फार मोठा दिलासा मिळाला.

१९६३ च्या सुमारास सुरत येथील सत्पंथी बांधवांनी सुरत ते पीराणा असा धर्मप्रसारासाठी पगपाळा संघ (पदयात्रा करणारा संघ) काढण्याचं ठरविलं. त्यांनी श्री जगन्नाथ महाराजांना त्या संघाचं प्रमुख बनविलं. सुरतहून पीराण्यास पायी जाण्यास जवळजवळ पंधरा दिवस लागणार होते. या संघात एकूण

पंचावन्न जण होते. फाल्गुन शुध्द पौर्णिमेस या संघाची पदयात्रा सुरू झाली. ठिकठिकाणी मुक्काम व्हायचा. सकाळी पाच वाजता उठून सहा वाजता प्रवासाला सुरुवात व्हायची. साधारणत: बारा ते एक वाजेपर्यंत पुढील मुक्कामाला पदयात्री पोचत असत. तेथे जेवण तयार असायचं. श्री. भगवानदास दालवाला हे मुक्कामाचं व जेवणाचं नियोजन आधीच करून ठेवत असत. मुक्कामाच्या ठिकाणी भजन, पूजन व प्रवचन व्हायचं.

प्रवासात वेगवेगळ्या पंथांचे लोक भेटत असत. त्यांच्याशी चर्चा करीत पदयात्रींची पदयात्रा सुरू होती. तेराव्या दिवशी पदयात्री पीराण्याला पोचले. तेथे पोचल्यावर श्री सवजीकाकांनी पदयात्रींचं स्वागत केलं नाही. सर्व लोक नाराज झाले. काकांनी भगवानदास, नगीनदास वगैरे लोकांना धारेवर धरलं. ते म्हणाले, ''तुम्ही दोन दिवस आधी का आलात? इथे अन्नसत्रावर बंदी घालण्यात आली आहे.'' वास्तविक अन्नसत्रावर बंदी वगैरे नव्हती. अन्न अनाठायी वाया घालवू नये म्हणून सरकारनं पोलीसपहारा बसविला होता.

कच्छ साबरकांठ्याचे कडवा पाटीदार लोक आणि सुरत खानदेश विभागातील राणा, कोळी, लेवा पाटीदार, गुजर, मराठा वगैरे लोक यांच्यांत जो जातीय वाद आहे, त्याचं दर्शन श्री जगन्नाथ महाराजांना या घटनेमुळे झालं आणि धार्मिक क्षेत्रातील या जातीयवादाबद्दल त्यांचं मन विषण्ण झालं. या संदर्भात त्यांनी आपल्या हस्तलिखित आठवणींच्या रजिस्टरमध्ये पृष्ठक्रमांक १५ वरील टीपेत विस्तृत विवेचन केलं आहे.

श्री जगन्नाथ महाराजांना धार्मिक क्षेत्रातील जातीयवादाचं दर्शन जरी झालं, तरी ते हतबल झाले नाहीत. कच्छमधील अनेक गावांना विविध प्रसंगांच्या निमित्तानं जाऊन, तेथे प्रवचनं वगैरे देऊन, ते तेथील पंथीयाना उद्बोधन करीतच राहिले.

'श्री सत्पंथी संस्थान, फैजपूर धर्मशाळा' या नावाची जिथे सध्या पाटी लावलेली आहे, त्या ठिकाणी चारशे वर्षांपूर्वी एक देऊळ होतं. हे देऊळ म्हणजे सत्पंथीयांचं देवघर होतं. इ. स. १८९८ मध्ये सध्या जिथं मंदीर आहे, तिथं नवीन जागी मंदीर बांधायला सुरुवात झाली. इ. स. १९०० मध्ये या मंदिराची शांती झाली. या मंदिरात पूजाअर्चा करण्यासाठी आणि संस्थानाची वहिवाट चालवण्यासाठी गादिपती बालब्रह्मचारी साधू असतात. शिष्यपरंपरेनुसार ही वहिवाट सुरू आहे. सत्पंथी अनुयायांतील कोणत्याही व्यक्तीस मंदिरात आपल्या अपत्यास बालब्रह्मचारी साधू म्हणून अर्पण करता येतं. हे बालब्रह्मचारीच सत्पंथी अनुयायांचे गुरू असतात. त्यांच्याकडून अनुग्रह घेतल्यानंतर ते त्यांचे गुरू होतात. असे असले तरी सद्‌गुरू इमामशाह महाराज हेच सत्पंथीयांचे एकमेव परमपूज्य सद्‌गुरू म्हणून मानले जातात.

फैजपूरचं सत्पंथी मंदीर हे अतिशय भव्य आहे. तेथील दरवाज्यावर सुरेख कोरीव काम आहे. या मंदिराचा दर्शनी भाग हा लाकडी खिडक्या व फडताळ यांनी युक्त असा असून, तेथील संपूर्ण कोरीव काम जवळजवळ पंचवीससव्हीस वर्षे चाललेलं असावं. १८७२ साली हे कोरीव काम सुरू झालं असावं; कारण तसा उल्लेख लाकडी टिटव्यांवर आहे.

मुख्य दरवाज्यातून प्रवेश केल्यावर आपला प्रवेश आठ चौक्यांच्या एका व्हरांड्यात होतो. आपल्या उजव्या हाताकडे दोन खोल्या आपल्याला दिसतात. त्यात गाद्या व इतर सामानसुमान ठेवलेलं असतं. आपल्या डाव्या हाताकडे आपल्याला पाय धुण्यासाठी टाकी दिसते. टाकीच्या बाजूला जिना आहे. तो जिना वरच्या मजल्यावर जाण्यासाठी आहे. जिन्याच्या पलीकडे सार्वजनिक स्वयंपाक घर आहे. पूर्वी येथे अर्धाभाग मोकळा होता. त्या मोकळ्या जागेत पाण्याचा आड होता. त्याच्याजवळ पूर्वी खिरणीचं झाड होतं. त्या झाडाला सत्पंथाचं निशाण

लावलेलं असायचं. या मंदिरावर दोन वेळेला पाढरं निशाण चढविलं जातं. गुढीपाडव्याला आणि २६ जुलैला, म्हणजे श्री पुरुषोत्तम महाराजांच्या पुण्यतिथीच्या दिवशी निशाण बदलविलं जातं. पूर्वेकडच्या भागाचा जीर्णोध्दार करण्यासाठी १८ मार्च १९९९ रोजी जीर्णोध्दाराच्या संदर्भात श्री. उदय दीक्षित यांच्या पौरोहित्याखाली पूजाविधीचा कार्यक्रम श्री जगन्नाथ महाराज यांच्या हस्ते पार पडला. मंदिराच्या या भागाच्या जीर्णोध्दाराचं काम सध्या सुरू आहे. स्वयंपाकघर वगैरेंचं बांधकाम या जागी व्हायचं आहे.

जिन्यावरून वर गेल्यावर चौदा चौक्यांचा एक मोठा हॉल आपल्याला दिसतो. त्याच्यापलीकडे अठ्ठावीस चौक्यांचा त्याला लागूनच दुसरा मोठा हॉल आहे. या चौक्या सहा बाय सहा फुटांच्या आहेत. या दोन हॉलच्यावरती बेचाळीस चौक्यांचा म्हणजे पंधराशे स्क्वेअर फुटांचा मोठा हॉल आहे. या हॉलच्या वरती टिनाची पत्रं बसवलेली आहेत. हा हॉल उत्सव वगैरे प्रसंगी मुक्कामाला आलेल्या सत्पंथीयांसाठी उपयोगी पडतो.

वरच्या मजल्यावर जवळजवळ एक हजार पुस्तके असलेलं ग्रंथालय आहे. ह्या ग्रंथालयात धार्मिक ग्रंथ वगैरे असून काही दुर्मिळ ग्रंथही आहेत. अठ्ठावीस चौक्यांचा जो हॉल आहे त्याला सभामंडप म्हटलं जातं. संपूर्ण मंदीर लाकडी खांबांच्या आधारावर उभं आहे. व्हरांड्यात तीन, मंदिरात अठरा, पहिल्या मजल्यावर एकवीस आणि दुसऱ्या मजल्यावर चोवीस असे एकूण सहासष्ट लाकडी खांब या पुरातन मंदिरात आहेत. एवढ्या खांबांवर उभं असलेलं हे मंदीर जुन्या धाटणीचं असलं तरी मोठं कलात्मक आहे. तेथील दर्शनी भागावरील कोरीव काम जसं मन आकर्षित करून घेतं, तसंच तेथील तळमजल्यावरील चित्रकाम मन थक्क करून जातं. मंदिरातील

तळमजल्यावर आधी साधं देवघर होतं. एक प्लॅटफॉर्म म्हणजे तेथील देवस्थान होतं. त्या देवस्थानात पुढे बदल झाला. ॐ, ज्योत, आणि कलश यांचा समावेश तेथे झाला. भूमीचं प्रतीक म्हणून चिनीमातीचा कलश तेथे आला.

१९६९ च्या सुमारास श्री. केशव बोरोले, श्री. पुंडलीक महाजन, श्री. भगवान भिरूड, श्री. हिरामण भिरूड, श्री. यमाजी झोपे वगैरे लोकांनी पुढाकार घेऊन मंदिराच्या देव्हाऱ्यात थोडा बदल घडवून आणला. पूर्वी दक्षिण व पश्चिमेच्या कोपऱ्यात देवस्थान होतं. तेथे प्रदक्षिणा घालण्यास जागा नव्हती. कोपऱ्यात बसून कलश, घटपाटपूजा व्हायची. पश्चिमेकडील भिंतीवर ज्योत लावलेली होती. कोनाड्यात एका काचेवर ॐ चं चित्रं काढलेलं होतं. सत्पंथीयांच्या दर्शनासाठी या सर्व गोष्टींची योजना केलेली होती. पूर्वी कोपऱ्यात देवस्थान होतं. तेथे दोन कोरीव काम असलेल्या महिरपी होत्या. अतिशय सुंदर कोरीव काम असलेल्या ह्या महिरपी १९२० च्या आसपास कोरलेल्या असाव्यात.

वर उल्लेख केलेल्या व्यक्ती श्री पुरुषोत्तम महाराजांजवळ आल्या व त्यांनी दर्शन घेण्याच्या जागेत व रचनेत बदल करण्याची कल्पना मांडली. महाराजांनी संमती दिल्यावर मंदिरातील देवस्थानात व एकूणच तळमजल्यावरील सुशोभिकरणात खूप बदल घडत गेले.

श्री जगन्नाथ महाराजांना वादनकला, लेखनकला, प्रवचनकला, वगैरे कला अवगत आहेत; त्याचप्रमाणे चित्रकलाही अवगत आहे. चित्ररूपानं सत्पंथातील तत्त्वज्ञान भिंतीवर जर चित्रित केलं तर ते कोणालाही, केव्हाही पाहता येईल, असा विचार करून श्री जगन्नाथ महाराजांनी मंदिरातील भिंतींवर चित्रं काढण्याचं ठरविलं. श्री पुरुषोत्तम महाराजांनी सुरुवातीला भिंतीवर चित्र काढण्यास त्यांना नकार दिला. श्री जगन्नाथ

महाराजांतील चित्रकार त्यांना स्वस्थ बसू देईना. त्यांनी हार्डबोर्डवर चित्रं काढण्याचं ठरविलं. परंतु चित्रं काढून त्यांना फ्रेम करणं वगैरे खटाटोप खर्चिक होता. त्याला त्यांना परवानगी मिळणं शक्य नव्हतं. काय करावं, हे श्री जगन्नाथ महाराजांना सुचेना. १९६५ साली त्यांनी भिंतीवर श्री हनुमानाचं चित्रं काढलं. श्री हनुमानाची भव्य मूर्ती श्री रामाचं ध्यान करीत आहे, अशा आशयाचं ते चित्र अजूनही आहे. श्री पुरुषोत्तम महाराजांना श्री जगन्नाथ महाराजांनी ते चित्र दाखविलं. त्यांना ते खूप आवडलं. ते म्हणाले, "जगन्नाथ, तू हार्डबोर्डवर चित्रं न काढता भिंतीवरच काढ; कारण, हार्डबोर्डचा खर्च आपणाला परवडणार नाही. तू चित्रं छान काढतोस, याचा मला अभिमान वाटतो."

श्री पुरुषोत्तम महाराजांची श्री जगन्नाथ महाराजांच्या पाठीवर शाबासकीची थाप पडल्यावर श्री जगन्नाथ महाराजांचा आनंद गगनात मावेनासा झाला. त्या दिवसापासून मंदिरातील सर्व भिंती जणू सजीव होऊन बोलू लागल्या. मंदिरात जिकडे नजर टाकावी तिकडे बोधवचनं व अक्षरश: शेकडो चित्रं चित्रित झाली. श्री जगन्नाथ महाराजांनी केवळ चित्रंच काढली नाहीत तर चित्रांच्या बाजूला त्यांची माहितीही दिली. मंदिरातील केवळ चित्रांवर जर कुणी लेखन केलं, तर त्यावर एक छोटं पुस्तक सहज तयार होऊ शकेल.

गीतातत्त्वज्ञानावर आधारलेली चित्रं, मुक्तिमार्गाचा नकाशा, पंचमहायज्ञ, नवविधाभक्ती, चतुर्विधभक्त, पंचविषयसेवन, षड्रिपुसेवन, देहाच्या चार अवस्था, मूळबंधावर आधारलेली चित्रं, योगवाशिष्ठावर आधारलेली चित्रं, सत्व-रज-तम या गुणांवर आधारलेली चित्रं अशी कितीतरी चित्रं महाराजांनी मंदिरातील भिंतींवर काढून मंदीर देखणं केलं. वैदिक तत्त्वज्ञानाचं श्री जगन्नाथ महाराजांनी घडविलेलं हे चित्ररूप दर्शन अनुपम असं आहे. भिंतींवर अधून-मधून जवळजवळ पंधरा-वीस मननीय

असे सुविचार आहेत. सुविचार आणि चित्रदर्शन यांच्या संगमातून श्री जगन्नाथ महाराजांनी वैदिक तत्वज्ञान जणू मुखर केलं आहे.

१९७० पर्यंत मंदिरातील भिंतींवर चित्रं काढण्याचं काम संपलं. एकदा पश्चिमेकडील भिंतीवर श्री जगन्नाथ महाराज श्री निष्कलंकी नारायणाच्या दरबाराचं चित्र काढत होते. ते चित्र काढत असताना वाड्यातील मंगला नावाची एक दहा वर्षांची मुलगी मंदिरात आली. ती मंदिरात नेहेमीच यायची. झाडलोट करण्यासाठी व भांडी घासण्यासाठी ती मदत करायची. चित्र काढत असलेल्या श्री जगन्नाथ महाराजांना ती म्हणाली, "महाराज, एक विचारू?"

महाराज म्हणाले, "विचार, काय विचारायचं ते."

ती म्हणाली, "देवांची तुम्ही इतकी सुंदर चित्र काढता. तुम्ही देव पाहिला आहे काय? का तुम्ही स्वत: देव आहात?"

मंगलाचे प्रश्न मोठे विचारप्रवर्तक होते. काय उत्तर द्यावं, हे श्री जगन्नाथ महाराजांना सुचेना. श्री जगन्नाथ महाराज देवादिकांची चित्रं काढतात; कारण त्यांना ईश्वरीस्वरूपाचा साक्षात्कार झाला असावा, असं मंगलाला वाटलं असावं आणि त्यामुळे तिनं तसे प्रश्न विचारले असावेत.

काय उत्तर द्यावं हे श्री जगन्नाथ महाराजांना सुचेना. मंगला पुन्हा म्हणाली, "सांगा ना महाराज?" शेवटी ते तिला म्हणाले, "मंगला, मी देवाला चित्रात पाहिलं आहे. तसंच स्वप्नातही पाहिलं आहे. मी देव नाही; परंतु मी देवासारखा होण्याचा प्रयत्न करीन."

या उत्तरामुळे मंगलाच्या चेहऱ्यावरून तिचं समाधान झालं असावं, असं श्री जगन्नाथ महाराजांना वाटलं. या प्रसंगानंतर जवळजवळ पंधरा दिवस श्री जगन्नाथ महाराज भावनगरला काही कामानिमित्त गेले. तेथून परत आल्यावर त्यांना मंगलाच्या

निधनाची बातमी कळली. तिला टॉयफाईड झाला होता. त्यातच तिचा अंत झाला. तिचे आईवडील तिच्या मृत्युसमयीच्या आठवणी जेव्हा श्री जगन्नाथ महाराजांना सांगू लागले तेव्हा त्यांना गहिवरून आलं. श्री जगन्नाथ महाराजांचा फोटो हृदयाशी धरून तिनं प्राण सोडला. मरताना ती म्हणाली, "महाराज, मला सोडून तुम्ही गावी निघून गेलात. आपली पुढे भेट झाली तर मला आपण ओळखाल ना? मी तुमच्या नावाचा जप करते."

संत्पंथात असे वयानं लहान, परंतु श्रध्देनं मोठे सद्भक्तही आहेत, हे श्री जगन्नाथ महाराजांच्या लक्षात आलं व त्यांना त्या भक्तांबद्दल अभिमान वाटला.

मंदिरात मोठी पायपेटी, लहान पेटी, तबला, डग्गा, झांज, मृदंग वगैरे भजनांची सर्व साधनं आहेत. पूर्वी श्री गणेशोत्सव, श्री दुर्गोत्सव, श्री शारदोत्सव वगैरे आले म्हणजे संगीतगायनाला व वादनाला रंग चढत असे. श्री जगन्नाथ महाराज स्वत: तबला वाजवायचे. मंदिरात पूर्वी अनेक रागांतील भजनं व्हायची. श्री जगन्नाथ महाराजही वेगवेगळ्या रागांतील भजनं म्हणायचे.

फैजपूरच्या सत्पंथी मंदिरातील बेबीताई म्हणजे जणू सत्पंथातील कीकीबाई होत. मंदिरात येणारी कुणीही व्यक्ती बेबीताईची विचारपूस केल्याशिवाय राहत नाही. बेबीताई ही फैजपूर येथील रेवा गोमा भारंबे यांची मुलगी. श्री पुरुषोत्तम महाराजांची पुतणी. वयाच्या सतराव्या वर्षीच तिचं लग्न झालं. काही घरगुती कारणामुळे १९६७ साली तिच्या पतीनं तिला घटस्फोट दिला. घटस्फोट झाल्यानंतर ती तिच्या वडिलांकडे राहू लागली. सत्पंथी मंदिरात तिचं येणंजाणं वाढलं. श्रीमद्भागवताचं वाचन तिनं सुरू केलं. भजनं म्हणण्याची तिला लहानपणापासून आवड असल्यामुळे ती भजनं म्हणू

लागली. मीराबाईची भजनं म्हणताना ती रंगून जाऊ लागली. घटस्फोटीत स्त्रीकडे लोक मात्र वेगळ्या नजरेनं पाहू लागले. लोक तिला नावं ठेऊ लागले. तिनं तिकडे दूर्लक्ष करून पूर्णपणे मंदिराच्या सेवेस वाहून घेतलं. मंदिरात येऊन झाडलोट करणं, भांडी घासणं, दळण निवडणं वगैरे कामं ती करू लागली. हळूहळू ती स्वयंपाकात लक्ष घालू लागली. श्री पुरुषोत्तम महाराजांनी तिला स्वयंपाक करायला परवानगी दिली; त्यामुळे श्री जगन्नाथ महाराजांना लेखन करण्यासाठी वेळ मिळू लागला.

परमार्थाचा मार्ग व विरक्त वृत्ती स्वीकारल्यामुळे बेबीताईनं संतचरित्रांचं वाचन सुरू केलं. तिनं संस्कृत श्लोक पाठ केले. ध्यानधारणा, नामस्मरण, भजन, पूजन वगैरे गोष्टींची तिला मुळात आवड असल्यामुळे ती त्यात अधिक रमू लागली. श्री जगन्नाथ महाराज तिला एकदा म्हणाले, "ताई, परमार्थ मार्ग फार कठीण असतो. लोक तुला पायीही चालू देणार नाहीत आणि घोड्यावरही बसू देणार नाहीत. दु:खाचे डोंगर तुला पार करावे लागतील. जनरीतीच्या प्रवाहाच्या विरूध्द जाणं सोपं नसतं; परंतु निर्धार असला तर बऱ्याच गोष्टी साध्य होतात."

ती म्हणाली, "महाराज, मला तुमच्या आशीर्वादाची गरज आहे. मला पुनर्विवाह करावयाचा नाही. मंदिराची सेवा करण्यातच मी माझं आयुष्य खर्च करायचं ठरवलं आहे. भवसागरातील दु:खांचा अनुभव मला आल्यामुळे परमार्थाकडे वळायचं मी ठरवलं आहे. माझा निर्धार पक्का आहे."

बेबीताईचा निर्धार, तिचं वैराग्य व अध्यात्माची तिला असलेली आवड लक्षात घेऊन श्री जगन्नाथ महाराजांनी तिला आपली गुरुबहीण मानलं. बेबीताईला अधूनमधून स्वकियांचा त्रास व्हायचाच. मंदिरातील सेवेच्या शिवाय ती शेतात जाऊन सर्व प्रकारची कामं करू लागली. शिवणयंत्र विकत घेऊन

ती कपडे वगैरे शिवून आपला उदरनिर्वाह करू लागली. मंदिरात सकाळसंध्याकाळ येऊन ती स्वयंपाक करू लागली. मंदिरात आल्यागेल्यांचं आतिथ्यही ती करू लागली. मंदिराशी ती एकरूप झाली. सत्पंथीमय झाली. हल्लीच्या काळात दुर्मिळ अशी विरक्ती आत्मसात करून भजन, पूजन, मंदिराची सेवा व सत्पंथाचा प्रचार यांत बेबीताईचा खारीचा वाटा असला, तरी तो विशेष उल्लेखनिय असा आहे. फैजपूरच्या सत्पंथी मंदिराशी तिचं जोडलं गेलेलं नातं हे अतूट असं आहे.

श्री जगन्नाथ महाराजांना विविध अशा तीर्थक्षेत्रांना भेटी देणं अतिशय प्रिय आहे. भारतातील बहुतेक सर्व धामांना त्यांनी भेटी दिल्या आहेत. अनेक उत्सवप्रसंगी त्यांनी तिथं हजेरी लावून आपल्या अध्यात्मिक ज्ञानाचा ठसा तेथील लोकांच्या मनावर उमटविला आहे. कच्छमधील मांडवी तालुक्यातील ममाईमोरा येथील एक प्रसंग मोठा मजेशीर आहे. तेथील पंचांनी श्री जगन्नाथ महाराजांच्या हस्ते नवीन पध्दतीनं कलशपूजा करायचं ठरविलं. पूजेला मुखी व साखीया आले होते. परंतु पूजेसाठी कुणीच पुढे येईना. श्री जगन्नाथ महाराजांनी पूजेला सुरुवात केली. तेथील काही लोकांत बाचाबाची सुरू झाली. ते म्हणाले, "तुम्हाला पूजा करता येणार नाही. आमचे मुखी पूजा करतील."

श्री जगन्नाथ महाराज म्हणाले, "ठीक आहे. मला हे आधी माहीत असतं तर मी ब्रम्हासनावर बसलो नसतो. माझ्याकडून तुमचा अपमान झाला म्हणून मी तुमची क्षमा मागतो."

श्री जगन्नाथ महाराज बाजूला झाले. त्यानंतर त्यांनी आपल्या भाषणात तेथील लोकांच्या अहंकाराबद्दल त्यांची योग्य शब्दात कानउघाडणी केली. त्यानंतर १९९० मध्ये मात्र ममाईमोरा

येथील लोकांनी श्री जगन्नाथ महाराजांच्या हस्ते होमहवन, पूजन, वगैरे करून घेतलं व त्यांची क्षमा मागितली; कारण त्यांनी केलेली चूक त्यांच्या लक्षात आली होती.

श्री पुरुषोत्तम महाराज कोर्टकचेऱ्यांमुळे अतिशय हवालदिल झाले होते. सावकारानं मंदिराला कुलूप लावल्यामुळे सत्पंथाचं कार्य थंडावलं होतं. कर्ज फेडण्यासाठी व कोर्टकचेऱ्यांसाठी पैसा कसा उभारावा या विवंचनेत श्री पुरुषोत्तम महाराज होते. श्री सद्गुरुकृपेने त्यांची ती विवंचना दूर झाली. १९७१ च्या सुमारास फुलाचेविरोदे येथील श्री. यमाजी शिवराम झोपे व त्यांचा मुलगा श्री. दलपत यमाजी झोपे यांनी मंदिराचं कुलूप काढून मंदिराचे दरवाजे खुले करावेत असं ठरवलं. श्री. यमाजी झोपे हे आंधळे होते, तरी त्यांच्या आंतरिक दृष्टीला मंदिराला लागलेलं कुलूप डाचत होतं. त्यांच्या परिवारातील लोकांनी सात बिघे जमीन विक्री काढली व ते सर्वजण मंदिरात आले. श्री पुरुषोत्तम महाराजांना त्यांनी सर्व हकीगत सांगितली. श्री पुरुषोत्तम महाराजांनी सावकाराशी बोलणी केली. तडजोड करून शेवटी एकवीस वर्षे मंदिराला लागलेलं कुलूप मोकळं झालं. फैजपूरच्या सतपंथी मंदिराच्या इतिहासात तो क्षण सुवर्णाक्षरांत लिहिला गेला. तेव्हापासून मंदिराची सारखी भरभराट होत गेली.

१९७२ मध्ये श्री जगन्नाथ महाराज गुजराथमध्ये साबरकांठा येथे गेले होते. तेथे त्यांना कळलं, की धनसुरा येथून 'जागृती' नावाचं एक मासिक निघतं. त्या मासिकात सत्पंथाविषयी अपप्रचार करणारा मजकूर प्रसिध्द झाला आहे. त्या संदर्भात श्री जगन्नाथ महाराज त्या मासिकाच्या संपादकांना भेटले. त्यांच्या सर्व शंकांचं त्यांनी साधार निरसन केलं. मासिकाच्या संपादकांना त्यांचं म्हणणं पटलं. त्यांनी श्री जगन्नाथ महाराजांची क्षमा मागितली.

श्री जगन्नाथ महाराजांनी पंथाचा प्रसार व प्रचार तर केलाच; परंतु त्यात कालोचित सुधारणा घडवून आणून, पंथासंबंधी जो अपप्रचार जनमानसात होता, तो दूर करण्याचा प्रयत्न केला. पंथाच्या दृष्टीनं त्यांचं हे अतिशय महत्त्वाचं कार्य म्हटलं पाहिजे.

१९७५ मध्ये खंबायत येथील लोकांनी ठरविलं की खंबायतहून रूण येथे 'पगपाळा' संघ (पदयात्रा करणारा संघ) काढावा. याही पदयात्रेचे प्रमुख श्री जगन्नाथ महाराजच होते. ही पदयात्रा केवळ तीन दिवसांची होती. या तीन दिवसांच्या पदयात्रेत श्री जगन्नाथ महाराजांच्या जीवनात एक चमत्कारिक प्रसंग घडला. आपल्या आठवणीत त्यांनी त्यासंबंधी लिहून ठेवलं आहे.

पलोल या गावी तेथील श्रीराम मंदिरात व श्री हनुमान मंदिरात श्री जगन्नाथ महाराजांचा मुक्काम होता. दुपारी ते विश्रांती घेत होते. एक व्यक्ती संघप्रमुखाचा तपास करीत श्री जगन्नाथ महाराजांकडे आली. अंगावर बंडी, तुलसीदासासारखी डोक्यावर टोपी व पंचा नेसलेली ती व्यक्ती पाहिल्यावर श्री जगन्नाथ महाराजांना खूप नवल वाटलं. त्या व्यक्तीनं श्री जगन्नाथ महाराजांना चंदन लावलं. श्री जगन्नाथ महाराजांनी त्या व्यक्तीला दक्षिणा देण्यासाठी आपल्या खिशात हात घातला. ते पाहून ती व्यक्ती म्हणाली, "मला दक्षिणा नको."

श्री जगन्नाथ महाराज म्हणाले, "मग तुम्हाला काय पाहिजे?"

ती व्यक्ती म्हणाली, "तुमच्याजवळ जी जपमाळ आहे, ती मला हवी आहे."

श्री जगन्नाथ महाराज म्हणाले, "ही माळ मला खंबायतच्या लोकांनी त्यांची आठवण म्हणून दिली आहे. ती तुम्हाला मी कशी देऊ? दुसरं काही मागा."

ती व्यक्ती म्हणाली, "ती माळ नका देऊ. तुम्ही रोज जी माळ जपता ती द्या."

श्री जगन्नाथ महाराज म्हणाले, "रोज जप करण्याची ती माळ आहे. ती कशी देता येईल? दुसरं काही मागा."

ती व्यक्ती म्हणाली, "एखादा शर्ट द्या."

श्री जगन्नाथ महाराज म्हणाले, "माझ्याजवळ एकच शर्ट आहे. दुसरं काही मागा."

तेवढ्यात श्री जगन्नाथ महाराजांभोवती लोक गोळा होऊ लागले होते. ती व्यक्ती श्री जगन्नाथ महाराजांना म्हणाली, "अरे पागल, तू मला काहीच देऊ शकणार नाही." नंतर त्या व्यक्तीनं "एक, दोन, तीन, चार," असं म्हणून यथाक्रम चार बाहया वाळून दाखविल्या. ती कुणीतरी एक अजब व्यक्ती आहे, हे श्री जगन्नाथ महाराजांच्या लक्षात आलं.

जमलेल्या लोकांतील कुणीतरी एक म्हणाला, "महाराज, तो पागल आहे. त्याच्याशी बोलू नका."

श्री जगन्नाथ महाराज म्हणाले, "तुम्ही यांना कशावरून पागल म्हणता?"

कुणीतरी एक म्हणाला, "यानं तुम्हाला पागल म्हटलं म्हणून."

सर्व लोक हसू लागले. ती व्यक्ती म्हणाली, "हसता काय? मी पागल आणि महाराजही पागल! तुम्ही मात्र शहाणे!"

लोकांचं हसणं थांबल्यावर ती व्यक्ती श्री जगन्नाथ महाराजांना म्हणाली, "तुम्हीच मला काय मागायचं ते मागा."

श्री जगन्नाथ महाराज म्हणाले, ''मला काही नको. सत्पंथी लोकांना मार्गदर्शन करण्यासाठी मला आयुष्य द्यावं, हेच माझं मागणं आहे.''

ती व्यक्ती म्हणाली, ''तेवढ्यासाठीच तर तुमचं आयुष्य आहे. भगवान तुमचं कल्याण करो!''

ती व्यक्ती लगेच निघून गेली. पागल निघून गेला म्हणून जमलेले लोकही विश्रांतीसाठी आपापल्या जागी निघून गेले.

त्या व्यक्तीच्या रूपानं जणू महाराजांची परीक्षा पाहण्यासाठी स्वत: श्री भाभाराम महाराज आले होते, असा भास श्री जगन्नाथ महाराजांना झाला. त्यांच्या पदयात्रेची आणि सत्पंथाच्या निदिध्यासाची ती फलश्रुती होती!

गुजराथमधून परत येत असताना श्री जगन्नाथ महाराजांचा मुक्काम श्री. नाथुभाईंच्या घरी होता. तेथे 'मूळबंध' नावाचा ग्रंथ त्यांना दिसला. श्री. नाथुभाईंना त्या ग्रंथाची नक्कल करून घ्यायची होती; परंतु त्या कामासाठी कोणी नकलनवीस मिळत नव्हता. श्री जगन्नाथ महाराजांनी ग्रंथाची नक्कल करून देण्याचं आश्वासन त्यांना दिलं; कारण त्यांना गुजराथी मोडी लिपी वाचता येत होती. दोन वर्षेपर्यंत श्री जगन्नाथ महाराजांनी त्या ग्रंथाची नक्कल करून तो ग्रंथ श्री. नाथुभाईंना परत केला. या लेखनकामाचा एक फायदा श्री जगन्नाथ महाराजांना झाला. तो असा, की त्यांनी त्या दुर्मिळ ग्रंथाच्या दोन प्रती झेरॉक्स करून घेतल्या होत्या. त्या प्रती त्यांच्या संग्रही राहिल्या.

१९७७ मध्ये श्री जगन्नाथ महाराज श्री. नाथुभाईंच्या वडिलांच्या अस्थींचं विसर्जन करण्यासाठी श्री. नाथुभाईंबरोबर गंगाघाटावर गेले होते. अस्तींचं विसर्जन केल्यावर ते बद्रिनाथ व केदारनाथ येथे जाण्याकरिता निघाले. तेथील यात्रेचं सुरेख काव्यमय वर्णन श्री. जगन्नाथ महाराजांनी आपल्या आठवणीत लिहून ठेवलं आहे. निसर्गसौंदर्य पाहिल्यावर श्री. जगन्नाथ

महाराजांसारख्या विरक्त व्यक्तीलाही काव्य स्फुरू लागतं, याचा प्रत्यय हे वर्णन वाचताना येतो.

आवाखल येथे 'श्रीमद्‌दशावतार' सप्ताह होता. त्या संदर्भातील श्री जगन्नाथ महाराजांनी लिहून ठेवलेली आठवण फारच महत्त्वाची आहे. त्या सप्ताहासाठी श्री. गोविंदभाई श्री जगन्नाथ महाराजांना आमंत्रण द्यायला आले होते. त्या सप्ताहात सत्पंथ हा वैदिक सनातन धर्म आहे, हे सिध्द करणं आवश्यक होतं; कारण पीराणा येथील सैय्यद शम्सुद्दीनबाबा यांनी 'श्रीमद्‌दशावतार' हा नवीन ग्रंथ छापून घेतला होता. त्या ग्रंथाचं विमोचन त्या सप्ताहात व्हायचं होतं. सप्ताहात वाचन जुन्या ग्रंथावरून करायचं की नवीन ग्रंथावरून करायचं, यासंबंधी वाद निर्माण झाला होता.

श्री जगन्नाथ महाराज नियोजित जागी पोचले. त्यांनी 'श्रीमद्‌दशावतार' हा मूळ जुना ग्रंथ वाचला होता तसाच 'श्रीमद्‌दशावतार' हा नवीन ग्रंथही वाचला होता. तेथे सैय्यद शम्सुद्दीनबाबा आले. त्यांनी नवीन ग्रंथाचं विमोचन झाल्याचं जाहीर केलं. कुणाचीही परवानगी न घेता ते आले होते. कुणालाही न सांगता ते निघून गेले. त्यांना वाटलं, की 'श्रीमद्‌दशावताराच्या' नवीन ग्रंथाप्रमाणे सप्ताह होईल; परंतु तो त्यांचा गैरसमज होता; कारण श्री जगन्नाथ महाराजांच्या उपस्थितीत तसं घडणं शक्यच नव्हतं.

श्री जगन्नाथ महाराज म्हणाले, "सत्पंथ हा वैदिक सनातन धर्म आहे. हे जर मी सिध्द करू शकलो नाही, तर मी प्रायश्चित घेईन." प्रचंड जनसमुदायात टाळ्यांचा कडकडाट झाला. त्यांनतर श्री जगन्नाथ महाराजांनी दहा अवतारांची कथा अध्यात्मशास्त्राशी कशी निगडीत आहे, त्यासंबंधी सखोल विवेचन केलं. नवीन 'श्रीमद्‌दशावतार' ग्रंथात गोमेधयज्ञाचा जो उल्लेख केला आहे तो मूळ 'श्रीमद्‌दशावतार' ग्रंथात नाही, हे श्री जगन्नाथ महाराजांनी निक्षून सांगितलं. केवळ

खोडसाळपणा करण्यासाठी तो प्रक्षिप्त भाग नवीन ग्रंथात असल्याचं त्यांनी सांगितलं. सर्वांनी श्री जगन्नाथ महाराजांना धन्यवाद दिले. काहीजण म्हणाले, "बापू, तुम्ही श्री सवजीकाकांचा गड जिंकला. आवाखल विभाग हा त्यांचा गड होता. तोच तुम्ही हस्तगत केला." श्री जगन्नाथ महाराजांचा सत्पंथाचा सखोल अभ्यास व कोणताही मुद्दा साधार पटवून सांगण्याची त्यांची वाक्शैली यांमुळे त्यांना हे शक्य झालं.

१९८२ च्या जुलै महिन्यात श्री पुरुषोत्तम महाराजांना एकदम थकवा जाणवायला लागला. २६ जुलैच्या रात्री ते संडासला गेले. परत येताना ते चक्कर येऊन खाली पडले. त्यांचा रक्तदाब वाढला होता. दुसऱ्या दिवशी नेहमीप्रमाणे ते सकाळी ४ वाजता उठले. त्यांना जळगावी दवाखान्यात न्यावं, असा विचार सुरू होता. ते म्हणाले, "मला जळगावला वगैरे नेऊ नका. माझ्या देहाचा आता भरवसा नाही."

बेबीताईनं स्वयंपाक केला. श्री पुरुषोत्तम महाराज म्हणाले, "जगन्नाथ, तू आणि ताई दोघेही जेवून घ्या. मला जेवावंसं वाटत नाही."

श्री जगन्नाथ महाराज म्हणाले, "काही कामानिमित्त ताई घरी गेली आहे. येईल लवकरच ती परत. ती आल्यावर आम्ही जेवण करू."

श्री पुरुषोत्तम महाराजांनी श्री जगन्नाथ महाराजांना जवळ बोलावलं. ते म्हणाले, "जगन्नाथ, तुझ्या कर्तृत्वाबद्दल मला समाधान आहे. चांगला शिष्य लाभल्यामुळे मी कृतकृत्य झालो. सत्पंथाच्या प्रचाराचं कार्य सतत सुरू ठेव. बेबीताई कुठे आहे?"

श्री जगन्नाथ महाराज म्हणाले, "ताई येतच असेल परत."


श्री पुरुषोत्तम महाराज म्हणाले, "जातो मी. माझा तुम्हांला आशीर्वाद आहे. जनतेची सेवा करा."

श्री पुरुषोत्तम महाराजांनी किंचित डोळे मिटले. श्री जगन्नाथ महाराजांनी त्यांच्या कानाजवळ तीन वेळा गायत्री मंत्राचा जप केला. त्यानंतर श्री पुरुषोत्तम महाराजांनी डोळे मिटले ते कायमचेच. श्री जगन्नाथ महाराजांनी जोरानं टाहो फोडला. तेवढ्यात बेबीताई आली. तिला तर रडणं अनावर होत होतं. हळूहळू सर्व अनुयायी आले. सर्वांचे डोळे भरून आले होते.


श्री पुरुषोत्तम महाराजांच्या कलेवराला मंदिराच्या मळ्यात मूठमाती दिली. तेथे काही दिवसांनी सुंदर समाधीमंदीर बांधले. त्या मंदिरात श्री धर्मा महाराज, श्री बारसू महाराज व श्री पुरुषोत्तम महाराज या तिघांच्या समाध्या आहेत.

श्री पुरुषोत्तम महाराजांची प्रथम पुण्यतिथी कानळदा येथील महर्षी कण्व ऋषींच्या आश्रमातील श्री चन्द्रकिरण महाराजांच्या उपस्थितीत साजरी झाली. २६ जुलै रोजी मोठी पूजा करून पुण्यतिथी साजरी झाली. २७ जुलै रोजी विष्णुयाग होमहवन होऊन खूप मोठी भव्य शोभायात्रा गावातून निघून, समाधीस्थानांपर्यंत गेली. तेथे श्री पुरुषोत्तम महाराजांच्या चरणपादुकांची स्थापना केली. तेव्हापासून दरवर्षी हा पुण्यतिथीचा महोत्सव मंदिरात साजरा होत असतो.

स्वामी चन्द्रकिरण महाराज एकदा सत्पंथी मंदिरात आले. ते श्री जगन्नाथ महाराजांना म्हणाले, "माझ्याजवळ भरपूर संपत्ती आहे. तुम्ही माझ्याजवळ कानळदा येथे रहा. मी तुम्हाला महामंडलेश्वर बनवीन किंवा जगद्गुरु शंकराचार्यांचा शिष्य बनवीन."



महाराष्ट्रातील फैजपूर
येथील शंभर वर्षांपूर्वीचे
सत्पंथी मंदीर



स्वामी चंद्रकिरण महाराज
कानळदा यांच्या हस्ते
गुरुचरण पादुकांची स्थापना



'श्री सत्पंथ नवनीत' ग्रंथाचं प्रकाशन :
आचार्य श्री संभूकाका महाराज ग्रंथ प्रकाशित करताना व
श्री नाथूभाई जादव अध्यक्षीय भाषण करताना



श्री. जगन्नाथ महाराजांचे चुलत बंधू श्री. विजयदादा यांच्या समवेत

श्री जगन्नाथ महाराजांना प्रथम वाटलं की ते थट्टा करीत असावेत; परंतु ती थट्टा नव्हती; कारण त्यांनी दोनतीन वेळा श्री जगन्नाथ महाराजांना त्या संदर्भात आग्रह केला. श्री जगन्नाथ महाराज म्हणाले, "मला संपत्तीची गरज नाही. पदाचीही नाही. पीराण्यालाही मला असाच आग्रह झाला; परंतु मला या गोष्टीत रस नाही. मी पंथाच्या प्रचारात लक्ष घातलं आहे. फैजपूरच्या सत्पंथी मंदिरातच राहून मला माझ्या परीनं कार्य करायचं आहे."

धानोरा, ता. चोपडा येथे पूर्वीपासून सत्पंथी मंदीर अतिशय उत्तम अवस्थेत आहे. येथे ऐंशी टक्के लोक सत्पंथी आहेत. येथील मंदिरात रूढीपरंपरेनुसार पूजाअर्चा सुरू असायची. या मंदिराशी व येथील लोकांशी श्री जगन्नाथ महाराजांचा संबंध आला. श्री जगन्नाथ महाराजांच्या लक्षात येथील पारंपरिक पध्दतीची पूजा आली. त्यांनी त्या पूजेत बदल घडवावा असं ठरविलं. श्री जगन्नाथ महाराजांनी तेथील लोकांना नवीन पूजेच्या संदर्भात खूप काही सांगितलं. लोकांना त्यांचं म्हणणं पटलं. त्यानी श्री जगन्नाथ महाराजांच्या म्हणण्यानुसार पूजेत अमूलाग्र बदल करण्याचं ठरविलं. महाराजांना ते गुरू मानू लागले व एकूणच त्यांच्या पारंपरिक पूजेत त्यांनी बदल घडवून आणला.

श्री जगन्नाथ महाराजांनी पीराणा येथे श्री करसनदासांना नव्या पध्दतीच्या पूजेबाबत सांगितलं. त्यांनाही श्री जगन्नाथ महाराजाचं म्हणणं पटलं. श्री जगन्नाथ महाराजांच्या विनंतीनुसार श्री करसनदासांनी एक आदेश प्रसिध्द केला. तेव्हापासून धानोरा येथे नवीन पध्दतीनुसार पूजा होऊ लागली. एवढेच काय परंतु या आदेशामुळे बहुतेक ठिकाणी नवीन पूजापध्दती सुरू झाली. श्री जगन्नाथ महाराजांची ही पुरोगामी वृत्ती विशेष उल्लेखनीय आहे. काळानुसार बदललं पाहिजे, असं सतत त्यांना वाटत असतं.

श्री पुरुषोत्तम महाराजांच्या मृत्यूनंतर श्री जगन्नाथ महाराजांनी मंदिराचा जीर्णोध्दार करायचं ठरवलं. त्यांच्या सत्पंथविषयक सत्कार्यामुळे व श्री पुरुषोत्तम महाराजांच्या पुण्याईमुळे त्यांना पैशाची कधीच उणीव भासली नाही. त्यामुळे मंदिराचा फार चांगला जीर्णोध्दार झाला. अजूनही जीर्णोध्दाराचं काम सुरू आहे. मंदिराचा जीर्णोध्दार झाल्यामुळे त्याच्या अंतर्बाह्य सौंदर्यात भर पडली आहे. "श्रध्दास्थानं ही रमणीय, सुंदर व स्वच्छ असावीत", असं श्री जगन्नाथ महाराज नेहमी म्हणत असतात. आणि त्या दृष्टीनं त्यांचे सतत प्रयत्न सुरू असतात.

★ ★ ★



संतकृपा आश्रमाचा भूमिपूजन समारंभ :
आचार्य श्री करसनदासजी महाराज यांच्या हस्ते



समाधीस्थळी आचार्य श्री करसनदासजी महाराज व श्री नानजी महाराज
अन्य लोकांसमवेत पुष्पांजली अर्पण करताना



दीक्षादान समारंभ : आचार्य श्री जनार्दन महाराज,
आचार्य श्री जगन्नाथ महाराज, आचार्य श्री पूर्णानंद महाराज,
पुरोहित श्री उदय महाराज



श्री जगन्नाथ महाराज 'मूळबंधा' वर प्रवचन करताना :
श्री शामजीदादा, श्री मोहनभाई व शिष्यगण

३. संतकृपा आश्रम

सत्पंथी मंदिराच्यासमोर प्रेक्षणीय असा 'संतकृपा आश्रम' आहे. या आश्रमाचं उद्घाटन दिनांक २०/२/९७ रोजी गुरुपुष्यामृताच्या मुहूर्तावर झालं. आश्रमात दोन बाजूंनी प्रवेश करता येतो. पूर्वेकडून आणि दक्षिणेकडून. आपण दक्षिणेकडून आधी प्रवेश करू. प्रथमत: व्हरांड्यातील फुलझाडांच्या कुंड्या आपलं लक्ष वेधून घेतात. सुरेख अशा प्रवेशद्वारातून प्रवेश करण्यापूर्वी प्रवेशद्वारावर कोरलेली पुढील ओळ आपण मनात वाचतो. "वह देश पावन है। वह कुल पवित्र है। जहाँ संत जन्म लेते है।" या ओळीच्या खाली भिंतीत बसवलेली गणपतीची मूर्ती आपल्याला दिसते. उंबरठा ओलांडून आपण आश्रमात प्रवेश करायला जातो; परंतु आपण उंबरठा ओलांडत नाही; कारण अतिशय स्वच्छ आणि मंगल अशा आश्रमात पादत्राणासहित आपल्याला जावंसं वाटत नाही. साहजिकच पादत्राणं पायापासून अलग होऊन व्हरांड्यात आपली जागा घेतात. उंबरठ्याच्या आत पाऊल टाकणार तेवढ्यात 'बालबालिका संस्कार केंद्र' अशी तांबड्या शाईतील प्रवेशद्वारावरील ओळ आपल्याला दिसते; म्हणजे आश्रम लहान मुलांच्या संस्कारांचे एक केंद्र देखील आहे, याची आपल्याला कल्पना येते.

उंबरठा ओलांडून आत प्रवेश करताच दरवाज्यावर गुरू दत्तात्रेय यांची मूर्ती दिसते. तिला नतमस्तक होऊन आपण चाळीस फूट लांब आणि पंचवीस फूट रुंद अशा एका मोठ्या हॉलमध्ये आलेलो असतो. आपल्याबरोबरची व्यक्ती

आपल्याला सांगते, "या ठिकाणी संस्कार केंद्रात जवळजवळ दोनशे विद्यार्थी एकत्र येतात. रविवारी एक तास हे विद्यार्थी ह्या ठिकाणी असतात." आपल्या मनात एक शंका निर्माण होते, की एवढा सुंदर हॉल आणि त्याचा उपयोग फक्त रविवारी? साहजिकच आपण त्या व्यक्तीला विचारतो, "एरव्ही या ठिकाणी काय असतं?" त्या व्यक्तीच्या चेहऱ्यावर थोडंसं स्मित दिसतं. ती म्हणते, "बाल-बालिकांच्या मनावर संस्कार करण्याचा प्रयत्न या हॉलमध्ये होतो. प्रौढांच्या मनावर संस्कार व्हावेत म्हणूनही ह्या हॉलची धडपड असते. म्हणून प्रौढांसाठीही हा सत्संग हॉल आहे."

एकूणच हॉल पाहिल्यावर मनाला प्रसन्न वाटतं. हल्लीच्या काळात अशा संस्कारकेंद्राची खूप आवश्यकता आहे, हे आपल्या लक्षात येतं आणि आश्रमानं अंगीकारलेल्या उपक्रमाबद्दल आपल्याला आदर वाटू लागतो. सत्संगाबद्दल आपण जेव्हा त्या व्यक्तीला विचारतो तेव्हा पुन्हा तिच्या चेहऱ्यावर स्मित दिसू लागतं. ते स्मित जणू सुचवीत असतं, की हे काय विचारणं झालं?

दक्षिणेकडील भिंतीकडे या टोकापासून त्या टोकापर्यंत ती व्यक्ती केवळ अंगुलीनिर्देश करते. आपल्या लगेच लक्षात येतं. भिंतीवरील संतांची फोटोसहित चरित्रं आपण पाहू लागतो व मनात वाचू लागतो. अतिशय उत्तम फोटो. थोडक्यात संतांबद्दलची व त्यांच्या कार्याबद्दलची माहिती तेथे असते. गाडगेबाबा, चैतन्यमहाप्रभू, गुरुनानक, समर्थ रामदास, मीराबाई, नामदेव, तुलसीदास, कबीर, ज्ञानेश्वर, एकनाथ व तुकाराम या संतांचे फोटो पाहून झाल्यावर व त्यांच्याबद्दलची माहिती वाचून झाल्यावर आपल्याला सत्संग झाल्याचा आनंद वाटतो. याच भिंतीवर श्री दत्तात्रेय महासिध्द यंत्र फ्रेममध्ये बसविलेलं

आहे, ते पाहिल्यावर आपण उजवीकडे वळणार तेवढ्यात काय कुणास ठाऊक? आपल्या मनात सहज एक शंका निर्माण होते. आपण त्या व्यक्तीला विचारतो, "या फोटोत साईबाबा आणि गजानन महाराज यांचे फोटो नाहीत?" त्या व्यक्तीच्या चेहऱ्यावर पुन्हा स्मितहास्य. ती म्हणते, "अजून तीन भिंती पहावयाच्या आहेत. घाई करू नका एवढी."

पश्चिमेकडील भिंतीकडे आपण वळतो. सत्पंथाचे संस्थापक श्री इमामशाह महाराज यांची अतिभव्य मूर्ती आपलं लक्ष एकदम वेधून घेते.

मूर्तीच्या पाणीदार डोळ्यांतून एक अनोखे तेज ओसंडताना दिसते. "जयपूरच्या सूरज मूर्तिकला केंद्रातील कलावंतानं पांढऱ्या-शुभ्र संगमरवरातून साकार केलेली ही मूर्ती, मूर्तीच्या रूपात प्रथमच साकार झाली. याआधी सर्वत्र इमामशाह महाराजांचे केवळ फोटो होते." ती व्यक्ती ही माहिती सांगत असते. आपण ऐकत असतो आणि पहातही असतो. भगवा फेटा व भगवं उपरणं यांमुळे इमामशाह महाराजांची मूर्ती अधिकच शोभायमान दिसत असते. "या मूर्तीचा खर्च फुलाचेविरोदे येथील झोपे परिवार यांनी केलेला आहे", अशी ती व्यक्ती म्हणते. मूर्तीच्या मागे स्वत: जगन्नाथ महाराजांनी पेन्ट केलेलं वेदवचनांचं इंद्रधनू पाहत राहावं की तेथील मजकूर वाचत राहावा अशी आपली अवस्था झालेली असते. "मूर्तीचं वजन सहा क्विंटल असून ती सव्वातीन फूट उंच व दोन फूट रुंद आहे." अशी माहिती ती व्यक्ती सांगत असते आणि त्यामुळे आपलं लक्ष वेदवचनांतून विचलित होतं.

श्री करसनदास महाराज, श्री निष्कलंकी नारायण आणि श्री इमामशाह महाराज यांच्या तसबिरी आपलं लक्ष वेधून

घेतात. तसबिरीतील योगेश्वर शंकराकडे आपण एकटक बघत राहातो. "चलूया पुढे," असं आपण त्या व्यक्तीला म्हणतो आणि ती व्यक्ती खळखळून हसते. नंतर ती व्यक्ती म्हणते, "इमामशाह महाराजांची मूर्ती तुम्ही पाहिली. तुम्ही खूप प्रभावित झालात. या मूर्तीसाठी जे लाकडी सिंहासन आहे ते नाही तुम्ही पाहिलं? कोंदणाशिवाय हिऱ्याचं तेज नाही फाकत. पन्नास हजारांची मूर्ती. तिच्यासाठी सिंहासनही तसंच नको का? मंदिराच्या दर्शनी भागावरील खिडक्यांवरच्या कोरीव कामानं तुम्ही प्रभावित झालात. शतकापूर्वी कोरीव काम करणारे कलावंत सुतार होते, याचं तुम्हाला आश्चर्य वाटलं. विसाव्या शतकात पिलर, बिम आणि स्लॅबच्या काळात तुम्हाला वाटलं, की कारागिरी संपली; परंतु तसं नाही. कारागिरी आहे. कारागीरही आहेत; परंतु कुणालाही वेळ नाही. घड्याळाबरोबर धावणारे सारे जण. शिवाय वृक्षहत्या करणारे आपण. अशा काळातही श्री. मुरलीधर मिस्त्रीसारखा एखादा कारागीर असतोच. त्यांनी तयार केलेलं सिंहासन बघा किती अप्रतिम आहे. पन्नास हजारांच्या मूर्तीसाठी तीस हजारांचं सिंहासन! संतकृपा आश्रमातील सिमेंटयुक्त संपूर्ण महिरपींचं कोरीव काम व इतर नक्षीकाम फैजपूर येथील श्री. अरमान मिस्त्री यांनी मन लावून केल्यामुळे तेही कलात्मक झालं आहे."

आपल्या डोळ्यांचं पारणं फिटतं न फिटतं तोच आपलं लक्ष पितळेचं कमळ व त्यावरील कलश ह्यांकडे वळतं व आपल्या मुखातून शब्द बाहेर पडतात, "फारच छान!"

ती व्यक्ती म्हणते, "पैसा असला की सर्व काही छान होतं. पूर्वेकडील भिंतीवर फुलाचेविरोदे या गावचे श्री दलपत यमाजी झोपे ह्यांचा फोटो लावलेला आहे तो पहा.

ज्या झोपे परिवारानं १९७१ साली मंदिराला लागलेलं कुलूप पैसे भरून उघडून दिलं, त्याच झोपे परिवारानं परंपरेनं दानधर्म करून मूर्तीचा खर्च केला. हल्ली जळगाव येथे राहणारे श्री. यादव केशव बोरोले यांनी सिंहासनासाठी पैसे दिले. त्यांचाही फोटो पूर्वेकडील भिंतीवर आहे. तो पहा.''

सामान्य शेतकरी कुटुंबातील या माणसांनी आपल्या परिश्रमाच्या पैशातून वेचलेलं हे धन पाहून त्यांच्या औदार्याबद्दल आपल्या मनात कृतज्ञतेची भावना निर्माण होते. पूर्वेकडील भिंतीवरील त्यांच्या फोटोकडे आपण साहजिकच मोठ्या आदरानं पाहू लागतो. त्यांचे फोटो पाहता पाहता त्यांच्या अवतीभोवती आपल्याला तसबिरी दिसतात. त्या विठ्ठल, विश्वकर्मा, नवनाथ, सूर्यनारायण, योगेश्वर, साईबाबा, आणि गजानन महाराज यांच्या. आपल्याला आपल्या प्रश्नाचं उत्तर मिळालेलं असतं, हे त्या व्यक्तीच्या लक्षात येतं; कारण तिच्या स्मितहास्यावरून ते आपल्या लक्षात आलेलं असतं.

उत्तरेकडील दरवाज्याकडे आपण वळतो. दरवाज्यातून आपला पाय बाहेर पडत नाही; कारण दरवाज्याच्या दोन्ही बाजूंस असलेली अतिभव्य अशी दोन तैलचित्रं आपल्याला खिळवून ठेवतात. चार बाय सहाची ही तैलचित्रं खिरोदा येथील 'सप्तपुट ललित कला भवन'मधील सुप्रसिध्द चित्रकार प्रा. श्री. प्रकाश तांबटकर यांनी तयार केलेली आहेत हे आपल्या लक्षात येतं. ही चित्रं पाहून आपल्या मनात विचार येतो, की तैलचित्रंही काही कमी परिणामकारक नसतात. त्यांच्या माध्यमाची नेमकी नस मात्र कलावंताला सापडायला हवी. ती सापडली की प्रतिसृष्टी तो निर्माण करू शकतो. ह्या सृष्टीच्या अवलोकनासाठी, तिच्या रसास्वादासाठी रसिकाजवळ क्षमता मात्र हवी.

जवळजवळ बारा-तेरा हजारांचं एक तैलचित्रं. श्री इमामशाह महाराजांच्या तैलचित्रासाठी श्री हरिभाऊ वामन नारखेडे यांनी देणगी दिलेली असते, हे त्यांच्या फोटोखालील माहितीवरून लक्षात येतं. मंदिरातील महिला भजनी मंडळानं श्री जगन्नाथ महाराजांच्या तैलचित्रासाठी देणगी दिलेली असते. सत्पुरुषांची स्मृती जतन करण्यासाठी आणि कलेला वाव देण्यासाठी ह्या उदारधींनी जे औदार्य दाखवलं त्याबद्दल त्यांचं आपल्याला खूप कौतुक वाटतं.

उत्तरेकडील दरवाज्यातून बाहेर पडल्यावर आपल्याला दोन जिने दिसतात. एक जिना पहिल्या मजल्यावर जाण्यासाठी असतो व दुसरा तळघरात जाण्यासाठी असतो. आपण त्या व्यक्तीला विचारतो, "तळघर कशासाठी?"

ती व्यक्ती म्हणते, "वीस बाय वीसचं हे तळघर योगशिक्षणासाठी व ध्यानधारणेसाठी आहे."

आश्रमनिर्मात्याच्या द्रष्टेपणाची आपल्याला कल्पना येते. "छान!" असा उद्‌गार आपल्या मुखातून बाहेर पडतो. आपली पावलं वर जाणाऱ्या जिन्याकडे वळलेली पाहून ती व्यक्ती म्हणते, "घाई करू नका. तुम्हाला आश्रम बघायचा आहे ना? मग जरा बारकाईनं बघा. दोन पावलं पुढं चला. पूर्वाभिमुख व्हा. म्हणजे मी काय म्हणतो ते आपल्या लक्षात येईल."

पूर्वाभिमुख झाल्यावर आपण उद्‌गारतो, "अरे वा! आश्रमात प्रवेश करण्यासाठी ही पूर्वेकडची वाट!"

"या." असं म्हणून ती व्यक्ती पूर्वेकडे काही पावलं चालत जाते. आपणही तिच्यामागे जातो. पूर्वेकडील लोखंडी ग्रीलचं गेट उघडलं जातं. गेटच्या बाहेर मुख्य रस्त्यात आपण आलेलो असतो. गेटच्या वरती सिमेंटची महिरप. महिरपीच्या

शिरोभागी ॐ. त्याच्याखाली 'संतकृपा आश्रम' हे दोन शब्द. आपण मान उंच करून पाहतो न पाहतो तेवढ्यात ती व्यक्ती म्हणते, "आता चला आत." आपल्या लक्षात आलेलं असतं, की दक्षिणेकडील प्रवेशद्वाराचं स्वरूप वेगळं आणि पूर्वेकडील प्रवेशद्वाराचं स्वरूप वेगळं. बालबालिका संस्कार केंद्र असल्यामुळे त्याच्यासाठी अनुरूप असं पूर्वेकडचं प्रवेशद्वार. आणि सत्संग साधण्यासाठी अनुरूप असं दक्षिणेकडचं प्रवेशद्वार. दुतर्फा वेगवेगळ्या फूलझाडांच्या ठेवलेल्या कुंड्या विविध प्रकारच्या फुलांनी बहरलेल्या असतात. मध्यभागी छानपैकी कारंजे. त्याच्यापुढे तुळशीवृंदावन. तुळशीवृंदावनाला एका पट्टीवर आयताकृती असा पत्रा बसविलेला असतो. त्याच्या एका बाजूस अश्वत्थाची प्रार्थना लिहिलेली असते. दुसऱ्या बाजूस तुलसीवंदन अक्षरांकित झालेलं असतं. प्रार्थना आणि वंदन आपलं लक्ष वेधून घेतात. संस्कृतात त्यांची रचना असली तरी मुलं सहज पाठ करतील अशा पध्दतीनं त्यांची अर्थपूर्ण मांडणी केलेली आहे, हे आपल्या लक्षात येतं. तेवढ्यात रस्त्याच्या पलीकडे असलेल्या अश्वत्थाची सळसळ आपल्या कानी येते. मूर्तिमंत चैतन्य जणू साकार झालं, असा भास आपल्याला होतो. तेवढ्यात ती व्यक्ती म्हणते, "तळमजल्यासाठी स्वतंत्र संडास-बाथरूमची व पाण्याची व्यवस्था करून ठेवलेली आहे. आश्रम असला तरी ह्या गोष्टींची गरज असतेच."

अश्वत्थाच्या पानांची सळसळ पुन्हा कानावर आली. त्याच्याकडे वळून पाहिलं. तेव्हढ्यात ती व्यक्ती म्हणाली, "चला, वरच्या मजल्यावर जाऊ." त्या व्यक्तीच्या पाठोपाठ जिना चढून वर गेल्यावर आपण मनात म्हणतो, "अरे, ह्या अतिथींच्या राहण्यासाठी छानपैकी तीन खोल्या. अतिथींसाठी स्वतंत्र संडास-बाथरूमची व्यवस्था."

गच्चीवर जाण्यासाठी समोर जिना दिसतो. तिकडे आपण वळणार तेवढ्यात ती व्यक्ती म्हणते, "बंगईवर बसा थोडा वेळ." ज्या बंगईवर थोर संत बसून गेले असतील तिच्यावर थोडा वेळ बसायला आपल्यालाही काय हरकत आहे, असं आपल्याला वाटतं. आपण तिच्यावर बसतो; अलगद झोका घेतो. खूप बरं वाटतं. मनात आंदोलनं सुरू होतात : हल्लीच्या काळात श्री जगन्नाथ महाराजांनी केवढं कार्य केलं हे! सत्संगासाठी केवढे हे प्रयास! त्यासाठी त्यांनी वेचलेलं तन, मन आणि धन! मुखवटे चढवलेल्या माणसांसाठी केवढे हे प्रयत्न!

"माणूस बदलला पाहिजे. सदाचारी झाला पाहिजे." भ्रष्टाचाराचे डोंगर त्याच्यासमोर उभे असताना श्री जगन्नाथ महाराजांच्या ह्या म्हणण्याला काही अर्थ आहे का? अर्थ आहे. कोणत्याही व्यक्तीची कोणतीही कृती निरर्थक नसते. कृतीमागचा हेतू मात्र स्वच्छ पाहिजे. श्री जगन्नाथ महाराजांना या आश्रमाच्या उभारणीतून काय मिळवायचं आहे? प्रसिध्दी? पैसा? नाही. यातलं त्यांना काहीच नको आहे. ते त्याच्यापलीकडे गेले आहेत. त्यांना एकच गोष्ट हवी आहे आणि ती म्हणजे जनकल्याण! ह्यासाठीच त्यांनी मंदिराला आणि आश्रमाला वाहून घेतलं आहे.

"हल्ली प्रदूषण सर्वत्रच आहे. धार्मिक स्थळंही त्याला अपवाद कशी असतील? या प्रदूषणाचं वारं इथं शिरू द्यायचं नाही. सर्वठायी शिरलेल्या ह्या प्रदूषणावर उतारा म्हणून असल्या धार्मिक स्थळांची फार गरज आहे." असं श्री जगन्नाथ महाराज म्हणतात. त्यांच्या म्हणण्याला अर्थ आहे; कारण असली स्थळं माणसाला नतमस्तक व्हायला लावतात. त्याच्या ठिकाणचे दंभ, लोभ, मद, मत्सर वगैरे त्यामुळे काबूत राहू शकतात.

श्री जगन्नाथ महाराजांच्या या प्रत्यक्ष कार्याला खूप महत्त्व आहे. त्यांची सम्यक् दूरदृष्टी, त्यांची मानवी जीवनासंबंधीची कळकळ, त्यांची व्यापक धर्मभावना व त्यांची परिश्रमनिष्ठा विलोभनीय आहे. केवळ गादीवर बसून इतरांना उपदेश करीत, स्वत: निष्क्रीय राहून त्यांनी फोल असा उपदेश कधीच केला नाही. सन्मार्गाला माणूस लागावा, आपल्या क्षणभंगूर अशा आयुष्याची त्याला जाणीव व्हावी व त्यानं काहीतरी संचित मागे ठेवून जावं, यांसाठीच त्यांची सारी धडपड असते.

झोका थांबला होता. ती व्यक्ती म्हणाली, ''अहो, आपल्याला अजून गच्चीवर जाऊन टॉवर पाह्यचा आहे. तिथं जाण्याच्या आधीच तुम्ही मनानं जणू तिथं जाऊन आलात, असं मला वाटलं. काही हरकत नाही. हा सत्संग आश्रमाचा परिणाम बरं का! चला, जाऊया गच्चीवर.''

त्या व्यक्तीच्या मागून आपण जिना चढून वर जातो. खूपच प्रसन्न वाटतं. वर निळं आकाश. लख्ख प्रकाश. वाऱ्याची मंद झुळूक. स्वच्छ अशा त्या गच्चीवर उभं राहून टॉवरकडे मान उंच करून पाहताना टॉवरवरचं घड्याळ आपल्याला दिसतं. एवढ्यात अर्ध्या तासाचा एक ठोका पडतो. त्याचा आवाज आसमंतात भरून राहतो. आसमंतातच भरून राहतो असं नाही, तर दोन किलोमिटरपर्यंत त्याचा आवाज ऐकू येतो. का नाही ऐकू येणार? घुमटातील ५० किलोची घंटा घनामुळे वाजते ना!

कालगतीच्या त्या निदर्शकाला उच्च स्थानी बसवून फार मोठं औचित्य साधल्याचं आपल्या लक्षात आलं. 'काळाबरोबर चला. सतत कार्यरत रहा. काळ कठिण असला तरी जीवनात सदाचारांची उत्तुंगता हवी असेल, तर त्यासाठी सत्संग हा

एक मार्ग आहे,' असं जणू तो सूचित करीत आहे, असं आपल्याला वाटलं.

"आठवड्यातून एकदा घड्याळाला चावी द्यावी लागते," असं जेव्हा ती व्यक्ती सांगते, तेव्हा आपल्या मनात विचार येतो: निसर्ग आणि मानव यांच्यात केवढं अंतर! घड्याळ शेवटी मानवनिर्मित. त्याला मर्यादा असणारच. अनादी काळापासून नित्य उगवणाऱ्या आणि मावळणाऱ्या सूर्याची भ्रमणक्रिया कधी चावीअभावी थांबली आहे? केवढी चित्‌शक्ती ती!

त्या चित्‌शक्तीचं सामर्थ्य आपणाला जाणवलं, तरीपण मानवाच्या कर्तृत्वशक्तीला काही कमी महत्त्व आहे असं नाही. टॉवरवरचं घड्याळ केवळ एकाच बाजूला आहे असं नाही, तर चारही बाजूंना तिथं चार घड्याळं आहेत. बिडाची पांढरी शुभ्र डायल. फायबरची काच. उन, पाऊस व वारा यांचा कितीही मारा झाला तरी टिकून राहिलं पाहिजे ना त्या घड्याळांनी! म्हणून तर त्यांची तशी भक्कम घडण. हीच तर मानवाची कर्तृत्वशक्ती!

जमिनीपासून सत्तर फूट उंच व गच्चीपासून चाळीस फूट उंच असा टॉवर. चार टप्प्यांत त्याची निर्मिती. चार कोपऱ्यांवर चार गरुड. त्यावरती चार कोपऱ्यांवर चार हनुमानाच्या मूर्ती. टॉवर जणू सुचवितो, की हे मानवा, जिवंत आहे तोपर्यंत कर्मयोगाची व सदाचाराची गरुडझेप मोठ्या भक्तीभावानं आयुष्यात अविरत चालू ठेव.

योगायोग म्हणा, की सद्‌गुरूंची कृपा म्हणा. दिनांक १० ऑगष्ट १९९८ रोजी श्रावणातील सोमवारी अचानक पाऊस आला. विजा चमकू लागल्या. पाऊस मुसळधार सुरू झाला. विजा कडकडू लागल्या. कानठळ्या बसवणारा एकदम जोराचा

आवाज़ झाला. फैजपुरावर वीज कोसळली. सर्वांना वाटलं, की खूप मोठं नुकसान झालं असेल. माणसं, गुरं मेली असतील. घरं दुभंग झाली असतील. परंतु तसं काहीच झालं नाही. कसं होईल? तसं झालं तर मग उंचावरून सबंध फैजपूर गावावर मायेची पाखर असणाऱ्या टॉवरची माया खोटी नाही का ठरणार? सत्संग आश्रमावरचा टॉवर ना तो? आश्रमाचं सत्त्व त्यानं राखलं नाही, तर तो टॉवर कसला! टॉवरनं आपल्या वीजरोधक अशा तांब्याच्या पट्टीतून वीज गिळंकृत करून, विध्वंस करायला निघालेलं निसर्गातील चैतन्य भूमातेच्या स्वाधीन केलं. टॉवरवरचा मर्क्यूरी लाइट विझला. शहरातील वीज गेली. काहींच्या घरांतील पंखे जळाले, तर काहींच्या घरांतील टी. व्ही.! तसं पाहिलं तर हे किरकोळ नुकसान. फार मोठं नुकसान टाळलं ते टॉवरनं. का नाही टाळणार? घड्याळाच्या वरती टॉवर आणखी दहा फूट उंच असून शिरोभागी घुमट आहे. घुमटावर कमळ असून त्यांवर कलश आहे. कमळ आणि कलश यांनी भूमिगत होणाऱ्या विजेला जणू प्रणाम केला असेल. ते तिला म्हणाले असतील, "संतकृपा आश्रमावरचा हा टॉवर गावात असताना गावावरचं संकट टळलं नाही तरच आश्चर्य!"

बाराचे ठोके पडले. घड्याळाकडे पाहिलं. घड्याळाचे दोन्ही काटे जणू हात जोडत आहेत असा भास झाला. ती व्यक्ती म्हणाली, "चला, खूप वेळ झाला. आता जाऊया परत."

"हो! हो! चला." असं आपण म्हणालो आणि त्या व्यक्तीच्या मागोमाग गच्चीवरून जमिनीवर आलो. दक्षिणेकडून आश्रमाच्या बाहेर, म्हणजे 'जगन्नाथ निवासा'च्या बाहेर पडतापडता सर्वव्यापी अशा जगन्नाथाचं दर्शन आपल्याला ज्या व्यक्तीनं घडवलं, ती व्यक्ती म्हणजे स्वत: श्री जगन्नाथ महाराज होते. त्यांच्याकडे पाहून आपले हात केव्हा जोडले गेले, ते आपल्याला कळलंच नाही.

संतकृपा आश्रमाच्या वास्तूची शांती होत होती. पुण्याहवाचन झालं. श्री जगन्नाथ महाराज काही व्यवस्था पाहण्यासाठी मंदिरात गेले. तेथे त्यांना एक छोटासा, सुंदर, अनोखा पक्षी दिसला. तो कोठून आला हे त्यांना कळलं नाही. तो पक्षी तेथील गोदरेजच्या कपाटावर बसला. नंतर गॅसच्या शेगडीवर. नंतर टयूबलाईटवर. त्या पक्ष्याचे फोटो काढले, तरी तो तेथून हालला नाही. नंतर त्याची बेबीताईनं पूजा केली, तरीही तो हालला नाही. थोड्या वेळानं पाण्याच्या टाकीवर बसला. नंतर श्री जगन्नाथ महाराजांच्या कॉटवर बसला. नंतर श्री इमामशाहांच्या फोटोजवळ दीड तास बसला. जवळजवळ तीन तास तो पक्षी मंदिरात होता. गावातील लोक रांगेत येऊन त्याचं दर्शन घेत होते. विजयदादाला वाटलं, पक्षी उपाशी असेल. म्हणून त्यानं एका वाटीत भात व दुसऱ्या वाटीत तीर्थजल ठेवलं. त्यानंतर पक्ष्याला बेबीताईनं उचललं व टोपलीत ठेवलं. त्या पक्ष्यात जणू विद्युतप्रवाह होता, असा भास बेबीताईला झाला. विजयदादानं त्या पक्षाला 'संतकृपा आश्रमा'च्या वरच्या मजल्यावरील पहिल्या खोलीत ठेवलं. ''गुरू महाराज आपण येथे जेवण करून आम्हाला कृपाप्रसाद द्या,'' असं विजयदादानं म्हटलं आणि भात व तीर्थजल तेथे ठेऊन, मांजर वगैरे त्याला उपद्रव देतील म्हणून खोलीचं दार व खिडक्या बंद करून तो निघून गेला. थोड्या वेळानं काही लोकांना पक्ष्याचं दर्शन घ्यायचं होतं, म्हणून विजयदादाच्याबरोबर ते खोली उघडून आत गेले, तर काय आश्चर्य! पक्षानं भात खाल्ला होता. तीर्थजल प्राशन केलं होतं; परंतु पक्षी मात्र तेथे नव्हता. ह्या प्रसंगामुळे सर्वांची धारणा अशीच झाली, की पक्षाच्या रूपानं जणू तेथे श्री इमामशाह महाराज येऊन गेले.

★ ★ ★



श्री. संतकृपा आश्रमात
स्थापन केलेली
सद्गुरु इमामशाहांची मूर्ती



आचार्य श्री जगन्नाथ महाराज:
'श्रीमद्दशावतार'
ग्रंथावर प्रवचन करताना



श्री संतकृपा आश्रमावरचा टॉवर



आचार्य श्री जगन्नाथ महाराज

४. सत्‌पंथी साहित्याचं संशोधन

कोणत्याही पंथातील मूळ संस्थापक आपल्या पंथियांसाठी साहित्याची निर्मिती करून ठेवतो. ही निर्मिती तत्त्वज्ञानात्मक असते. जीवनमूल्यांचं शिक्षण देणारी असते. सत्‌पंथाचे आद्य प्रवर्तक श्री इमामशाह महाराज यांनी जो गुरूपदेश केला त्याची बैठक हिंदूधर्मतत्त्वज्ञानावर आधारलेली आहे. ह्या गुरूपदेशाला श्रुती, स्मृती, पुराणे आणि उपनिषदे यांचा आधार आहे. गीता, भागवत, रामायण, महाभारत, योगवसिष्ठ वगैरे ग्रंथांना पवित्र मानणाऱ्या सत्‌पंथियांची शिकवण सनातन हिंदू व वैदिक धर्म यांस अनुसरून आहे.

'मूळबंध,' 'सतवचन', 'दशावतार', 'मूनिवर चेतावणी', 'ऋषिवर चेतावणी', 'मनहरज्ञान', 'संतवाणी', 'योगवाणी', 'गुरुवाणी', 'आगमवाणी', 'शिक्षापत्री', 'अमृतवाणी', 'कलशघटपाटपूजा विधी मंत्र' हे ग्रंथ श्री इमामशाहांचे आहेत. या ग्रंथांची भाषा संस्कृतमिश्र गुजराथी अशी आहे. काही ग्रंथांची भाषा हिन्दी मिश्र गुजराथी अशी आहे. म्हणजे हे सर्व ग्रंथ गुजराथी भाषेत आहेत. या ग्रंथांतील 'मूळबंध' हा ग्रंथ अतिशय महत्त्वाचा आहे. ह्या ग्रंथाची विभागणी आठ खंडांत केलेली आहे. पहिल्या खंडात सतरा स्तबके आहेत. परमात्म्याच्या निर्गुण, निराकार, निरंजन व अगम्य अशा स्वरूपाचं वर्णन पहिल्या खंडात आहे. 'दश धुंध:कार' असं या खंडाचं नामकरण आहे. या दहा धुंध:कारांत नारायणाच्या वेगवेगळ्या स्वरूपाचं वर्णन असून जगात अनंत चैतन्य स्वरूपात

त्याचीच क्रीडा कशी सुरू आहे, त्यासंबंधीचं विवेचन आहे. बाकीचे सात खंडही महत्त्वपूर्ण असून त्यांतील तत्त्वज्ञान शक्तीदेवी व श्री नारायण यांच्या संवादातून, त्याचप्रमाणे गुरू आणि शिष्य यांच्या संवादातून स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

'संतवचन' हा श्लोकबध्द काव्यग्रंथ आहे. भगवंताच्या निरंजन स्वरूपाचं व त्याच्या प्राप्तीच्या साधनांचं वर्णन यात आहे.

'श्रीदशावतार' या ग्रंथात भगवंताच्या दहा अवतारांचं वर्णन असून भगवंतानं अवतार का घेतला त्यासंबंधीचं विवेचन आहे. ओविबध्द असा हा ग्रंथ आहे.

'मुनिवर चेतावणी' या ग्रंथात इमामशाहांनी मुनिवराला संबोधित केलं आहे. बाल, तारूण्य, प्रौढावस्था व वार्धक्य या अवस्थांत माणसानं कोणतं कर्माचरण करावं त्यासंबंधी या ग्रंथात केलेलं विवेचन अतिशय महत्त्वपूर्ण असं आहे. ओवीबध्द असा हा ग्रंथ आहे.

'ऋषिवर चेतावणी' हा ग्रंथ गृहस्थाश्रमी माणसाचा संसार उत्तम केव्हा होतो त्यासंबंधीचं विवेचन करणारा आहे. परमार्थसाधनासाठी त्याग व बुध्दीची गरज असते, हा आशय या ओवीबध्द ग्रंथाद्वारे सत्पंथी अनुयायांच्या मनावर ठसविला आहे.

'विषयानुवर्ती अशा मनाला मानवानं स्थिर, शांत व समाधानी बनवून भगवंताच्या ठिकाणी लीन करावं, असा उपदेश 'मनहरज्ञान' या पंचकडी श्लोकबध्द छोट्या ग्रंथाद्वारे केला आहे.

'संतवाणी' हा ग्रंथही पंचकडी श्लोकबध्द असून नवविधाभक्तीसंबंधीचं विवेचन यात आहे.

'योगी लोकांसाठी योगासाधनेचं महत्त्व सांगणारा 'योगवाणी' हा गुजराथी भजनांचा संग्रह आहे.

'गुरुवाणी' हा ग्रंथही गुजराथी भजनांचा संग्रह आहे. यात भक्ती, ज्ञान, वैराग्य व मुक्ती यांचा विचार असून ध्यानयोग, जपयोग, लययोग व प्रेमयोग या संबंधीचं विवेचन आहे.

'आगमवाणी' या ग्रंथात भगवंताच्या आगामी होणाऱ्या निकलंकी (निष्कलंकी) अवताराचं वर्णन आहे. अवतारकार्य संपल्यावर जो सृष्टीलय होणार त्याचंही वर्णन या ग्रंथात आहे. गुजराथी भजनांच्या माध्यमातून हे सर्व काही सांगितलं आहे.

आहार, विहार, व्यवहार व दिनचर्या यांच्या संदर्भात मनुष्याने कोणते नियम पाळावेत त्यासंबंधीचं शास्त्रशुध्द विवेचन इमामशाहांनी 'शिक्षापत्री' या गुजराथी भाषेतील ग्रंथात केलं आहे.

गुजराथी भाषेतील दोहावली 'अमृतवाणी' या ग्रंथात असून ज्ञान व व्यवहार यांना उपयुक्त असे दोहे यात आहेत.

'पूजायज्ञविधीमंत्र' या ग्रंथात कलशघटपाटविधीचं मंत्रसाहित्य आहे.

वर सांगितलेल्या श्री इमामशाहांच्या साहित्याच्या संदर्भात श्री जगन्नाथ महाराज म्हणतात, ''या संपूर्ण वाङ्मयाचा समग्र अभ्यास केल्यावर पूर्णपणे समजून येते की सतूपंथ प्रवर्तक इमामशाहांची शिकवण मानवमात्राच्या कल्याणासाठी व आत्मोन्नतीसाठीच आहे. नवीन काहीतरी खूळ काढून वादविवाद करण्यासाठी नाही. त्यांची राहणी व करणी वेदान्त्याचीच आहे. त्यांची ज्ञानदृष्टी संकुचित नसून विशाल आहे. हे सर्व वाङ्मय हस्तलिखित आहे. परंपरागत उतारे करून आतापर्यंत हे टिकवून ठेवण्यात आलं आहे. हळूहळू त्यातलं काही साहित्य प्रकाशित

होत आहे. हस्तलिखितांमुळे मात्र बऱ्याच ठिकाणी ते फार क्लिष्ट झालं आहे. त्याच्या संशोधनाची, अभ्यासात्मक विश्लेषणाची आणि प्रकाशनाची अत्यंत गरज आहे. सत्पंथातील बुध्दिनिष्ठ विचारवंतांचं व श्रीमान सज्जनांचं ते काम आहे.''
(श्री सतपंथ नवनीत, पहिली आवृत्ती १९८८ पृष्ठ ४१-४२)

श्री जगन्नाथ महाराजांनी वरील उध्दरणात जी गरज व्यक्त केली आहे, ती त्यांनी स्वत: पूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे. हिन्दी, संस्कृत, गुजराथी व मराठी भाषा त्यांना अवगत असल्याने इमामशाहांच्या ग्रंथांचा अनुवाद ते करू शकले. उत्तम अनुवाद हे एक प्रकारचं संशोधन असतं. वेद, उपनिषदे, गीता, रामायण, महाभारत इत्यादी ग्रंथांचं त्यांनी अध्ययन केल्यामुळे त्याच्या आधारे त्यांनी सत्पंथीय साहित्याचं जे संशोधन केलं आहे, ते अत्यंत महत्त्वपूर्ण असं आहे. प्रसिध्दिपराङ्मुखता व संपर्कमाध्यमापासूनची दूरता यांमुळे त्यांचं लेखनविषयक कार्य मात्र सत्पंथीयांशिवाय इतरांपर्यंत फारसं पोचू शकलं नाही. मुळात या पंथाविषयी लोकांच्या मनात गैरसमज असल्यामुळे पंथेतरांनी या पंथाचं स्वरूप, त्याचं तत्त्वज्ञान व त्याचा आचारधर्म समजून घेण्याचा प्रयत्न केला नाही. पंथातील अनुयायांनी केवळ धार्मिक ग्रंथ म्हणूनच या साहित्याकडे पाहिलं. फैजपूरच्या सत्पंथी मंदिरातील श्री जगन्नाथ महाराज हे एकटेच अभ्यासक व संशोधक निघाले. त्यांनी सत्पंथाच्या साहित्याच्या संदर्भात जे कार्य केलं आहे ते अनन्यसाधारण असं आहे. फैजपूरच्या सत्पंथी मंदिरातील त्याचं आगमन सत्पंथाच्या दृष्टीनं फार मोठी इष्टापत्ती ठरली. गुजराथी भाषेतील धार्मिक ग्रंथांना त्यांनी जो मराठी पेहराव चढवला तो अविस्मरणीय असा आहे. सत्पंथाचं तत्त्वज्ञान व त्याचा आचारधर्म त्यांनी लोकांना सुलभ करून तर दिलाच; परंतु ह्या पंथाविषयी लोकांच्या मनात जे किल्मिष होतं, ते नाहीसं करून, त्यांनी सत्पंथाला लोकाभिमुख केलं.

सत्पंथातील साहित्याचं श्री जगन्नाथ महाराजांनी पुढीलप्रमाणे विश्लेषण केलं आहे.

१) श्री सत्पंथ कलशघटपाटपूजायज्ञविधी

यात या पंथाची स्वतंत्र परंतु अथर्ववेदावर आधारित अशी कर्मकांडाची रीत आपणास दिसून येते. तिच्यात मुख्यत्वे पुढील तीन प्रकार आहेत: १) नित्यपूजाविधी २) नैमित्तिक पूजाविधी ३) काम्यपूजाविधी. पूजेमध्ये कलशपूजा आणि घृतज्योत या मुख्य गोष्टी आहेत. त्यांच्याशिवाय पूजा होऊ शकत नाही. आणि शिरा ह्या प्रसादाशिवाय पूजेचा शेवट होत नाही. प्रसादात फळे आणि शिरा हे आवश्यक असतात. क्वचित् भात, दूध आणि गूळ यांचासुध्दा प्रसाद करतात.

२) स्मार्त साहित्य

सत्पंथातील साहित्यात प्रामुख्याने पुराणातील कथा आहेत. त्यांत काही महाभारतातील कथाही आहेत. श्रीमद्भागवतात वर्णिलेल्या दशावतारांचा आधार घेऊन इमामशाहांनी केलेला उपदेशही यात दिसून येतो. धृव, प्रल्हाद, हरिश्चंद्र, पांडव वगैरे सत्भक्तांच्या चरित्रांवर आधारलेल्या काही काव्यात्मक प्रसंगांचाही यात समावेश आहे. श्री इमामशाहांनी 'शिक्षापत्री' या पुस्तकात रोजच्या जीवनक्रमाबद्दल आचार शुध्द ठेवण्यासाठी शंभर नियम सांगितले आहेत. सत्गुरु इमामशाहांच्या जीवनातील चमत्कारांवर आधारलेली भजने लोक मोठ्या आवडीनं म्हणतात. तीही या प्रकारात मोडतात.

३) ज्ञानपद अथवा श्रौत साहित्य

श्री इमामाशाह यांचे ज्ञानपद संग्रह भजनरूपात आहेत. त्यात प्रामुख्याने ब्रह्मज्ञान व योगज्ञान आढळते. वैदिक वाङ्मयातील तत्त्वज्ञान यात काव्यरूपानं समाविष्ट झालेलं आहे. ज्ञानपद साहित्यात इमामशाहांनी इतर गोष्टींपेक्षा आत्मज्ञान प्राप्त करून घेण्याला अधिक महत्त्व दिलं आहे.

श्री जगन्नाथ महाराजांनी आपलं संपूर्ण आयुष्य केवळ अध्ययन, अध्यापन, लेखन आणि पंथविषयक कार्य यांसाठीच खर्च केलं. हे सर्वकाही करीत असताना त्यांच्या प्रकृतीवर परिणाम झाला, तरी ते त्या कार्यापासून दूर गेले नाहीत. अजूनही सत्पंथासाठी उपयुक्त असं लेखनकार्य त्यांचं सुरूच असतं.

श्री इमामशाहांना आत्मज्ञानाचा वारसा वंशपरंपरागत लाभलेला होता. त्यांचा कोणताही देहधारी गुरू नव्हता. या संदर्भात श्री जगन्नाथ महाराज म्हणतात, "परंपरागत दैविशक्तीचा प्रवाह त्यांच्या घराण्यात वाहत होता, हे उपलब्ध इतिहासावरून समजून येते. त्यास 'पाती' अथवा 'दैविकळा' असे म्हटलेले आहे. त्यास योगशास्त्रात शक्तीपात करण्याची क्रिया म्हणतात. अशा प्रकारची दैविकळा श्री इमामशाहांना वयाच्या पंधराव्या वर्षी त्यांच्या वडिलांकडून प्राप्त झाल्याचा उल्लेख त्यांच्या चरित्रात आहे. ती प्राप्त होण्याच्या आधीसुध्दा श्री इमामशाहांचे उपदेशकार्य चालू होते. यावरून अगदी बालपणापासून त्यांना वेदगतीचे उपजत ज्ञान होते. म्हणजेच ते योगभ्रष्ट महात्मापुरुष होते व काही अपूर्ण राहिलेला योग पूर्ण करण्यासाठी अथवा लोकसेवेसाठी या अवनीतलावर अवतरलेले असावे असे वाटते. त्यांची बुध्दिमत्ता व ज्ञानाधिकार फार मोठा होता. तत्कालीन राजसत्तेला त्यांच्या या गुणांचे आकलन करता आले नाही. कारण प्रसिध्दिपरांङ्मुख असलेल्या त्या महापुरुषाचे ज्ञान विवेकशून्य, धर्मांध व मत्सरग्रस्त अशा मोगलसत्तेला व नंतरच्या आंग्लसत्तेला पेलता आले नाही."

श्री इमामशाहांनी आत्मज्ञानविषयक ज्ञान सर्वसामान्य जनतेत प्रचलित असलेल्या लोकभाषेत समजावून सांगितलं. त्यांचं प्रचारक्षेत्र गुजराथ होतं. त्यामुळे त्यांचं साहित्य गुजराथी भाषेतच आढळतं. त्यांचे सर्व ग्रंथ हस्तलिखित स्वरूपात आहेत. काळानुसार या हस्तलिखितांत भाषिक बदल होत गेले. अरबी, पंजाबी,

गुजराथी, हिंदी व संस्कृत या भाषांतील शब्द सत्पंथी साहित्यात आढळतात, त्यामुळे भाषिक खिचडी झालेल्या या साहित्याचा मुळातून अभ्यास करणं अतिशय कठीण काम होतं. ते काम श्री जगन्नाथ महाराजांनी केलं, हे विशेष. सत्पंथाच्या साहित्यावर इस्लामी शब्दांचंही आक्रमण झालेलं दिसतं. हिंदू लोकांना बाटवून त्यांना इस्लामकडे वळवण्याचे अनेक प्रयत्न त्या काळात झाले. वैदिक ग्रंथांचा अभ्यास श्री इमामशाहांनी केलेला होता, त्यामुळे त्यांच्या सत्पंथविषयक ग्रंथात त्या विचारसरणीचा प्रभाव पडलेला दिसून येतो. श्री जगन्नाथ महाराजांनी आपल्या ग्रंथांतून हा प्रभाव कुठे आणि कसा पडला आहे, हे काही ठिकाणी सप्रमाण दाखवून दिले आहे.

'महात्मा सद्गुरू श्री इमामशाह महाराज'

हा ग्रंथ १९६७ साली प्रसिध्द झाला. दोनशे सत्तर पृष्ठांचा हा ग्रंथ अतिशय महत्त्वपूर्ण असा आहे. ह्या ग्रंथावर लेखक म्हणून गुरुवर्य श्री पुरुषोत्तम गुरू धर्मा महाराज असं नाव आहे. श्री इच्छाराम यमाजी झोपे हे प्रकाशक आहेत. कोणत्याही पंथात चांगल्या गोष्टींचं श्रेय आपल्या गुरूला देण्याची प्रथा फार पूर्वीपासून चालत आलेली दिसून येते. आपल्या गुरूला अत्यंत महत्त्व देणारा सत्पंथ त्याला अपवाद असणं शक्यचं नाही. या ग्रंथाचं लेखन श्री जगन्नाथ महाराजांनीच केलं आहे. ग्रंथात 'प्रकाशकाचे दोन शब्द' यात प्रकाशक लिहितात, "परमपूज्य आचार्य गुरुवर्य पुरुषोत्तम गुरू धर्माबोबा महाराज तसेच त्यांचे शिष्य भावी आर्चक पूज्य गुरू जगन्नाथ गुरू पुरुषोत्तम बोवा महाराज यांनी सदरचा जीवनवृत्तांत लिहून काढण्यास, उपलब्ध माहिती मिळवण्यास फारच मेहनत घेतली." याचा अर्थ असा होतो, की हा ग्रंथ दोघांनी मिळून लिहिला आहे. परंतु प्रत्यक्ष जेव्हा यासंबंधी श्री जगन्नाथ महाराजांशी चर्चा केली तेव्हा ते म्हणाले, "ग्रंथ मीच लिहिला; परंतु गुरूंना महत्त्व देण्यासाठी लेखक म्हणून त्यांचं नाव टाकलं आहे."

या ग्रंथात महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन शिक्षण व वनमंत्री श्री मधुकरराव चौधरी यांचा प्रारंभी अभिप्राय आहे. त्यात ते म्हणतात, "प्रस्तुत ग्रंथकर्ता अभिनिवेशापासून अलिप्त राहिलेला आहे. सद्गुरुविषयीची व पंथाविषयीची श्रध्दा अविचल ठेवून त्यांनी सत्पंथाची भूमिका विस्ताराने पण समतोल रीतीने मांडली आहे. त्यांची निवेदनाची भूमिका आग्रही पंथाभिमान्यांची नसून, पंथाविषयी पंथियांत व लोकांत असलेले अज्ञान व पसरलेले अपसमज दूर करण्यासाठी झटणाऱ्या तळमळीच्या लोकशिक्षकाची आहे; लोककल्याणाची चिंता वहाणाऱ्या सत्पुरुषाची आहे." श्री जगन्नाथ महाराजांच्या एकूणच लेखनविषयक कार्यावर प्रकाश पाडणारा हा अभिप्राय आहे.

'सुमंगलम्' या शीर्षकाखाली या ग्रंथात पाच अर्थपूर्ण असे महत्त्वाचे संस्कृत श्लोक दिलेले आहेत. श्री जगन्नाथ महाराजांचा संस्कृतचा अभ्यास आहे. संस्कृत श्लोक पाठ करावेत असं त्यांना नेहमी वाटतं. त्यामुळे त्यांनी त्यांच्या बहुतेक ग्रंथांत शक्य तेथे संस्कृत श्लोकांची पेरणी केली आहे.

या ग्रंथांला अकरा पृष्ठांची प्रस्तावना आहे. तिच्यात एकूणच धर्ममार्गासंबंधी, इमामशाहासंबंधी व महापुरुषाच्या जीवनातील चमत्कारी कथांसंबंधी जे विचार मांडलेले आहेत, ते श्री जगन्नाथ महाराजांच्या धर्मविषयक व्यापक दृष्टीचे निदर्शक आहेत. श्री इमामशाहांच्या कार्याकडे व जीवनचरित्राकडे श्री जगन्नाथ महाराज किती डोळस दृष्टीने पाहतात याची कल्पना पुढे दिलेल्या उध्दरणावरून येऊ शकेल. श्री जगन्नाथ महाराजांचे या संदर्भातील विचार वाचकांना कळावेत म्हणून विस्तृत उध्दरणे मुद्दाम दिली आहेत; कारण सदर पुस्तक आता दुर्मिळ झाले आहे.

"धर्ममार्ग कोणताच खोटा नसतो. परंतु सर्वांनी प्रकाशाच्या मार्गाने म्हणजे तेजस्वी अशा वैदिक सनातन मार्गाने जावे. अंधारात चाचपडत बसू नये. कोणत्याही जातीचे, धर्माचे अगर पंथाचे लोक असोत, परमेश्वराला ते सारखेच प्रिय असतात; आणि दुःखिताला मदतीचा हात देणे हा परमेश्वराचाच सर्वव्यापी धर्म असल्यामुळे त्याच्या अंमलबजावणीत भेदभाव करू नये. कोणताही धर्म झाला तरी त्याची सत्य म्हणून जी तत्त्वे आहेत ती जगभर निरनिराळ्या भाषेत, निरनिराळ्या वेळी, निरनिराळ्या महात्म्यांनी सांगितलेली आहेत. इतकाच काय तो फरक. जगाचा परमेश्वर एकच आणि परमेश्वराचा धर्मही एकच. ऐहिक जीवन सुखाचे करून परमार्थाचाही लाभ करून देणारा तो धर्म. अशा मानवताधर्माची वारंवार ओळख करून देणारे सत्पुरुष हे मानवसमाजाचे एक प्रधान अंग आहे. त्यांच्या कार्याच्या तत्त्वाविषयी व तपशिलाविषयी मतभेद झाला, तरी एकसंघ समाजपुरुषाच्या निर्मितीसाठी व सर्व थरांतील समाजात एकात्मता निर्माण करून समाजस्थैर्य टिकवण्याच्या कामी त्यांचे पुष्कळच सहाय्य होत असते. संतपरंपरेने सामान्य जनतेच्या मनावर जे खोलवर संस्कार केलेले आहेत ते पुसणे सर्वभक्षक काळालाही शक्य झाले नाही. नदीच्या पाण्याने शेते पिकतात त्याप्रमाणे संतवाङ्मयाने जनतेच्या मनात सुविचारांचे, भक्तीचे, सद्भावनांचे मळे पिकतात. गुरुभक्ती, दया, क्षमा व शांती या मानवाला उजळून टाकणाऱ्या पवित्र गुणांची शिकवण संतांनी दिली. सर्वांभूती परमेश्वर ही भावना एकदा ज्याच्या मनात रुजली त्याला हा ब्राह्मण, हा शूद्र, हा बैल, हा गर्दभ असा भेद करवतच नाही. सारे जगच परमेश्वरमय दिसू लागते. जनतेच्या जीवनाशी तद्रूप होऊन आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत सत्य, शांती व प्रेम यांचा आचारधर्म संतजन सोडत नाहीत. अशाच संत महात्मा पुरुषांच्या मालिकेतील एका

सत्पुरुषाचा हा जीवनवृत्तांत आहे.'' ('महात्मा सद्गुरू श्री इमामशाह महाराज,' प्रथमावृत्ती १९६७ पृ. ६-७)

''साधारणत: महापुरुषांच्या जीवनाभोवती अनेक चमत्कारी कथांचे जाळे पसरलेले असते. श्रीकृष्णाने आपल्या हाताच्या एका करंगळीवर गोवर्धन पर्वत उचलला किंवा श्रीकृष्णाने तसेच श्री रामाने लहान वयातच अनेक दैत्यांचा संहार केला, ज्ञानेश्वरांनी भिंत चालविली, रेड्याकडून वेद वदविले, मीराबाईने विष पचविले, तसेच एकनाथ, नामदेव, तुकाराम आदि महान संतांसंबंधी अनेक चमत्कारी कथा आहेत. तशाच इमामशाहासंबंधीही आहेत. त्या त्यांच्या चरित्रात आलेल्या आहेत. पण असे चमत्कार हे महात्मा पुरुषांचे सारसर्वस्व नसून ती त्यांची सहजलीला असते. अशा चमत्कारी लीला कित्येक लोक ऋध्दिसिध्दीच्या बळावर करीत असतात. परंतु सत्पुरुषांचे तसे नसते. त्यांच्या आत्मिक शक्तीच्या, तप:सामर्थ्यांच्या योगाने तशा चमत्कारी गोष्टी त्यांच्याकडून सहज घडत असतात. त्यांना ऋध्दिसिध्दीची जरूरी नसते. सद्गुरू इमामशाहांनी तर अशा लोकांचा तीव्र निषेध केलेला आहे. जे ऋध्दिसिध्दींच्या योगाने इतर सामान्यजनांस भुलवितात त्यांना कल्पान्तीही मोक्ष मिळत नाही. ते आत्मघातकी जाणावेत, असे त्यांनी सांगितलेले आहे. जरी त्यांच्याकडून अनेक चमत्कार घडले गेले, तरी पण त्यांचे थोरपण चमत्कारामुळे नाही. तसे असते तर त्यांची गणती एखाद्या 'औलियाबाबा'त झाली असती व त्यामुळे त्यांची स्मृतीही राहिली नसती. पण आज जवळजवळ ५००-६०० वर्षांपासून त्यांची स्मृती कायम राहिली ती केवळ चमत्कारामुळे नसून त्यांनी उपदेशिलेल्या अमूल्य अमर दिव्य उपदेशामृतानेच. अगम्य अशा आगम ज्ञानामुळेच व अवर्णनीय तप:सामर्थ्यामुळेच. त्यांनी दर्शविलेल्या सनातन वैदिक धर्मतत्त्वामुळे व परम उज्ज्वल

सुसंस्कृत क्रियाचरणामुळे लाखो लोकांचे ते श्रध्दास्थान बनले. मानवजातीच्या कल्याणासाठी त्यांनी स्वत: अत्यंत उपसर्ग सहन करून आत्मज्ञानाची, सत्याची, समतेची, सेवेची, क्षमाशांतीची व अहिंसेची महान शिकवण जगाला दिली. हे त्यांचे थोरपण होय.'' ('महात्मा सद्गुरू श्री इमामशाह महाराज,' प्रथमावृत्ती १९६७ पृ. ९-१०)

श्री इमामशाहांचं चरित्र लिहिणं अतिशय अवघड काम होतं; कारण सलग असं त्यांचं चरित्र उपलब्ध नाही. 'भाभाराम सुबोध' हे मूळ गुजराथी भाषेत ओविबध्द असं चरित्र उपलब्ध आहे. त्याचा आधार श्री जगन्नाथ महाराजांनी घेतला आहे. त्याचप्रमाणे 'इमामशाहना परछा' नावाचं जे पुस्तक आहे त्यातून काही भाग त्यांनी निवडला आहे. स्वत: इमामशाहांनी जे काही ग्रंथ लिहिले आहेत त्यात त्यांच्या जीवनचरित्रासंबंधी जी माहिती मिळते तिचाही आधार घेतला आहे. उपलब्ध सर्व साहित्य गुजराथी भाषेत होतं. त्याचं मराठीकरण करून आवश्यक तेथे अधिक स्पष्टीकरण केलं आहे.

या प्रस्तावनेत इमामशाहांनी सत्पंथाचं जे स्वरूप दाखविलं आहे. त्याचा सार काढून दाखविला आहे तो असा :

या पंथात तीन मुख्य गोष्टी : १) दृढनिश्चय २) प्रतिज्ञा ३) नियम

दृढनिश्चयामध्ये सत्य, पुरुषार्थ, प्रेम, समानभाव, अहिंसा, परोपकार व क्षमा यांचा समावेश केला असून प्रत्येकासंबंधीचं स्पष्टीकरण केलं आहे.

प्रतिज्ञामध्ये सत्पंथातील सर्व प्रतिज्ञांचं पालन करणं, बालकांना सत्पंथाची शिकवण देणं, अंधश्रध्देचा त्याग व ज्ञानदृष्टीचा अवलंब करणं यांचा समावेश केला असून त्यासंबंधीचं स्पष्टीकरण केलं आहे.

नियमामध्ये शरीरशुध्दी, हृदयशुध्दी, व्रत, उपासना व ध्येय यांचा समावेश केला असून त्यासंबंधीचं स्पष्टीकरण केलं आहे.

या ग्रंथाला अठ्ठ्याहत्तर पृष्ठांचं 'निवेदन' आहे. या निवेदनाच्याखाली लेखक म्हणून 'पुरुषोत्तम गुरू धर्मा बोवा महाराज' असं नाव छापलं आहे. या संदर्भातही मी स्वत: श्री जगन्नाथ महाराजांशी बोललो. ''गुरूंनी माझ्याकडे ते काम सोपविलं होतं, ते मी पार पाडलं. गुरूला प्राधान्य देण्याच्या दृष्टीने ग्रंथात त्यांचं नाव टाकलं आहे.'' असं त्यांनी सांगितलं.

या ग्रंथातील निवेदनाला अनेक पदर आहेत. प्रारंभी गुरूची महती सांगितली आहे. ती सांगत असताना 'गुरुचरित्र', 'दासबोध', 'गुरुगीता', 'भगवद्गीता' वगैरे ग्रंथांतील आधार दिले आहेत. त्यानंतर दहा अवतारांसंबंधी संपूर्ण माहिती दिली आहे. ती देत असताना 'मुनिवरचेतावणी', 'विराटस्वरूप', 'भगवद्गीता' वगैरे ग्रंथांचा आधार घेतलेला आहे. साकार पूजेविषयी विवेचन करताना श्री जगन्नाथ महाराजांनी ज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथ, नामदेव, रामदास या संतांच्या ग्रंथांतील उध्दरणे दिली आहेत. या संदर्भात श्री जगन्नाथ महाराज म्हणतात, ''परब्रह्म परमात्म्याच्या अव्यक्त स्वरूपास किंवा व्यक्त म्हणजे अवतारपात्रास ओळखणं हीच 'साकारपूजा' होय. साकारपूजा म्हणजे प्रतिमापूजा किंवा एखाद्या दगडाची अथवा धातूची मूर्ती करून तिची पूजा करणे नसून, मूर्त म्हणजे मूर्तिमंत, प्रत्यक्ष, स्वयंसिध्द परमेश्वराचा जो अवतार त्याची पूजा करणे होय.'' (तत्रैव पृ. ३६)

या ग्रंथातील एकूण विवेचन पाहिले असता 'प्रतिमापूजा करू नये' असा ध्वनी निघतो; परंतु तसं नाही. याच ग्रंथात पृष्ठ अडतीसवर श्री जगन्नाथ महाराज म्हणतात, ''हल्ली

ज्या अवतारास प्राधान्य अध्यक्षपद आहे अशा दहाव्या अवतारास मानावे असे सिध्द होते. असे हे प्रगट अवतार म्हणजेच प्रत्यक्ष अव्यक्त, उदासीन, साक्षी अशा परब्रह्म परमात्म्याचे स्वरूप होय.'' १९७५ साली 'नित्यपाठ आणि शिक्षापत्री' हा ग्रंथ श्री जगन्नाथ महाराजांनी प्रसिध्द केला आहे. या ग्रंथाला, 'नित्यपाठ व त्याची आवश्यकता' या शीर्षकाखाली जी माहिती दिली आहे तिच्यात स्वामी विवेकानंदांचं पुढील उध्दरण दिलं आहे: ''परमेश्वराच्या गुणांचे ध्यान, चिंतन व स्मरण करण्याकरता फोटो अथवा मूर्ती हे एक साधन आहे. त्यांच्या ध्यानस्मरणाने मन विषयापासून परावृत्त होते. निरनिराळ्या विषयांदिकांत भटकणारे मन स्थिर करण्याकरिता मूर्तीपूजा आवश्यक आहे, पण मूर्ती हाच परमेश्वर आहे हे मानणे अयोग्य आहे; कारण परमेश्वर सर्वव्यापी असल्यामुळे तो सर्वदूर व्यापलेला आहे. प्रत्येक प्राणिमात्रांच्या व वस्तुमात्रांच्या ठायी त्याचे अस्तित्त्व आहे. आपल्या हृदयातसुध्दा त्याचे वास्तव्य आहेच. म्हणून स्वत:च्या हृदयात आत्म्याच्या रूपाने शोधणे, अनुभव घेणे हे खरे ईश्वरदर्शन आहे. परमेश्वरास जाणल्याने, परमेश्वराविषयीचे ज्ञान प्राप्त केल्याने मनुष्य प्रमुख बनतो. पण मूर्ती, मंदिर, धर्मशास्त्र आदि मात्र ते जाणण्यास आधाररूप टेकू आहेत. बालपणात ज्याप्रमाणे बालकास पांगुळगाड्याची, म्हणजे टेकूची आवश्यकता असते, पण बळ प्राप्त झाल्यानंतर आधाराची आवश्यकता नसते. तद्वतच ईश्वरज्ञान प्राप्तीनंतर मंदिर, मूर्ती आदींची जरूर राहात नाही. याकरिता कोणत्याही मनुष्याने सदैव बालकाप्रमाणे मूर्ती, मंदिर आदि खेळण्यांच्या साधनात अडकून राहू नये, तर तेथून पुढे प्रगती करावयास हवी आहे. म्हणजे मानसिक ध्यान व मग आत्मिक ध्यान करावयास हवे'' - विवेकानंद

वरील उध्दरणावरून प्रतिमापूजा का आवश्यक असते, हे आपल्या लक्षात येते. १९९७ साली 'संतकृपा आश्रमात' श्री जगन्नाथ महाराजांनी श्री इमामशाहांच्या भव्य मूर्तीची

स्थापना केली. त्यांच्या प्रवचनातही पुष्कळदा मूर्तिपूजेच्या संदर्भात विवेचन येतं. या सर्व गोष्टींचा विचार केला असता असं लक्षात येतं, की श्री जगन्नाथ महाराज मूर्तीपूजेचा अव्हेर करत नाहीत. सर्वसामान्यांसाठी प्राथमिक अवस्थेत ही पूजा आवश्यक असते, असे ते मानतात.

निवेदनात 'ऋग्वेद', 'यजुर्वेद', 'सामवेद' व 'अथर्ववेद' या चारही वेदांसंबंधी माहिती दिली असून, श्री इमामशाहांनी आपल्या 'आगमवाणी' या ग्रंथात कलियुगात अधर्म कसा माजेल, त्यासंबंधी जे विस्तृत विवेचन केले आहे, त्यासंबंधीही श्री जगन्नाथ महाराजांनी आपले विचार व्यक्त केले आहेत. श्री इमामशाह अंतर्ज्ञानी होते, असं श्री जगन्नाथ महाराज म्हणतात. परब्रम्ह्याच्या सत्य स्वरूपाला इमामशाहांनी 'सत्' हे नाव दिले. या 'सत्' ला ओळखण्याचा जो मार्ग तोच 'सत्पंथ' होय, असेही श्री जगन्नाथ महाराजांनी निवेदनात म्हटले आहे.

या ग्रंथांचं 'निवेदन' श्री जगन्नाथ महाराजांच्या समृध्द वाचनावर प्रकाश पाडते. पंचवीसाव्या वर्षी श्री जगन्नाथ महाराजांनी हा ग्रंथ लिहिला. मॅट्रिक झाल्यावर सातआठ वर्षे त्यांनी किती विविध ग्रंथांचा सखोल अभ्यास केला होता, याची कल्पना या निवेदनावरून येऊ शकते.

श्री इमामशाहांचं चरित्र कथन करणं हा या ग्रंथांचा मुख्य भाग आहे. पंजाबातील मुलतान या गावी इ. स. १४४० च्या सुमारास इमामशाहांचा जन्म झाला. त्यांच्या वडिलांचं नाव कबीरदीन असं होतं. त्यांचं सैय्यद घराणं सुशिक्षित व सुसंस्कृत होतं. या घराण्याला पूर्वीपासून धर्म व वेदशास्त्र यांची चांगलीच माहिती होती. श्री इमामशाहांच्या दिव्य स्वरूपाचं वर्णन श्री जगन्नाथ महाराजांनी या ग्रंथांत केलं आहे.

श्री इमामशाहासंबंधी श्री जगन्नाथ महाराज म्हणतात, "इमामशाह यांना चौदा विद्यांचं ज्ञान मूळचंच असून आत्मज्ञानही उपजतच होतं. जन्मताच त्यांना चारही वेदांचं संपूर्ण ज्ञान झालेलं होतं. ते सर्व 'निगम-आगम-ज्ञान' जाणत होते. परंतु लोकाचाराप्रमाणे त्यांच्या वडिलांनी त्यांचं नाव शाळेत घातलं. जे अखिल जगताचे गुरू व ज्ञान देणारे, त्यांना कोण बरे शिकविणार? आणि त्यांचे कोणते बरे ज्ञान अपूर्ण असेल? परंतु पित्याची आज्ञा वंद्य मानून श्री इमामशाह शाळेत गेले, तेही निराळ्याच कारणाकरिता! ते शाळेत जाऊन मुलांना नवीन नवीन आश्चर्यकारक चमत्कार करून दाखवीत." (पृष्ठ १०२-१०३)

श्री इमामशाहांनी आपल्या अलौकिक शक्तीच्या बळावर जे शेकडो चमत्कार केले, त्यासंबंधी श्री जगन्नाथ महाराजांनी या ग्रंथांत विस्तृत विवेचन केलं आहे, त्याचा सारांश पुढील प्रमाणे: कोणत्याही सत्पुरुषाच्या संदर्भात असे दैवी चमत्कार सांगितले जातातच. त्याला इमामशाहदेखील अपवाद कसे असतील? दीनदुबळ्यांसाठी, लोकसेवेसाठी, समाजोध्दारासाठी, नैतिक पातळी उंचावण्यासाठी, दया-क्षमा-शांतीचा मंत्र देण्यासाठी, सर्वधर्मसमभावासाठी, संसारातील क्लेश दूर करण्यासाठी, परमेश्वरचिंतनाकडे माणसांची मनं वळविण्यासाठी व शिष्यसमुदाय मिळविण्यासाठी महात्मे जन्माला येतात, याचाच प्रत्यय या चमत्कारावरून येतो. या चमत्काराकडे केवळ चमत्कार म्हणून न पाहता त्यांतील गर्भितार्थ डोळस दृष्टीनं जर लक्षात घेतला तर त्याचं महत्त्व कळू शकतं.

'श्री सत्पंथ ज्ञान-पद-संग्रह'

या ग्रंथाची दुसरी आवृत्ती १९७४ साली प्रसिध्द झाली. हा ग्रंथ म्हणजे भजनांचा संग्रह आहे. जुन्या हस्तलिखितांचे संशोधन करून या ग्रंथाची निर्मिती झालेली आहे. यात एकूण ३७४ भजने आहेत. प्रारंभी 'मंगलाचरण' या शीर्षकांखाली

नऊ संस्कृत श्लोक दिले आहेत. 'श्रीगुरुस्तवन', 'गुरुवाणी', 'चेतावणी', प्रभाती', 'वधावो' 'आगमवाणी', 'घोळ', 'उपदेशवाणी' 'योगवाणी', 'संकीर्ण पदे', 'मराठी भजने' वगैरे शीर्षकांखाली ही भजने दिलेली आहेत. श्री जगन्नाथ महाराजांमध्ये साक्षेपी संशोधक व संपादक दडलेला आहे, याची कल्पना या ग्रंथामुळे येते. विविधतापूर्ण वाचनामुळे व व्यासंगामुळे त्यांना हे शक्य झालं, असं म्हणावयास हरकत नाही.

या ग्रंथातील सर्व गुजराथी भजने किंवा पदे श्री इमामशाहांची आहेत. अर्थपूर्ण व लयबध्द अशी ही पदे सहज मुखोद्‌गत होणारी आहेत. काही सत्‌भक्त भाविक रसिकांनी जी मराठी पदे रचली त्याचाही अंतर्भाव ह्या संग्रहात आहे. "यातील 'नटवर' अशी छाप असलेली पदे सत्‌पंथाचे अभ्यासू व अनुभवी मुरब्बी सत्‌भक्त श्री नाटू देवराम महाजन यांनी रचलेली आहेत." असे प्रकाशकाचे दोन शब्द यात श्री जगन्नाथ महाराजांनी म्हटले आहे.

भजनातील आशयांवरून त्यांची विभागणी केली आहे. विशेष म्हणजे, कठीण गुजराथी शब्दांचे अर्थ तळटिपांत दिले आहेत. आवश्यक तेथे स्पष्टीकरणही केले आहे. बहुतेक पदांच्या आरंभी त्यांच्या 'चाली' दिल्या असून त्या कोणत्या रागांत म्हणावयाच्या त्या रागांची नावेही दिलेली आहेत. काही गुजराथी पदांसाठी हिन्दी पदांतील चाली दिल्या आहेत, तर काही गुजराथी पदांसाठी मराठी चालीदेखील दिल्या आहेत. श्री जगन्नाथ महाराजांना बालपणापासून भजनं म्हणण्याची आवड आहे. आजही सत्‌पंथी मंदिरातील भजनप्रसंगी ते तल्लीन होऊन जातात. फैजपूर येथील सत्‌पंथी मंदिरातील महिला भजनी मंडळाचे कार्य तर फारच उल्लेखनीय आहे. हे कार्य बेबीताईच्या

मार्गदर्शनाखाली सुरू आहे. भजनानंदात रमणारे श्री जगन्नाथ महाराज यांनी 'श्री सत्पंथ ज्ञान-पद-संग्रह' या ग्रंथाचे संपादन केल्यामुळे सत्पंथी भक्तांसाठी भजनं उपलब्ध तर झालीच; परंतु इमामशाहांच्या विविध आशयपूर्ण भजनांचा पंथियांना लाभदेखील झाला.

'नित्यपाठ आणि शिक्षापत्री'

हे पुस्तक १९७५ साली प्रसिध्द झाले आहे. या पुस्तकाच्या सुरुवातीला नित्यपाठ व त्याची आवश्यकता सांगितली आहे. श्री इमामशाहांच्या ग्रंथातील उदाहरणे देऊन ही आवश्यकता स्पष्ट केली आहे. या सुरुवातीच्या भागात श्री जगन्नाथ महाराज म्हणतात, ''मूर्तिपूजा ही धार्मिक जीवनातील प्रथम पायरी आहे. मानसिक पूजा ही दुसरी पायरी आहे. आणि सायुज्य ध्यान अथवा प्रभूत ऐक्यानुभवाचे परमसुख अनुभवणे ही धार्मिक भावनांची अंतिम भूमिका आहे. या सर्वांच्या मुळाशी मन हे एक बलवान व निरंतर भटक्या मारणारे अस्थिर इंद्रिय आहे. त्यास प्रथम स्थिर करावे. मन निर्विचारी झाले तरच ते शांत व स्थिर राहते. अशा शांत व स्थिर मनाने केलेले कोणतेही कर्म पूर्णपणे सिध्दीस जाऊन मनुष्य त्यात यशस्वी होऊन मोक्षप्राप्ती करू शकतो.'' (पृष्ठ १४)

प्रारंभीच्या नित्यपाठाच्या भागात मराठी ओव्या दिल्या असून त्यात 'परमेश्वरस्तवन', 'श्री सद्गुरुमहिमा', 'श्रीसद्गुरुप्रती करुण प्रार्थना', 'श्री सद्गुरूंची आरती', 'श्री सद्गुरूस शरण व पुष्पांजली अर्पण', 'प्रदक्षिणा व साष्टांग नमस्कार' वगैरेंचा अंतर्भाव आहे. ह्या सर्व ओव्या सहज पाठ होतील अशा आहेत.

'शिक्षापत्री'

या दुसऱ्या भागात सत्पंथाची शिकवण दिली आहे. त्याच्याआधी प्रकाशकाचे हृद्गत दिले आहे. त्यात म्हटले

आहे, "आपली ऐहिक आणि पारमार्थिक प्रगती ज्यायोगे होईल अशा विशिष्ट नितितत्त्वांची शिकवण प.पू. सद्गुरू श्री इमामशाह महाराज यांनी दिलेली आहे. आपली शारीरिक शुध्दता, मानसिक पावित्र्य व आत्मिक उन्नतीची वाटचाल कशी करावी याबाबतीत त्यांनी जे नियम सद्भक्तांस उपदेशिलेले आहेत, त्यास 'शिक्षापत्री' अथवा 'शिखामण' हे सार्थ नाव दिलेले आहे."

नैतिक मूल्यांची शिकवण देणारे हे पुस्तक अत्यंत उपयुक्त आहे. यातील सर्व नियम मूळचेच गुजराथी भाषेत आहेत. त्यांचा मराठी आशय श्री जगन्नाथ महाराजांनी सांगितला आहे. या पुस्तकाचे दोन वेगवेगळे भाग करून १९९८ साली श्री जगन्नाथ महाराजांनी ते 'नित्यपाठ' आणि 'शिक्षापत्री' या नावांनी प्रसिध्द केले आहेत.

'मनहरज्ञान'

या १९७५ साली प्रसिध्द झालेल्या पुस्तकाच्याद्वारे श्री जगन्नाथ महाराजांनी श्री इमामशाहांनी गुजराथीतून सद्भक्तांना जे बोधामृत दिले, ते मराठी भाषिकांना मराठीतून दिले आहे. श्री जगन्नाथ महाराजांनी या पुस्तकाच्या प्रस्तावनेत 'केवळ भावार्थ करण्याचा प्रयत्न केला,' असं जरी म्हटलं आहे, तरी हा भावार्थ खूप काही सांगणारा आहे. त्याच्या संक्षेपातच सर्वार्थ सामावलेला आहे. श्री जगन्नाथ महाराज कठोपनिषद, भगवत्गीता वगैरे ग्रंथांतील संदर्भ देऊन मूळ आशय स्पष्ट करतात. पुढेमागे या ग्रंथावर त्यांनी प्रवचनात्मक अशी विस्तृत स्वरूपाची टीका लिहिली, तर ते फार मोठे कार्य होणार आहे. एक टीकापर पुस्तक म्हणून 'मनहरज्ञान' चं महत्त्व फार मोठं आहे.

'अमृतवाणी'

हे पुस्तक १९७५ साली प्रसिध्द झालं आहे. यात सद्गुरू इमामशाहांचे दोहे दिले आहेत. हे दोहे अर्थातच गुजराथीत आहेत. त्यांचा सुलभ भावार्थ मराठीत दिला आहे. प्रस्तावनेत श्री जगन्नाथ महाराज म्हणतात, ''मोक्षमार्गात गुरूचे स्थान काय व सद्भक्तांचे कर्तव्य काय याबद्दल श्री इमामशाहांनी योग्य, अनुरूप व अतिसंक्षेपाने विशद केलेले आहे. पण त्यांची वाणी गहन निर्वाणीची असल्याने सर्वसामान्य जनास सहज आकलन होण्यासारखी नाही. म्हणून यथाशक्ती त्यांचा मराठी भावार्थ करून, जिज्ञासूस उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केलेला आहे.'' दोह्याचा भावार्थ वाचल्यावर ह्या म्हणण्यांतील सत्यता प्रत्ययास येते. हे दोहे उपमा, उत्प्रेक्षा, दृष्टांत इत्यादी अलंकारांमुळे काव्यात्मक झाले आहेत. श्री जगन्नाथ महाराजांसारखी अधिकारी व्यक्ती जेव्हा त्यांचा भावार्थ उलगडून दाखविते, त्यावेळी दुधात साखर पडल्यासारखे वाटते. शितावरून भाताची परीक्षा करावी, त्याप्रमाणे पुढील एका उदाहरणावरून माझे म्हणणे लक्षात येऊ शकेल :

मूळ दोहा :

जैसा तीलमा तेल है। अने काष्टमा अगनी जाण रे॥
ऐसा दुधमा घृत है। पण मंथे जो परगट जाण रे॥

भावार्थ :

जसे तिळामध्ये तेल असते. ते वरून दिसत नाही; पण सर्व तीळभर व्याप्त असते. लाकडामध्ये अग्नी सामावलेला असतो. त्याचप्रमाणे दुधात तूप व्यापलेले असते. दुधात दृश्य रूपाने ते जरी दिसत नसले, तरी मंथन केल्यानंतर जसे ते प्रगट करता येते, तद्वत आत्मतत्त्व आपल्या शरिरात अदृश्य रूपाने व्याप्त आहे. ज्यावेळेस सात्विक शुध्दाचरणाच्या योगाने आपण आपले चित्तवृत्तीचे मंथन करू तेव्हा ते आपल्या जाणिवेस येईल.

'श्री सत्पंथ घटपाट पूजाविधीयज्ञ'

हा नित्य नैमित्यिक व काम्य पूजाविधीच्या मंत्रांचा अमूल्य असा ग्रंथ आहे. संपूर्ण सत्पंथ वाङ्मयाचे दिग्दर्शन या ग्रंथाद्वारे होऊ शकते. प्रस्तावनेत गुजराथी भाषेत असलेल्या या ग्रंथातील आशयासंबंधी श्री जगन्नाथ महाराजांनी विस्तृत माहिती दिली आहे.

'श्री सतपंथ नवनीत'

१९८८ साली श्री जगन्नाथ महाराजांनी प्रसिध्द केलेला हा ग्रंथ त्यांच्या एकूण सर्व साहित्यात शिरोभागी शोभणारा असा ग्रंथ आहे. खरं म्हणजे, या ग्रंथाची प्रसिध्दी केवळ पंथियांपर्यंतच झाली. पंथियेतरांपर्यंत हा ग्रंथ पोचला नाही. त्यांच्यापर्यंत तो पोचला असता तर विविध संप्रदायांच्या अभ्यासकांना या पंथाचा नव्यानं परिचय झाला असता व संप्रदायांच्या नामावळीत त्यांना सतुपंथाचाही अंतर्भाव करता आला असता.

सत्पंथाचं नवनीत या ग्रंथात आहे; परंतु ते सहजासहजी निघालं नाही. त्यासाठी श्री जगन्नाथ महाराजांना आयुष्यभर किती मानसिक परिश्रम करावे लागले असतील याची कल्पना येते. सर्वसमावेशक असं वाचन करून त्यांनी सतपंथाचे संस्थापक, त्यांचं तत्त्वज्ञान व त्यांनी सांगितलेला आचारधर्म यांचा शोध घेतला. त्या शोधाचं फलित म्हणजे हा ग्रंथ होय. आपले गुरू श्री पुरुषोत्तम महाराज यांना हा ग्रंथ अर्पण केला आहे.

'प्रकाशकाचे दोन शब्द' यात श्री जगन्नाथ महाराजांना पाचशे ते सहाशे वर्षांपूर्वीची हस्तलिखिते मिळवून ती वाचताना किती त्रास झाला त्यासंबंधीची माहिती आपणास मिळते. श्री जगन्नाथ महाराजांना असलेलं अनेक भाषांचं ज्ञान, त्यांची चिकाटी, त्यांच्याजवळ असलेली संशोधकाची दृष्टी, त्यांची कुशाग्र बुध्दी व सत्पंथावरील त्यांची अव्यभिचारी निष्ठा यांमुळेच

त्यांना या ग्रंथांची निर्मिती करणं शक्य झालं आहे. आपल्या नेहमीच्या विनम्र स्वभावानुसार प्रस्तावनेच्या शेवटी ते म्हणतात, ''यात माझे स्वत:चे असे काहीही नाही. सत्पंथ ज्ञानसाहित्याचा माल सद्‌गुरू महाराजांच्या ज्ञानग्रंथ भांडारातून काढून त्यांच्या चाहत्या श्रध्दाळू वाचकवर्गाला व अनुयायांना व्यवस्थित रीतीने पुरवण्याचे हमालीचे काम केलेले आहे. त्याच्या मोबदल्याची अपेक्षा नाही. केवळ तो माल वाचकवर्गाला अथवा अनुयायीवर्गाला कितपत पचविता येतो हे संबंधितांनीच ठरवायचे आहे. प्रत्येकापर्यंत हा माल पोचल्याने होणारे आत्मिक समाधान हीच त्याची मजुरी.'' श्री जगन्नाथ महाराजांना हा ग्रंथ लिहून आत्मिक समाधानरूपी मजुरी जरी मिळाली, तरी वाचकवर्गाला अथवा अनुयायीवर्गाला हा ग्रंथ कितपत पचविता आला, हा प्रश्नच आहे.

श्री जगन्नाथ महाराज हे उत्कृष्ट चित्रकार असल्यामुळे या ग्रंथात तेवीस चित्रंही छापली आहेत. सत्पंथ आणि इमामशाहांच्या जीवनचरित्राशी संबंधित अशी ही चित्रे आहेत. 'सत्पंथ संप्रदायाचा उदय' हे पहिले प्रकरण फारच महत्त्वाचे आहे. भारतात अनेक संप्रदाय निर्माण झाले. कालप्रवाहाबरोबर धर्माची घडी विस्कटली जाते. महात्मे उदयाला येतात. मानवी आचारधर्मातील दोष काढून, त्याठिकाणी सदाचारांची पेरणी करण्याचा प्रयत्न ते करतात. पुढे या प्रयत्नालाच संप्रदायाचे रूप प्राप्त होते. विविध संप्रदायांच्या बाबतीत श्री जगन्नाथ महाराज म्हणतात, ''सर्व संप्रदाय हे एकाच झाडाला फुटलेल्या शाखा, प्रशाखा आहेत. त्या झाडाचं मूळ सनातन वैदिक धर्मच आहे. परंतु प्रत्येक मनुष्य स्वत:चं वेगळं अस्तित्व दाखवण्याचा प्रयत्न करीत असतो. आणि या भावातच त्याचा विकास होतो. ज्याप्रमाणे फुले, फळे येतात ती फांद्या,

उपफांद्यांनाच. मूळ फक्त फुला-फळांचे पोषण करण्याचं काम करते..... आज जगात बरेच धर्मपंथ, संप्रदाय प्रचलित आहेत. सत्पंथ हा त्यातलाच एक विशेषत्त्वानं वेगळं स्वरूप धारण केलेला संप्रदाय आहे. भागवत धर्मातील वैष्णव मार्गाची उपासना करावयास शिकवणारा हा संप्रदाय आहे; पण त्यास वेगळे स्वरूप प्राप्त झाले आहे.....''

कित्येक लोक इमामशाहांच्या साहित्यातील उदाहरणे देऊन सत्पंथप्रवर्तक श्री इमामशाहांना मूर्तिपूजा मान्य नाही, असं प्रतिपादन करतात. असे लोक इमामशाहांची सोयीची तेवढी वचने देतात, परंतु ते श्री इमामशाहांच्या 'योगवाणी' आणि 'गुरुवाणी' या ग्रंथांतील शेकडो वचनांकडे कसे दुर्लक्ष करतात हे श्री जगन्नाथ महाराजांनी सप्रमाण या ग्रंथांत पटवून दिले आहे.

या संप्रदायाचा पाहिजे तसा प्रचार का झाला नाही, त्यासंबंधीचे विवेचन श्री जगन्नाथ महाराजांनी या प्रकरणाच्या शेवटी केलं आहे. या संदर्भात ते म्हणतात, ''सत्पंथी इमामशाहप्रणित मार्गाचं आचरण करतात म्हणून वेळोवेळी त्यांची अवहेलना केली. त्यांना बाटलेले मुसलमान समजून विटंबना केली. अर्धदग्ध धर्म पाळतात, विधर्मियाच्या धर्माचं अवलंबन करतात असं समजून, त्यांना अतोनात छळलं. वाळीत टाकलं. हटकलं. दंड आकारले व धर्माचा त्याग करायला भाग पाडले. त्यांच्याशी रोटी-बेटीव्यवहार बंद करून त्यांची मानहानी करण्याचा प्रयत्न केला.'' (पृ. २३)

''.... कित्येक ठिकाणी गुप्त रितीने हा पंथ पाळण्याची परंपरा आहे, त्यामुळे तो लोकांना कळू शकला नाही.'' (पृ. २४)

 "अनुयायांनी साहित्यविकासात फारसं लक्ष घातलं नाही..... अश्रध्दाळू माणसाच्या हातात साहित्य गेल्यास त्याचं विडंबन होईल, असं मानल्यामुळे या पंथातील साहित्याचा विकास झाला नाही." (पृ. २४)

काही विदेशी लोकांनी ह्या पंथाचा अभ्यास करण्याचा कसा प्रयत्न केला त्या संबंधीची माहिती या प्रकरणात दिली आहे. या संप्रदायाची सविस्तर माहिती फक्त फैजपूर येथील सत्पंथी मंदिरातच मिळू शकते. तेथे या पंथाचं साहित्य उपलब्ध आहे. गुजराथमध्ये मुसलमानांचे हल्ले झाले तसे फैजपुरात झाले नाहीत. श्री इमामशाहांनी गुजराथमध्ये अध्यात्मिक विकासाचा मार्ग ज्या ठिकाणी दाखवला त्या ठिकाणाला 'पीराणा' हे नाव प्राप्त झालं आहे. "जीवनाची क्षणभंगूरता जाणून, सदाचाराने वागा, ही इमामशाहांची शिकवण आहे." असे या प्रकरणाच्या शेवटी श्री जगन्नाथ महाराज म्हणतात.

या ग्रंथाच्या दुसऱ्या प्रकरणात सत्पंथाच्या साहित्याचा परिचय करून दिला आहे. तिसऱ्या प्रकरणात सत्पंथातील कर्मकांडांविषयी माहिती दिली आहे. चौथ्या प्रकरणात सत्पंथातील धार्मिक बाधेविषयीची माहिती दिली आहे. पाचव्या प्रकरणात श्री इमामशाहांनी सत्पंथीयांसाठी जी आचारसंहिता निश्चित केली आहे, तिच्यासंबंधी विवेचन केले आहे. सहाव्या प्रकरणात सत्पंथातील तत्त्वज्ञानाचा परिचय करून दिला आहे. शेवटच्या सातव्या प्रकरणात सत्पंथातील सद्भक्तांची चरित्रे दिली आहेत.

असा हा 'श्री सत्पंथ नवनीत' ग्रंथ आहे. श्री जगन्नाथ महाराजांच्या अध्यात्मिक ज्ञानाचा, संशोधनात्मक वृत्तीचा, समृध्द वाचनाचा आणि सत्पंथ साहित्याच्या चिंतनाचा तो परिपाक आहे. महाराष्ट्रांतील विविध संप्रदायांच्या अभ्यासकांनी या

संप्रदायाचाही विचार करणं आवश्यक आहे. त्यासाठी श्री जगन्नाथ महाराजांनी सत्पंथांच जे नवनीत काढलं आहे, ते त्यांना अत्यंत उपयुक्त असं आहे.

'श्री सत्पंथ शिक्षण संस्कार माला भाग १ व २'

ही दोन पुस्तके १९९८ साली श्री जगन्नाथ महाराजांनी प्रसिध्द केली. श्री सत्पंथ बालबालिकांना संस्कारयुक्त शिक्षण देण्याच्या हेतूने हा उपक्रम केलेला आहे. फैजपूर येथील सत्पंथी आश्रमात बालबालिकांसाठी संस्कारकेंद्र चालविलं जातं. त्यांना उपयुक्त अशी ही संस्कारमाला आहे.

'श्रीमद्दशावतार'

हा प्रचंड ग्रंथ श्री जगन्नाथ महाराजांनी १९९९ साली प्रसिध्द केला. यात भगवान नारायणाच्या अवतारमालिकेचे व कार्याचे वर्णन आहे. श्री इमामशाहाच्या 'मूळबंध' या गुजराथी ग्रंथाचा अनुवाद म्हणजे हा ग्रंथ होय. या ग्रंथात वैदिक सनातनी धर्माचा पारंपरिक तत्त्वबोध आहे.

या ग्रंथासंबंधी प्रास्ताविकात श्री जगन्नाथ महाराज म्हणतात, "महात्मा श्री सद्गुरू इमामशाह महाराजांच्या या महामूल्य धर्मग्रंथात शब्दाशब्दात तत्त्वचिंतन आहे; आत्मस्फूरण आहे व मानवकल्याणाची पावन परिभाषा आहे. ज्यात त्यांच्याच भाषेत एक पध्दतशीर एक पवित्र कार्य होत आहे. या ग्रंथाच्या विविध विषयांचे श्रेणीबोध प्रकाशन करण्याचे सद्भाग्य गुरुकृपेने प्राप्त होत आहे. आज प्रस्तुत तयार होणारा ग्रंथ 'श्रीमद्दशावतार' सत्पंथियांकरितां एक उत्तम उद्बोधनकारक ग्रंथ होत आहे. भगवंताच्या दहा अवतारांचे वर्णन बऱ्याच ठिकाणी आलेलं आहे. पण याच वस्तुकथेला सद्गुरुजींनी प्रसंगोचित शब्दप्रयोगात विशिष्ट रूपाने वर्णन केलेले आहे. ज्यात त्यांच्या ज्ञानाची

एक आगळीवेगळी प्रतिभा आहे. साध्या, सरळ, आणि अर्थगर्भवाणीचा शब्दसंगम या 'मूळबंध' नामक महाग्रंथामधूनच वाहत आलेला आहे. हा ग्रंथ प्रत्येक ज्ञानपिपासूच्या आकांक्षा पूर्ण करील.'' हा ग्रंथ वाचल्यावर श्री जगन्नाथ महाराजांच्या या म्हणण्याचा प्रत्यय येतो.

उत्कृष्ट छपाई, उत्तम चित्रे व सुगम अनुवाद यांमुळे हा ग्रंथ सत्पंथीयांना कथापारायण सप्ताहासाठी अत्यंत उपयुक्त असा आहे. ग्रंथाच्या प्रारंभी या ग्रंथाचा कथासप्ताह कसा करावा यासंबंधीही माहिती दिली आहे. या माहितीच्या शेवटी श्री जगन्नाथ महाराज म्हणतात, ''सप्ताह केवळ नावलौकिकाकरता अथवा द्रव्याची आरास दाखविण्याकरिता करायचा नसून ज्ञानदान व अन्नदानाला प्राधान्य देऊन सप्ताहाची आयोजना करावी ही अभिलाषा.''

अखंड लेखन व सत्पंथी साहित्याच्या प्रसारासाठी श्री जगन्नाथ महाराज आपले तन, मन व धन सतत वेचत असतात. फैजपूरच्या सत्पंथी मंदिरात ते केवळ शोभेसाठी गादीपती झाले नाहीत. आपले संपूर्ण व्रतस्थ जीवन अध्ययन, सन्मार्गदर्शन व लेखन यांसाठी ते खर्च करीत आहेत. सत्पंथाला कालानुरूप लोकाभिमुख बनवण्यासाठी त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. त्यांचं हे लोकोत्तर कार्य नाही तर काय ?

'संतसमागम'

हाही एक प्रचंड ग्रंथ आहे. १९९९ साली हा ग्रंथ प्रकाशित झाला. यात श्री इमामशाहांच्या सान्निध्यात पावन झालेल्या सत्भक्तांच्या कथा आहेत. गंगासिंह गोहिल यांनी गुजराथी भाषेत ओविबध्द केलेले आणि सुरत येथील सिध्दहस्त लेखक श्री. माणिकलाल शंकरलाल राणा यांनी संग्रहित केलेले

व विश्लेषण केलेले कथाप्रसंग यात मराठीतून सांगितले आहेत. हे कथाप्रसंग श्री जगन्नाथ महाराजांच्या इतर पुस्तकांतही आलेले आहेत. यातील चमत्कारासंबंधी त्यांनी जे विवेचन केले आहे, त्यासंबंधीचं विश्लेषण 'महात्मा सद्गुरू श्री इमामशाह महाराज' या ग्रंथाच्या मूल्यमापनाच्या वेळी आलेले आहे.

श्री जगन्नाथ महाराजांचं हे सर्व लेखनविषयक कार्य अनंतकाळपर्यंत सत्‌पंथियांना मार्गदर्शन करीत राहणार आहे. आयुष्यभर त्यांनी आपली लेखणी सत्‌पंथी साहित्याच्या संशोधनासाठी व प्रसारासाठी राबविली. त्यांनी सत्‌पंथी साहित्याच्या संदर्भात जे कार्य केलं त्याला तोड नाही. त्यांनी केवळ सत्‌साहित्यच निर्माण केलं असं नाही, तर आपली सत्‌कृती आणि सत्‌उक्ती यांची त्यांना जोड दिली. या त्रिवेणी संगमामुळे श्री जगन्नाथ महाराजांच्या साहित्याला एक प्रकारचं तेज प्राप्त झालं आहे.

★ ★ ★

५. रथ जगन्नाथाचा

दि. १७/३/१९९७ साली महाराजांना हृदयविकाराचा पहिला सौम्य झटका आला. २७ जुलै १९९७ रोजी तीव्र स्वरूपाचा झटका आला. डॉ. सुभाष चौधरींच्या दवाखान्यातून महाराजांना मुंबईच्या नायर हॉस्पिटलमध्ये एन्जीओग्राफी करण्यासाठी नेण्यात आलं. बायपास सर्जरी करणं आवश्यक असल्याचं डॉक्टरांनी सांगितलं. २० ऑगस्ट १९९७ रोजी डॉक्टर राजेंद्र पाटील यांनी त्यांच्यावर यशस्वी शस्त्रक्रिया केली.

१९८९ साली फैजपूरच्या सत्पंथी मंदिरात जामनेर तालुक्यातील पिंपळगाव (गोलाईत) या गावची दोन मुलं महाराजांचे शिष्य म्हणून प्रवेश करते झाले. दोन्ही मुलं सारख्याच वयाची म्हणजे अकरा वर्षांची होती. त्यांच्या आई-वडिलांनी त्यांना मंदिरात सेवा चाकरीसाठी पाठविलेलं होतं. शालेय शिक्षणाबरोबर त्यांनी रोजची आरती, पूजापाठ, भजन वगैरे गोष्टी आत्मसात केल्या. १९९७ साली महाराजाचं ऑपरेशन झालं, त्यावेळी या दोन्ही मुलांना मंदिरात येऊन आठ वर्षे झाली होती. बारावीपर्यंत दोघांनीही शिक्षण घेतलं होतं. ऑपरेशन झाल्यापासून महाराजांना बाहेरगावी पूजा-अर्चेसाठी जाणं शक्य होत नसे. महाराजांनी विचार केला, की ह्या दोन्ही मुलांना बालब्रह्मचारीपदाची संन्यास दिक्षा दिली तर फार चांगलं होईल. ती मुलं रोजचे पूजापाठ वगैरे करीतच होती. त्यांना ब्रह्मासनावर बसवून आपण निवृत्त व्हावं असा विचार महाराजांनी केला.

महाराजांनी मुलांच्या आईवडिलांना बोलावलं. दोघांच्याही आईवडिलांनी संमती दिली. गावोगावच्या प्रमुख व्यक्तींना बोलावून त्यांच्याशी सल्लामसलत केली. मुलांना दिक्षा द्यावी, असं सर्वांचं मत पडलं. मुलांचीही संमती घेतली. त्यांनी तयारी दर्शविली. दि. २२ डिसेंबर १९९७ हा दिवस दीक्षादान समारंभासाठी नक्की केला. मंदिरात पाच पुरोहितांनी विष्णुयाग यज्ञ करून मुलांच्या हातून सर्व विधी करून घेतले. त्यांना विष्णुयाग गायत्री मंत्राचा व निष्कलंकीनारायण गायत्री मंत्राचा जप देऊन कार्यक्रम पार पाडला. मुलांची नावं बदलण्यात आली. रामदास लहेनसिंग चव्हाण याचं नाव बदलवून आचार्य श्री जनार्दन गुरू जगन्नाथ महाराज असं ठेवण्यात आलं. प्रमोद विनायक शिसोदे हे नाव बदलवून आचार्य श्री पूर्णानंद गुरू जगन्नाथ महाराज हे नाव ठेवण्यात आलं. मोठा उत्सव होऊन दोन्ही नूतन महाराजांची गावातून मिरवणूक काढण्यात आली व दीक्षादान समारंभाची सांगता झाली.

श्री पुरुषोत्तम महाराजांना एका सत्‌शिष्याचा लाभ झाला होता. श्री जगन्नाथ महाराजांना तर दोन सत्‌शिष्यांचा लाभ झाला. ते दोन्ही 'सत्‌शिष्य' होण्याचा प्रयत्न करतील अशी आशा वाटते; कारण त्यांच्या घरी त्यांच्यावर त्यांच्या वयाच्या पाचव्या वर्षापासून सत्‌पंथाचे संस्कार होत होते. मंदिरात आल्यावर त्यांनी शालेय शिक्षण घेतलं. सत्‌पंथाच्या ज्ञानसाहित्याचाही ते अभ्यास करीत आहेत. पूजा, अर्चा, विधी वगैरेत ते प्रगती करीत आहेत. त्यांच्या या प्रगतीला कारण महाराज आहेत. कसं बोलावं व कसं वागावं या संबंधीचं वळण त्यांना बेबीताईनं लावलं आहे.

श्री जनार्दन महाराज तबला छान वाजवतात. महाराजांच्या लेखनात व प्रुफं तपासण्यात ते मदत करतात. श्री पूर्णानंद महाराज यांना गायनाची आवड आहे. मंदिराच्या शेतीकडेही ते लक्ष देतात. सध्या मंदिराच्या जीर्णोध्दाराकडे महाराजांचे दोन्ही शिष्य लक्ष देत आहेत.

महाराजांनी सत्पंथाकरिता जे कार्य केलं ते खंडित न करता पुढे नेण्याचा प्रयत्न त्यांचे दोन्ही शिष्य करतील, असं वाटतं; कारण विशिष्ट संस्कारांचं कोंदण त्यांच्याभोवती आहे.

महाराजांची प्रकृती अलीकडे ठीक नसते. त्यांना बोलतानाही त्रास होतो; तरी पण त्यांचा आशावाद फार दांडगा आहे. श्री इमामशाहांच्या आणखी काही ग्रंथांचा मराठीत अनुवाद करावा, अशी त्यांची महत्त्वाकांक्षा आहे; परंतु ती कितपत पार पडेलं हे आज सांगणं कठीण आहे.

महाराजांच्या महत्त्वाकांक्षेला धुमारे फुटले नाहीत, तरी त्यांनी जे कार्य केलं आहे, ते काळाच्या पडद्याआड न होणारं आहे. त्यांचं वैदिक धर्माचं अध्ययन, सत्पंथाच्या साहित्याचा त्यांचा सखोल व डोळस अभ्यास, फैजपूरच्या सत्पंथी मंदिरासाठी व आश्रमाच्या उभारणीसाठी त्यांनी घेतलेले कष्ट, अखंडित असं त्यांनी केलेलं लेखन, सत्पंथाच्या प्रचारासाठी व प्रसारासाठी त्यांनी केलेलं जिवाचं रानं, त्यांची पुरोगामी दृष्टी, भजनानंदातील त्यांची तल्लीनता, त्यांचं निरागस हास्य, त्यांची चित्रकारिता व कुणालाही श्रध्देय वाटावं असं त्यांचं जीवन ह्या त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विविध परी त्यांच्या सान्निध्यात आलेल्यांच्या मन:कोशात सतत राहतील यात शंकाच नाही. हा जगन्नाथाचा रथ सतत असाच पुढे जात राहिला पाहिजे. त्यासाठी हजारो हातांच्या मदतीची व महाराजांना परमेश्वरानं दीर्घायुष्य देण्याची गरज आहे.

★ ★ ★

पुढील भजन कै. खुशाल भारंबे (फैजपूरकर) यांनी रचलेले आहे. त्यांनी अशा प्रकारची काही भजनं रचलेली आहेत, त्यांतील हे एक भजन आहे.

– प्रकाशक

उदंड आयु दे जगन्नाथ गुरूंना

देव जरी मज प्रसन्न झाला
वत्सा, वर माग म्हणाला
उदंड आयु दे मम गुरूला ॥ध्रु.॥

अध्यात्माची ज्योति तळपण्या
अज्ञजनांना तारून नेण्या. ॥१॥

भक्तीचा मळा फुलविण्या
आत्मज्ञानाचा दीप तेवण्या. ॥२॥

वैराग्याचे ओज प्रसविण्या
तव चरणांचा ध्यास लाविण्या. ॥३॥

नसावी त्यांच्या चिन्ता मनाला
सुदृढ तनू दे मम गुरूला. ॥४॥

शुध्द वाणी त्यांची मोहवी मनाला
मधुर नाद तो झुलवी जनाला. ॥५॥

उदंड आयु दे जगन्नाथ गुरूंना
भक्त विनवी सद्‌गुरू इमामशाहांना. ॥६॥

– खुशाल भारंबे, डोंबिवली

* * *

डॉ. श. रा. राणे यांचे साहित्य

१. वा. गो. आपटे यांची आनंदयात्रा : चेतश्री प्रकाशन, अमळनेर
(समीक्षातत्त्वप्रधान संशोधनपर ग्रंथ)

२. मराठी साहित्य संशोधन; स्वरूप आणि दिशा :
(डॉ. श. रा. राणे यांच्या षष्ट्यब्दीपूर्तीनिमित्त धुळ्याच्या का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्थेनं प्रसिध्द केलेला ग्रंथ)

३. बेगड (बालकादंबरी), : प्रबोधिनी प्रकाशन, खिरोदा

४. पाचामुखी पांडू (बालकादंबरी) : चेतश्री प्रकाशन, अमळनेर
(राज्यसरकारचा साने गुरुजी पुरस्कार प्राप्त)

५. कोरांटीची फुलं (दैनंदिनीरूप बालकादंबरी) : औरंगाबादच्या साकेत प्रकाशनचे आगामी प्रकाशन

६. आंब्याचं झाड (बालकथा) : अनघा प्रकाशन, ठाणे

७. भुताची ज्योत (बालकथा) : समाजशिक्षण माला, क्र.४५६ पुणे.

८. बूटघरातील लाल्या (बालकथा) : औरंगाबादच्या साकेत प्रकाशनचे आगामी प्रकाशन

९. डोंगरावरची माणसं (ललित लेख : समाजशिक्षण माला, क्र. ४३७, पुणे

१०. चुंबळ (ललित लेख) : रत्नदीप प्रकाशन, फैजपूर

११. रुची-अभिरुची (समीक्षात्मक लेखसंग्रह) : चेतश्री प्रकाशन, अमळनेर

१२. न संपणारा शोध (समीक्षात्मक लेखसंग्रह) : आगामी प्रकाशन

१३. मृगजळ (नाटक) : रत्नदीप प्रकाशन, फैजपूर

१४. मृगजल (हिंदी),
अनुवाद - डॉ. जगन्नाथ चौधरी : अतुल प्रकाशन, कानपूर

१५. घर आणि दोन एकांकिका (एकांकिका) : रत्नदीप प्रकाशन, फैजपूर

१६. कंदील (कादंबरी) : आगामी प्रकाशन

१७. रथ जगन्नाथाचा (चरित्र) : श्री सत्पंथ साहित्य प्रकाशन, फैजपूर

१८. माझी कविता (काव्यसंग्रह) : रत्नदीप प्रकाशन, फैजपूर

प्रकाशित झालेले सत्पंथाचे मौल्यवान साहित्य

१.	श्री सत्पंथ ज्ञानपद संग्रह (भजनावली)	१५-००
२.	श्री गुरु वंदना (भजनावली)	३-००
३.	मनहर ज्ञान (सद्गुरु बोध)	४-००
४.	अमृतवाणी (दोहावली)	३-००
५.	श्री सत्पंथ नवनीत	३०-००
६.	श्री सतपंथ संप्रदाय स्वरूप व कार्य	१६-००
७.	शिक्षापत्री	६-००
८.	नित्यपाठ	४-००
९.	शिक्षण संस्कार माला भाग १ ला	७-००
१०.	शिक्षण संस्कार माला भाग २ रा	१२-००
११.	संत समागम अर्थात् इमामशाहांचा जीवनवृत्तांत	१५०-००
१२.	श्रीमद् दशावतार (मराठी अनुवाद)	२२५-००
१३.	रथ जगन्नाथाचा	८०-००

प्रकाशित होणारे साहित्य

१. श्री सतपंथ घटपाट पूजा यज्ञविधी
२. मुनिवर चेतावणी
३. ऋषीवर चेतावणी
४. सत् वाणी

★ मिळण्याचे ठिकाण ★

श्री सत्पंथी मंदीर, फैजपूर ४२५५०३
ता. यावल, जि. जळगाव
दूरभाष - (०२५८५) ४५४१७

कपिलाषष्ठीचा योग

बालपणापासून सत्पंथाचे संस्कार झालेला, राजोरे गावच्या डरफोळ्या ओढ्यात आपलं आवडतं डुंबणं सोडून फैजपूरच्या सत्पंथ मंदिरात स्वेच्छेनं बालब्रह्मचारी म्हणून राहून भगवी वस्त्रं परिधान केलेला, मंदिरातील पूजाअर्चेत व शालेय शिक्षणात एकरूप झालेला, रागदारी भजनानंदात तल्लीन होणारा, वेद-उपनिषद-गीता-रामायण भागवत-महाभारत-अठरा पुराणं वगैरेंच्याशिवाय सत्पंथी साहित्यात अवगाहन करणारा, सत्पंथाच्या प्रचारासाठी व प्रसारासाठी आपली लेखणी व वाणी सत्कारणी लावणारा, आपल्या पुरोगामी दृष्टीनं व चित्रकारितेनं पंथीयेतरांनादेखील आकर्षित करणारा व सर्वत्र भ्रष्टाचाराचं वारं थैमान करीत असतानाही सदाचाराच्या ज्योतीची जपणूक करणाऱ्या श्री जगन्नाथ महाराजांसारख्या धार्मिक क्षेत्रातील एका आगळ्यावेगळ्या अशा चरित्रनायकाच्या चरित्रलेखनासाठी डॉ. श. रा. राणे यांच्यासारखा एक अभ्यासू, संशोधनात्मक दृष्टी असलेला व सिध्दहस्त लेखक लाभला हा 'श्री सत्पंथ साहित्य प्रकाशना'च्या दृष्टीनं एक कपिलाषष्ठीचा योग म्हटला पाहिजे.

- श्री सत्पंथ साहित्य प्रकाशन, फैजपूर

मुखपृष्ठ – संतोष वराडे